म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0003562

म. ग्रं. सं. ठाणें
नं. ३३३

मंडळीची ग्रंथमाळा–ग्रंथ ३६ वा.

# वेदकाळनिर्णय.

लो. बाळ गंगाधर टिळककृत

The Orion or Researches into the Antiquities of the Vedas.

या ग्रंथावरून संक्षेपानें

रा. रा. केशव लक्ष्मण ओगले, बी. ए.

यांनीं लिहिलें.

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी

ग्रंथसंपादक, ग्रंथप्रकाशक इ. ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

आवृत्ति दुसरी.

सन १९२८, शके १८४९.

किंमत ८ आणे.

REFBK-0003562

ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळीची ग्रंथमाला–ग्रंथ ३६ वा.

# वेदकालनिर्णय.

लो. बाळ गंगाधर टिळककृत

The Orion or Researches into the Antiquities of the Vedas.

या ग्रंथावरून संक्षेपानें

रा. रा. केशव लक्ष्मण ओगले, बी. ए.

यांनीं लिहिलें.

3522

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी

ग्रंथसंपादक, ग्रंथप्रकाशक इ. ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

आवृत्ति दुसरी.

सन १९२८, शके १८४९.

किंमत ८ आणे.

हें पुस्तक रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं नं. ३८८ ठाकुरद्वार रोड, मुंबई, येथें आपल्या 'इंदुप्रकाश' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

ह्या पुस्तकासंबधानें सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

हें पुस्तक लिहिण्यास प्रेरणा करणारें कारण मुंबई फणसवाडी जगन्नाथाची चाळ येथें सांत आठ वर्षें चालू असलेली **बालवक्तृत्वमंडळ** नांवाची संस्था होय. ही संस्था विद्यार्थ्यांनीं स्थापन केलेली आहे, आणि तिचा सभासद या नात्यानें लिहिलेल्या विषयांपैकींच प्रस्तुत विषय हा एक आहे. लो- **बाळ गंगाधर टिळक** यांनीं सुमारे पंधरा वर्षांपूर्वीं लिहिलेल्या The Orion or Researches into the Antiquity of the Vedas [ ओरायन ऊर्फ वेदांच्या प्राचीनत्वाविषयीं शोध ] नांवाच्या ग्रंथावरून सारांशरूपानें हें पुस्तक लिहिलें आहे. मूळ ग्रंथ इंग्रजी भाषेंत असल्यामुळें केवळ मराठी जाणणाऱ्या जिज्ञासूंना त्यापासून कांहीं कळावयाजोगें नाहीं. म्हणून निदान त्याचा सारांश तरी आपल्या मंडळांतील सभासदांस व त्यामुळें प्रसंगोपात्त इतरहि मराठी वाचकांस समजावा, असा हें पुस्तक लिहिण्यांत मूळ हेतु होता. पण पुढें कित्येक मित्रांनीं तें छापून काढावें अशी सूचना केली. त्यावरून मीं तें छापून काढण्यास परवानगी देण्याविषयीं मूळग्रंथकार लो. **टिळक** यांना विनंति केली. त्यांनीं ती मान्य करून ताबडतोब परवानगी दिली, आणि लिहिलेला मजकूर वाचून पाहून कांहीं सूचना केल्या. त्याप्रमाणें व्यवस्था केल्यावर, ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळीचे व्यवस्थापक रा. रा. **दामोदर सावळाराम यंदे** यांस हें पुस्तक छापून काढण्याबद्दल विचारिलें व त्यांनीं तें मोठ्या संतोषानें ताबडतोब कबूल केलें. असो.

वर सांगितलेंच आहे कीं, प्रस्तुत पुस्तक मूळ ग्रंथाचें समग्र भाषांतर नसून सारांशरूप मात्र आहे. तथापि, त्यांत कोणतीहि महत्त्वाची गोष्ट गाळलेली नाहीं, व पूर्वापार संबंध तोडलेला नाहीं. मूळ पुस्तकाप्रमाणें जरी यांत भाग पाडलेले नाहींत तरी लिहितांना अनुक्रमानें भागशः लिहिल्यामुळें वाचतांनाहि ते सहज कळण्यासारखे आहेत. त्यांचें थोडक्यांत येथें दिग्दर्शन करतों.

प्रथमतः [ पानें १–५ ] वेदकालनिर्णयाचें महत्त्व व त्याच्या निरनिराळ्या पंडितांनीं स्वीकारलेल्या निरनिराळ्या पद्धति सांगितल्या आहेत. पुढें [ पानें ६–१२ ] वैदिककाळच्या पंचांगाचें थोडें वर्णन देऊन यज्ञयागाचे काळ व वर्षारंभ यांचें विवेचन केलें आहे. यानंतर [ पानें १२–१९ ] वसंतसंपात एकाकाळीं कृत्तिकांत होता असें दाखविणाऱ्या गोष्टी देऊन तो काळ ठरविला आहे. यापुढें [ पानें १९–३१ ] मृगशीर्षांत वसंतसंपात होता हें

दाखविण्यासाठीं मृगशीर्ष नक्षत्राचें दुसरें नांव जें आग्रहायणी त्याच्या व्युत्पत्तीचा विचार करून तें एकदां पहिलें नक्षत्र होतें, असें दाखविलें आहे; व त्यांतच आग्रहायणी शब्दाच्या चुकीच्या व्युत्पत्तीवर आणखी चुकीच्या गोष्टी कशा रचल्या गेल्या हें सांगून संपाताच्या आंदोलनाच्या कल्पनेचें एक शक्य कारण दिलें आहे. त्याच्या पुढें [पा. ३१–४१ ] मृगाच्या शीर्षाविषयींच्या वेद, ब्राह्मणें व पुराणें, यांतील व तशाच ग्रीकपुराणांतील गोष्टी देऊन त्यांचें निकट साम्य दाखविलें आहे. नंतर [ पा. ४१–५४ ] ग्रीक ओरायन व त्याचा पट्टा यांचें आपला प्रजापति ऊर्फ यज्ञ व त्याचें उपवीत यांशीं पारशांचा होम [ आपला सोम ] व त्याची मेखला यांशीं साम्य दाखवून ग्रीक ओरायन शब्द वैदिक आग्रयण शब्दापासून निघाला असावा असें सांगितलें आहे. [ या सर्वांच्या मुळाशीं वसंतसंपात एका काळीं मृगांत होता ही कल्पना आहे. ] त्यापुढें [ पा. ५४–६१ ] वैदिककाळच्या लोकांचें ज्योतिषविषयक ज्ञान किती होतें हें सांगून तेव्हां वसंतसंपात मृगशीर्षांत होता हें दाखविण्यास प्रत्यक्ष पुरावा म्हणून ऋग्वेदांतील एक ऋचा व एक सबंध सूक्त यांचें विवेचन केलें आहे. शेवटीं [ पा. ६१–७० ] वसंतसंपात त्याहूनहि पुढें म्हणजे पुनर्वसू नक्षत्रामध्यें होता असें दाखविणारी एक गोष्ट देऊन पुन्हां एकवार तिन्ही काळ म्हणजे कृत्तिकाकाळ, मृगशीर्षकाळ व पुनर्वसुकाळ यांच्या मर्यादा सांगून हीं अनुमानें इतर गोष्टींशीं अगदीं अविरुद्ध आहेत असें दाखविलें आहे.

आपल्या इकडे वेदकालासंबंधानें आणखीहि कित्येक जणांनीं लिहिलें आहे. त्यांत कै. शं. बा. दीक्षित यांनीं त्याचा बराच ऊहापोह केला आहे. प्रस्तुत त्या सर्वांचा विचार न करितां, या पुस्तकांत आलेल्या महत्त्वाच्या गोष्टीसंबंधें दीक्षितांचें मत काय आहे हें थोडक्यांत पहावयाचें आहे. लो. टिळकांनीं “ ओरायन ” हें पुस्तक इ. स. १८९३ या सालीं छापिलें. त्या वेळीं “ भारतीय ज्योतिःशास्त्र ” जरी छापिलें नव्हतें तरी त्याची हस्तलिखित प्रत त्यांनीं पाहिली होती. [ मूळ पुस्तकाचें प्रथम प्रकरण पहा. ] तथापि दीक्षितांचा सदर ग्रंथ त्यानंतर छापल्यामुळें त्यांनीं “ ओरायन ” मध्यें प्रतिपादिलेल्या कांहीं गोष्टींवर जे आक्षेप काढिले, त्यांचा थोडासा विचार करूं.

वर्षारंभ पूर्वी वसंतारंभीं होता ही गोष्ट दोघांसहि मान्य आहे. परंतु पुढें थोडा मतभेद आहे. तैत्तिरीयसंहितेंतील संवत्सरसत्राच्या अनुवाकांत जे तीन

वर्षारंभ सांगितलें आहेत, ते लो. टिळकांच्या मतें उदगयनारंभींचे होत. परंतु त्यासंबंधानें दीक्षित म्हणतात [ भा. ज्यो. पा. १३५ ] ' ऋक्संहिताकाळीं मृगांत संपात होता ही गोष्ट स्वतंत्रपणें सिद्ध होते. तिला फाल्गुनांत उदगयन असा अर्थ पूर्वोक्त अनुवाकांत करून त्याचा आधार घेण्याचें कारण नाहीं. तसा अर्थ करण्यास अडचणी आहेत. ' त्यांच्या मतें सदर फाल्गुनीपूर्णमासाचा संबंध वसंताशींच आहे. एकदरींत '*यजुर्वेदसंहिताकाळीं व तदनुसार पुढें सर्व वैदिककाळीं वर्षारंभ वसंतारंभीं होत असे ' व वेदामध्यें '×उदगयनाबरोबर वर्षारंभ होत असे, असें ज्ञापकहि कोठें नाहीं' असें त्यांचें मत होतें.

कृत्तिकांमध्यें वसंतसंपात होता याला दीक्षितांनीं एक प्रत्यक्ष आधार दाखविला* आहे. शतपथ × ब्राह्मणामध्यें ' कृत्तिका पुष्कळ आहेत व जो त्यांवर अग्न्याधान करतो तो पुष्कळपणा मिळवतो. ह्मणून कृत्तिकांवर आधान करावें. या मात्र पूर्वदिशेपासून चळत नाहींत. इतर सर्व नक्षत्रें पूर्वदिशेपासून चळतात ' अशा अर्थाचीं वाक्यें आहेत. त्यांत ' पूर्वेपासून चळत नाहींत ' असें म्हटलें आहे; यावरून त्या नेहमीं पूर्वेस उगवतात, म्हणजे त्या विषुववृत्तावर आहेत असें सिद्ध होतें. आज कृतिका विषुववृत्तापासून दूर आहेत. या स्थानचलनाला सुमारें ५००० वर्षे लागलीं असें गणितानें ठरतें. यांमध्यें थेट पूर्व कोणती हें समजण्यांत जरी एखाद्या अंशाची चूक झाली तरी त्यायोगानें सुमारें २०० वर्षांहून अधिक चूक पडणार नाहीं. या प्रत्यक्ष आधारामुळें कृत्तिकादिगणनेवरील सर्व आक्षेप दूर होतात, इतकेंच नव्हे तर इतर कमी दर्जाच्या आधारांना फारच बळकटी येते.

कृत्तिकांच्या पुढें जातां जातां रोहिणीमध्यें एकदां वसंतसंपात होता असें दाखवावयास प्रजापति व रोहिणी यांच्या गोष्टीवरून थोडासा आधार मिळतो हें पुढें आलेंच आहे. त्याच्यापुढें गेलें म्हणजे मृगांत ज्या वेळीं संपांत होता त्या काळाशीं येऊन आपण ठेपतों. मृगांत वसंतसंपांत होता हें दाखविण्यास फल्गुनीपूर्णमासी उदगयनाबरोबर वर्षारंभ होत असे, असें मानून जो एक अप्रत्यक्ष आधार म्हणून घेतला आहे त्यासंबंधाचा दीक्षितांचा मतभेद वर

---

* भा. ज्यो. पान ६८. × भा. ज्यो. पान १३२. * भा. ज्यो. पान १२७.

× २-१-२ एता ह वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते सर्वाणि ह वा अन्यानि नक्षत्राणि प्राच्यै दिशश्च्यवन्ते ।

सांगितलाच आहे. याच्या दुसऱ्या एका आधारासंबंधानेंहि मतभेद आहे. आग्रहायणासंबंधानें विचार करतांना, मार्गशीर्षामध्यें एकदां वर्षारंभ होता अशी प्राचीन ज्योतिर्विदांची कल्पना आग्रहायणी शब्दाच्या चुकीच्या व्युत्पत्तीवर झाली, कारण त्याच्या प्रसिद्ध अर्थाप्रमाणें [ वर्षाची पहिली रात्र ] पाहिल्यास आग्रहायणाची म्हणजे मार्गशीर्षाची पौर्णिमा ही वर्षारंभाची रात्र असली पाहिजे असें होतें; परंतु वर्षारंभ वसंतारंभीं धरा अथवा उदगयनीं धरा, कसेंहि केलें तरी त्यावरून विलक्षण प्रकारचीं अनुमानें निघतात; म्हणून मार्गशीर्ष हा महिना वर्षारंभाचा होता असें मानतां येत नाहीं, असें लो. **टिळकांनीं** प्रतिपादन केलें आहे. यावर दीक्षित म्हणतात * ' मार्गशीर्ष हा वर्षारंभाचा पहिला मास असे प्रत्यक्ष दाखले आहेत; तर ती गोष्ट नाकबूल करतां येत नाहीं. ' त्यांच्या मतें मृगशीर्षयुक्त पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीं वर्ष सुरू होणें असंभवनीय नाहीं आणि त्याप्रमाणें होत असे; परंतु हें दीक्षितांचें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. कारण, ज्या काळासंबंधानें हा वाद चालला आहे, त्या काळीं, वसंतसंपतांत सूर्य असतांना वर्षारंभ होत असे; व हें म्हणणें दीक्षितांस सर्वथैव मान्य आहे, आणि अग्रहायण याचा, ज्याच्यापुढें वर्ष लागतें म्हणजे ज्या नक्षत्रीं सूर्य आला असतां संपातांत असतो आणि वर्ष सुरू होतें तें नक्षत्र, असा अर्थहि त्यांस मान्य आहे. आता ते म्हणतात, " [ पूर्णिमान्त ] मासाच्या अन्तीं मृगशीर्ष नक्षत्रीं चंद्र असतां दुसरे दिवशीं वर्ष सुरु करण्याची पद्धति होती, आणि त्याकरितां त्या नक्षत्रास आग्रहायणी नांव पडलें असलें पाहिजे. " आतां पौर्णिमेला जर चंद्र मृगांत आहे व त्या वेळीं वसंतसंपात मृगांत असून वर्षारंभ जर वसंतसंपातीं सूर्य असतांना होतो आहे, तर सूर्यहि तेव्हां मृगांतच आला, पण तो दिवस पौर्णिमेचा आहे हें विसरतां कामा नये. सूर्यचंद्र त्या दिवशीं समोरासमोर असावयाचे; म्हणजे अशी स्थिति होणें शक्य नाहीं असें होतें. म्हणून त्या वेळचें वर्षारंभ धरण्याचें तत्त्व तरी कांहीं निराळें असलें पाहिजे, अथवा मार्गशीर्ष महिना वर्षारंभाचा महिना नसला पाहिजे, किंवा अग्रहायणाचा वरचा अर्थ नसून दुसरा कांहीं तरी असला पाहिजे. यांपैकी पहिली व शेवटची गोष्ट म्हणजे वसंतांत वर्षारंभ व अग्रहायणाचा वर दिलेला अर्थ, ह्या दीक्षितांस मान्य आहेत. अर्थात् मार्गशीर्ष हा वर्षारंभाचा महिना नव्हता हें सिद्ध होतें.

---

* भा. ज्यो. पा। १२३-१२४.

आतां उदगयनीं वर्षारंभ होत नव्हता असें जें दीक्षितांचें म्हणणें आहे, त्याचा थोडा विचार करूं. "न पूर्वयोः फल्गुन्योरग्निमादधीत। एषा वै जघन्या रात्रिः संवत्सरस्य। यत्पूर्वे फल्गुनी॥ उत्तरयोः [ फल्गुन्योः ] आदधीत। एषा वै प्रथमा रात्रिः संवत्सरस्य। यदुत्तरे फल्गुनी। मुखत एव संवत्सरस्याग्निमाधाय। वसीयान् भवति" [ तै. ब्रा. १-१-२ ] या तैत्तिरीय ब्राह्मणांतील वाक्यामध्यें पूर्वाफल्गुनी संवत्सराची शेवटची रात्र व उत्तराफल्गुनी ही पहिली रात्र असें म्हटलें आहे. यावर दीक्षित म्हणतात, "वेदकालीं महिने चांद्र होते; तेव्हां वर्षारंभ चांद्रमासाच्या आरंभीं होत असे हें उघड आहे. तेव्हां वरील वाक्यांतील पूर्वाफल्गुनी हें चांद्रमासाचें शेवटचें नक्षत्र आणि उत्तराफल्गुनी हें पुढील मासाचें आरंभींचें नक्षत्र आहे हें उघड आहे. हे मास पूर्णिमान्त होते असें दीक्षितांचें मत आहेच. आतां पूर्णिमेला चंद्र उत्तराफल्गुनीवर असतांना जर वर्षारंभ होतो, तर हा वर्षारंभ कोणत्या प्रकारचा असला पाहिजे ? सूर्य त्या वेळीं उत्तराभाद्रपदाजवळ असणार. व जर हा वर्षारंभ वसंतारंभींचा असेल तर वसंतसंपात उत्तराभाद्रपदांत आला; म्हणजे जवळ जवळ आजची स्थिति किंवा सुमारें २१००० वर्षांमागची स्थिति आली. पण तै. ब्रा. काल इतका जुना आहे असें दीक्षितांस कधींही कबूल असणार नाहीं. अर्थात् हा वर्षारंभ वसंतारंभींचा नव्हे; उदगयनाबरोबरचाच असला पाहिजे. आतां तैत्तिरीय संहितेंतील संवत्सरसत्रांत दिलेल्या तीन वर्षारंभाच्या विचारावरून, फल्गुनीपूर्णमासी होणारा वर्षारंभ त्या वेळीं चालू नसून त्याच्या मागें केव्हां तरी तो चालू होता हें उघड होतें. त्या संहिताकालाच्या पूर्वी वसंतसंपात मृगांत होता हें दीक्षित कबूल करतातच. एवंच तो वर्षारंभ उदगयनीं होणाराच होता हें लो. टिळकांचें म्हणणेंच खरें दिसतें.

मार्गशीर्ष महिना वर्षारंभाचा महिना होता हें दाखविण्यास दीक्षितांनीं अल्बिरुणीच्या ग्रंथाचा आधार दिला आहे. ते म्हणतात–" त्यानें [ अल्बिरुणीनें ] लिहिलें आहे कीं, सिंध वगैरे प्रांतांत मार्गशीर्षांत वर्षारंभ होतो."* पण हा वर्षारंभ उत्तरायणाबरोबरचाहि नव्हे, वसंतारंभींचाहि नव्हे, हें वर व पुढें सांगितलेंच आहे. मग तो दुसऱ्या कोणत्या प्रकारचा असेल तर कोण जाणे".

याप्रमाणें दीक्षितांनीं काढलेल्या दोन आक्षेपांचा थोडा विचार केला. आतां हे आक्षेप खरे आहेत असें जरी क्षणभर मानलें, तरी त्यावरून लो. टिळ

---

* भा. ज्यो. पृ. ११३.

कांनीं काढलेल्या अनुमानांना कांहीं बाध येत नाहीं, हें दीक्षितांनींहि सांगितलेलें आहे. या अनुमानासंबंधानें दीक्षित लिहितात कीं, " या अनुमानांनीं वेदकालाची उत्तर मर्यादाच काय ती स्थूलमानानें निश्चित करतां येते. त्याची पूर्व मर्यादा कोणी ठरवावी ? ती शकापूर्वी सुमारें ६००० वर्षें याहून अर्वाचीन नाहीं, एवढें खास. याच्या पूर्वीं वेदमंत्र कधी प्रकट झाले हें कोणासाहि सांगतां येणार नाहीं. "

तात्पर्य, वेदकालसंबंधानें लो. टिळकांनीं घातलेल्या मर्यादा आतां सर्वांस ग्राह्य झाल्या आहेत. दुसऱ्याहि अगदीं निराळ्या गोष्टींवरून जर्मनींतील बान युनिव्हर्सिटींतील डॉक्टर जाकोबी यानें हींच अनुमानें काढिलीं * आहेत. शिवाय आपलेकडील विद्यमान ज्योतिःशास्त्रविशारद रा. रा. वें. बा. केतकर यांनीं तैत्तिरीय ब्राह्मणांतील [ ३, १, १५ ] " बृहस्पतिः प्रथमं जायमानः तिष्यं नक्षत्रं प्रादुर्बभूव" । या वचनावरून त्याचें गणित करून बृहस्पतिकृत तिष्य नक्षत्राच्या अधिक्रमणाचा काळ इ. स. पूर्वीं ४६५० वर्षे असा काढिला आहे. याहि गोष्टीवरून त्या अनुमानास आणखी बळकटी येते. मोक्षमुल्लर, हौ, वगैरे लोकांनीं काढिलेल्या वेदकालावर तर भिस्त ठेवावयासच नको. असो.

अशाप्रकारचें पुस्तक मराठी वाचकास जरासें कठीण वाटण्याचा संभव आहे. परंतु खरोखर तें कठीण नाहीं. कारण हें समजण्याला ज्योतिःशास्त्राची जरी माहिती थोडीशी पाहिजे, तरी गणिताची त्यामध्यें मुळींच मानगड नाहीं. कांहीं ज्योतिःशास्त्रविषयक नांवांचे अर्थ मीं टीपांत दिलेले आहेतच. त्यावरून एकंदर मजकूर समजण्यास सुलभ होईल. तरी यासंबंधानें कै० दीक्षितांच्या ज्योतिर्विलास नांवाच्या पुस्तकाचीं पहिलीं कांहीं प्रकरणें वाचणें सोईचें होईल. त्यांत विशेषतः दिव्य भ्रमण, देवांचीं मंदिरें व पंचांग, हीं प्रकरणें अवश्य वाचावीं. भारतीय ज्योतिःशास्त्र या पुस्तकाचाही बराच उपयोग होईल.


शेवटीं मूळ ग्रंथकर्ते लो. टिळक यांनीं हें पुस्तक पसंत करून तें प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली याबद्दल त्यांचे आभार मानून ही प्रस्तावना पुरी करतों.

जगन्नाथाची चाळ, मुंबई
पौष वद्य १०, शके १८२९.

के. ल. ओगले.

---

* आर्क्टिक होम इन् धि वेदाज्ची प्रस्तावना पान १ पहा.


शुनिष सचिन-शुष्मा लिङ्गः । ऋ० १-३३-१६.
यद्दृत्वं मार्विन मृग तनुत्वं नायसारवधीः । ऋ. १-८०
शिरोन्वस्य रावित । ऋ. १०-८६-५.
अस्य स्वस्य अनिन्दति कर्णे वराहयुः ऋ. १०-८६-४
यौ ते श्वानौ यम रक्षितारौ चतुरक्षौ पथीरक्षी । ऋ. १०-[illegible]

# वेदकालनिर्णय.

आपले वेद हे प्रस्तुत उपलब्ध असलेल्या सर्व ग्रंथांमध्ये अत्यंत प्राचीन आहेत याविषयीं आतां कोणासहि शंका नाहीं. मानवजातीचा निदान त्यांपैकीं आर्यशाखेचा तरी अतिप्राचीन इतिहास समजण्यास वेदांसारखें दुसरें कोणतेंच साधन नाहीं, अशी मॅक्समुल्लरप्रभृति पाश्चात्य संस्कृतज्ञ पंडितांची सुद्धां पूर्ण खात्री झालेली आहे. यासाठीं या वैदिक ऋचा सहजगत्या रचण्यास, आदिकवि वाल्मीकीप्रमाणेंच, अत्यंत प्राचीन अशा वैदिक ऋषींना ज्या काळीं स्फूर्ति होत होती त्या काळाचें मान साधारणपणें तरी निश्चित करणें हें फार महत्त्वाचें आहे. आतांपर्यंत, वेदकालाशी तुलना केली असतां ज्यांना अगदीं अर्वाचीन म्हणावें लागेल अशा गौतमबुद्धादिकांपासून तों शंकराचार्यांच्या हातून बौद्धधर्माचा पाडाव होऊन अद्वैतवेदांतमताची स्थापना होईपर्यंत घडलेल्या गोष्टींचा, कित्येक ग्रीक ग्रंथ, अशोक राजाचे शिलालेख, तसेंच कित्येक चिनी प्रवाशांचीं वर्णनें या व दुसऱ्या कित्येक कमीजास्त महत्त्वाच्या साधनांच्या साहाय्यानें, सरासरी कालानुक्रम लागला आहे. परंतु या कालाच्या पलीकडे गेलें असतां आर्यावर्ताच्या इतिहासाविषयीं निश्चित असें कांहींच समजत नाहीं; व त्या सर्वांत जुना परंतु मानवजातीच्या इतिहाससंशोधकास अत्यंत महत्त्वाचा असा जो ऋग्वेदकाल, त्या संबंधानें तर सध्या केवळ अंधुक अंधुक असे तर्कच चालले आहेत.

तर मग वेदकाल निश्चित करणें शक्य तरी आहे कीं नाहीं ? या प्रश्नानें पुष्कळ प्राचीन व अर्वाचीन विद्वानांच्या बुद्धीला आजपर्यन्त चकविलें आहे व ( टिळक ह्मणतात ) जरी आम्हीं या विषयावर लिहिण्याचें धाडस केलें आहे, तरी प्रस्तुत प्रश्नाचा सांगोपांग विचार करून *अखेरचा निकाल लावला असें कांहीं ह्मणतां यावयाचें नाहीं. तरी या विवेचनाच्या योगानें आर्य लोकांच्या अतिप्राचीन सुधारणाकाळावर थोडा तरी अधिक प्रकाश पडेल असें वाटतें. परंतु तें ठरविण्याचें काम विद्वानांकडेच सोंपविलें पाहिजे.

या विवेचनास सुरुवात करण्यापूर्वी वेदकालनिर्णय करण्याकरितां विद्वान् लोकांनीं आजपर्यन्त कोणकोणत्या पद्धतींचा स्वीकार केला आहे, हें थोडें पाहूं. मॅक्समुल्लरप्रभृति लोकांनीं भाषापद्धतीचा उपयोग केला आहे. या पद्धतीप्रमाणें एकंदर वेदकालाचे छंदःकाल, मंत्रकाल, ब्राह्मणकाल आणि सूत्रकाल असे चार भाग होतात. अशाप्रकारचे चार भाग कल्पून प्रत्येक भागाला दोन दोनशें वर्षें देऊन मॅक्समुल्लरनें ऋग्वेदकालाचा अवधि ८०० वर्षांचा मानिला व ज्या अर्थी हे सर्व काल ×बुद्धाच्या कालाच्या पूर्वींचे आहेत त्या अर्थी त्या कालापासून मागें ८०० वर्षें मोजलीं कीं, वेदकाल सुमारें इ. स. पू. १२०० वर्षांपर्यंत जाऊन ठेपतो.

परंतु ही पद्धति बरीच सदोष आहे. कारण या पद्धतीचाच स्वीकार करून निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें झालीं आहेत. कोणी वर सांगितलेल्या चार भागांऐवजीं तीनच समजतात. कोणी चार समजूनहि प्रत्येक भागाला दोनशें वर्षें देण्याऐवजीं अधिक देतात. डॉ. हौ यानें या प्रत्येक भागाला ५०० वर्षें देऊन वेदकालाचा आरंभ इ. स. पूर्वी २४०० पासून २००० पर्यंत ठर-

* मूळ पुस्तक रा. टिळक यांनीं १८९३ च्या सुमारास लिहिलें. आतां त्यांतील कालनिर्णय बहुमान्य झाला आहे.

× गौतम बुद्ध इ. स. पूर्वी ५०० वर्षांच्या सुमारास होऊन गेला असें विद्वान् लोकांचें मत आहे.

विला आहे. म्हणून अशा रीतीनें ही पद्धति अगदीं अनिश्चित असल्यामुळें वेदकाल निश्चित करण्याकरितां हिचा फारसा उपयोग होणार नाहीं.

आतां दुसरी ज्योतिषपद्धति. वेद, ब्राह्मणें व सूत्रें यांत ज्योतिषाविषयीं जें कांहीं उल्लेख आलेले आहेत, त्यांवरून आपणांस आर्यसुधारणेचा अगदीं जुना काळ निश्चित करतां येईल असें बऱ्याच जणांस वाटत होतें. परंतु या दिशेच्या प्रयत्नांस त्यांस वाटलें होतें तितकें यश आलें नाहीं. कारण सांप्रत जे ज्योतिषविषयक ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांपैकीं वेदांगज्योतिष खेरीजकरून सगळे अर्वाचीन काळचे आहेत. या ग्रंथांमध्यें ग्रीक लोकांच्या ज्योतिषाचीहि भर पडलेली असल्यामुळें, तसेंच त्यांमध्यें कालमापनाच्या रीती निरनिराळ्या असल्यामुळें व दुसऱ्या कित्येक कारणांमुळें, अर्वाचीन ग्रंथांमध्यें आढळून येणाऱ्या ज्योतिषविषयक गोष्टींचा बरोबर अर्थ लावणें बरेंच दुर्घट होतें. याशिवाय दुसऱ्याहि कांहीं भासमान अडचणी या पद्धतींत आहेत. उदाहरणार्थ, कांहीं लोकांनीं वेदाइतक्या जुन्या काळीं अयनांतबिंदु, *संपातबिंदु, वगैरे गोष्टींचें यथार्थ ज्ञान होणें संभवनीय नाहीं, अशी शंका काढिली आहे. या शंकामध्यें तथ्य किती आहे हें आपण पुढें पाहूं. सध्या इतकें सांगणें अवश्य आहे, कीं असल्याप्रकारच्या शंका काढून, वेदांमध्यें आढळणाऱ्या प्रत्यक्ष वर्णन केलेल्या अशा ज्योतिषविषयक गोष्टींनांहि कांहीं संस्कृतज्ञ पंडितांनीं निरर्थक म्हटलें आहे.

---

* सूर्याचा ( वास्तविक पृथ्वीचा ) नक्षत्रांतून फिरण्याचा मार्ग म्हणजे क्रान्तिवृत्त व आकाशाचें विषुववृत्त हीं दोन्ही एका पातळींत नाहींत. त्यांमध्यें सुमारें २३½ अंशांचा कोन आहे. म्हणजे हीं दोन वर्तुळें एकमेकांस दोन बिंदूंत छेदितात. ह्या छेदनबिंदूंस संपात म्हणतात. यांपैकीं ज्या संपाताजवळ सूर्य आला म्हणजे वसंत ऋतूला आरंभ होतो तो वसंतसंपात व दुसरा शरत्संपात. या बिंदूपासून ९० अंशावर असलेले जे दुसरे बिंदू त्यांस अयनबिंदू म्हणतात एक उत्तरायण व दुसरा दक्षिणायन बिंदु. आतां या वर सांगितलेल्या वर्तुळांपैकीं पहिलें म्हणजे क्रांतिवृत्त हें स्थिर आहे; परंतु दुसरें जें विषुववृत्त तें चल आहे. त्यामुळें त्यांना छेदणारे संपातबिंदूही चल आहेत. संपातचलन किंवा अयनचलन जें म्हणतात तें विषुववृत्त चल असल्यामुळेंच होतें.

परंतु या ज्योतिषपद्धतीला नांवें ठेवण्यांत पाश्चात्य पंडित लोकांनीं फाजील सावधपणा दाखविला आहे असें म्हणावें लागतें. या पद्धतीमध्यें अडचणी नाहींत असें नाहीं. परंतु या लोकांनीं त्याचा विनाकारण फाजील बाऊ करून ठेविला आहे. मुख्य मुद्दा लक्षांत ठेऊन त्यांत मिसळलेल्या इतर वायफळ गोष्टि त्यांतून काढून टाकण्याचा योग्य प्रयत्न न झाल्यामुळें अशाप्रकारच्या चुका त्यांच्याकडून झाल्या आहेत. बेंटलेप्रभृति कित्येक लोकांनीं या पद्धतीचा स्वीकार करतानां पुराणांतील गोष्टींवर व शब्दव्युत्पत्तीवर बराच भार ठेविला आहे. परंतु त्या गोष्टींना प्रत्यक्ष वेदांमध्यें किती आधार आहे हें पहाण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. कारण पुराणांतील गोष्टी वेदांतील गोष्टींचीं कित्येक रूपान्तरें होऊन झाल्या आहेत व असें होतांना त्यामध्यें दुसऱ्याहि कित्येक गोष्टी मिसळल्या आहेत. यासाठीं त्यांना वेदांमध्यें आधार सांपडल्यावांचून त्यांवरून कोणतींहि निश्चित अनुमानें काढणें रास्त होणार नाहीं. म्हणून पुढील विवेचनामध्यें, संहिता, ब्राह्मणें व त्या सर्वांत जुना जो ऋग्वेद त्यामध्यें आढळणाऱ्या उल्लेखांवरून भारतीय वाङ्मयाचें भौगोलिक व ऐतिहासिक आधारांवरून ठरविलेलें प्राचीनत्व पूर्णपणें स्थापन करितां येईल असें दाखविण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. असल्याप्रकारचे प्रयत्न गोडबोले, दीक्षितप्रभृति भारतीय ज्योतिर्विदांनीं केले आहेत, परंतु त्यांकडे जावें तितकें विद्वानांचें लक्ष गेलें नाहीं. पुढील विवेचन त्यांनीं चालू केलेल्या प्रतिपादनाचीच पूरणिका आहे, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

वेदकालाचा निर्णय करण्याकरितां ज्या वेदवाक्यांचा आधार घ्यावयाचा तीं कशाप्रकारचीं असतील, हें थोडें पाहिलें पाहिजे. वेदकाळीं आतांच्यासारखीं वेधयंत्रें नव्हतीं हें स्पष्टच आहे. अर्थात् त्या वेळीं फक्त डोळ्यांनींच जें दिसेल त्यावरून सर्व अनुमानें बांधावीं लागत. म्हणून त्या डोळ्यांच्या वेधांमध्यें सूक्ष्म गणिताची गरज मुळींच नव्हती. अगदीं ढोबळ प्रमाणावरच सर्व गणित होतें. अर्थात वर्षमानहि आतांच्या इतकें सूक्ष्म ठरलें नव्हतें. वर्षांतील निरनिराळे काळ म्हणजे ऋतु यांचें एक चक्र संपून दुसरें सुरू झालें म्हणजे दुसरें वर्षहि चालू होत असे. त्या वेळीं कालमान सर्व लोकांस समजण्यासाठीं

आतांच्याप्रमाणें पंचांगाची व्यवस्था नव्हती हें खरें. तरीपण कांहींतरी तसें साधन त्या लोकांनीं करून ठेविलें होतें यांत संशय नाहीं. कालमापनाच्या हल्लीं ज्या सावन चांद्र, नाक्षत्र व सौर अशा रीती आहेत, त्यांचा वैदिक ग्रंथांमध्यें कोठेंहीं उल्लेख नाहीं व वेदांगज्योतिषाखेरीज दुसरा कोणताहि पंचांगसाधनावर जुना ग्रंथ नाहीं. यासाठीं त्यांची कालमापनाची रीति कशी होती हें फक्त कित्येक वेदांतील उल्लेखांवरून अथवा यज्ञग्रंथांत वर्णन केलेल्या जुन्या दंतकथांवरूनच समजून घेतलें पाहिजे. ऋग्वेदांतील कित्येक यागसूक्तांवरून यज्ञयागपद्धति त्या वेळीं बरीच प्रौढ दशेस आली होती, हें उघड दिसतें. व इतकी स्थिति महिने, ऋतु व वर्ष यांचें चांगलें ज्ञान झाल्याशिवाय होणें संभवनीय दिसत नाहीं. यासाठीं त्या वेळीं कालनिश्चय करण्यासाठीं कांहींतरी व्यवस्था वैदिक ऋषींनीं करून ठेविली असलीच पाहिजे असें उघड होतें. आतां या व्यवस्थेचें निश्चित स्वरूप जरी समजलें नाहीं, तरी यज्ञयागसंबंधीं ग्रंथांवरून इतकें दिसतें कीं, चंद्राचे वृद्धिक्षय, ऋतूंचे भेद व सूर्याचीं दक्षिण व उत्तर अशीं दोन अयनें, ह्या त्या काळीं कालमापनाच्या मुख्य मुख्य खुणा होत्या. दुसरी विशेष गोष्ट अशी आहे कीं, जुने याग किंवा सत्रें यांतील मुख्य गोष्टी व संवत्सरांतील मुख्य गोष्टी या एकच आहेत. हीं सत्रें एक एक वर्षाचीं असत व तीं सूर्याच्या वार्षिक गतीच्या अनुरोधानेंच केवळ बसविलेलीं असत. त्यांचे सहा सहा महिन्यांचे दोन भाग करून प्रत्येक महिन्याला तीस तीस दिवस दिलले असत. या दोन भागांच्या बरोबर मध्यें विषूवान् म्हणजे मध्यदिवस अथवा विषुवदिन हा असे. यावरून असें उघड दिसतें कीं वैदिक ऋषींनीं आपलें पंचांग मुख्यत्वेंकरून यागकर्मासाठींच केलें होतें, व तसेंच यज्ञयाग नियमित वेळीं करण्याच्या योगानें पंचांगाची व्यवस्थाहि बरोबर रहात असे. या वार्षिक सत्रांमध्यें आहुतीचे काल म्हणजे रोजचे प्रात:काळ व सायंकाळ, दर्शमास, पूर्णमास व प्रत्येक ऋतूचा व अयनाचा आरंभ हे होते.* अशा रीतीनें सत्र पुरें झालें म्हणजे वर्षहि पुरें होत असे; व ह्मणून संवत्सर व

* पहा-बौधायनसूत्र २·४-२३, मनुस्मृति ४-२५, २६

यज्ञ हे दोन शब्द बहुतेक समानार्थकच झाले होते. " संवत्सरः प्रजापतिः ॥ प्रजापतिर्यज्ञः । *" या ऐतरेय ब्राह्मणांतील व " यज्ञो वै प्रजापतिः । संवत्सरः प्रजापतिः । " या तैत्तिरीय संहितेंतील वाक्यांवरून तर हें अगदीं उघड उघड होतें. असो.

आतां या संवत्सराचे ऊर्फ यज्ञाचे जे मुख्य भाग त्यांचें थोडेसें परीक्षण केलें पाहिजे. कालमापनामध्यें मूल परिमाण सावन दिवस हें धरीत असत. अशा तीस सावन दिवसांचा एक महिना व अशा बारा महिन्यांचें ह्मणजे ३६० सावन दिवसांचें एक वर्ष होत असे. परंतु तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरून प्राचीन आर्य लोक चंद्रावरूनच महिने ठरवीत असें दिसतें. परंतु तीस सावन दिवसांचा महिना चांद्र महिन्याबरोबर जमणें शक्य नाहीं. ह्मणून सावन व चांद्र महिन्यांचा मेळ घालण्यासाठीं सावन महिन्यांतून एक एक दिवस गाळीत असत. परंतु पुढें जेव्हां चांद्र × व सौर वर्षांचाहि मेळ घालणें जरूर पडलें, तेव्हां त्यासाठीं अधिक दिवस अथवा अधिक मास धरण्याची युक्ति प्राचीन आर्य लोकांनीं काढिली, असें दिसतें. तैत्तिरीय व वाजसनेयी-संहितेमध्यें अधिक महिन्याचा उल्लेख असलेलीं बरीच वाक्यें आहेत व ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांतहि, ऽ "वेद मासो धृतव्रतो द्वादश प्रजावतः । वेदा य उपजायते । " असें ह्मटलें आहे. ही अधिक दिवस किंवा अधिक मास धरण्याची पद्धति मागाहूनची असावी असें कित्येकांचें मत आहे; परंतु तें निरर्थक आहे. कारण ऋतुमानावरून वर्षाचा अंदाज करणें

---

* ऐतरेयब्राह्मण २-७; ४-२२. तैत्तिरीयसंहिता १-५-७-३ आणि ७-५-७-४ तसेंच ७-२-१०-३.

×बारा चांद्र मास ह्मणजे एक चांद्र वर्ष. चांद्र मासहि दोनप्रकारचे असतात. एका नक्षत्रांत आल्यापासून पुन्हा त्याच नक्षत्रांत यावयास जो काल लागतो तो नाक्षत्र मास, व एका अमावास्येपासून दुसऱ्या अमावास्येपर्यंतचा जो काल त्यास अमामास म्हणतात. नेहमीं अमामासच घ्यावयाचे असतात.

ऽ ऋ. १-२५-८.

हें फारसें कठीण नाहीं. खरोखर ऋतूंच्या चक्रावरूनच वर्षाची कल्पना प्राचीन काळीं बसविलेली होती. असें जर आहे तर बारा चांद्र महिन्याचा काळ ऋतुचक्राच्या पेक्षां बारा दिवसांनीं कमी असतो ही साधी गोष्ट मात्र त्या लोकांना समजण्यास कठीण होती असें म्हणणें जरा धाडसाचेंच आहे. या बारा दिवसांचेहि उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आले आहेत व ते सौर वर्षाशीं चांद्र वर्षाचा मेळ बसविण्यासाठींच धरीत होते, हें त्यांवरून उघड दिसतें.

परंतु हें सौर* वर्ष नाक्षत्र होतें, कीं सांपातिक होतें हेंहि पाहिलें पाहिजे. सौर वर्षाची कल्पना ऋतुचक्रावरून करीत हें खरें. तरी संपातचलनामुळें ऋतूंमध्यें होणारा फेर इतका सूक्ष्म आहे कीं, तो दृष्टोत्पत्तीस यावयास शेंकडों वर्षें पाहिजेत. तेव्हां इतका सूक्ष्म फरक प्राचीन आर्यांच्या नजरेस आला असेल असें दिसत नाहीं. कारण सूर्याची क्रान्तिवृत्तांतील जागा ठरविण्याचें मुख्य साधन म्हणजे रोज सकाळीं सूर्याजवळ असलेल्या स्थिर तारका पहाणें हेंच होतें. सूर्यसिद्धांताच्या काळीं यद्यपि अयनगतीचा शोध लागला होता, तरी त्यांत सौर वर्षमान नाक्षत्रच धरिलें आहे व या संपाताच्या गतीविषयीं कोणत्याहि वैदिक ग्रंथांत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष उल्लेख नाहींत. म्हणून यज्ञ ऊर्फ संवत्सर हा आयनिक सौर नसून नाक्षत्र सौर होता, यांत संशय नाहीं. परंतु हें वर्षमान धरिल्या

* वर्षाचे बरेच प्रकार आहेत. सूर्य एकाद्या नक्षत्रांत आल्यापासून पुनः त्याच नक्षत्रांत यावयास त्याला जो काळ लागतो, त्यास नाक्षत्र सौर वर्ष म्हणतात, व एकदां संपातांत आल्यापासून पुनः त्याच संपातांत येईपर्यंत त्याला जो वेळ लागतो त्यास सांपातिक किंवा आयनिक सौर वर्ष म्हणावें. संपात चल असल्यामुळें दर वर्षास ते थोडे मागें येतात. या कारणास्तव नाक्षत्र सौर वर्षापेक्षां सांपातिक सौर वर्ष थोडें [ सुमारें एक घटिका ] कमी असतें.

सुमारे दर दोन* हजार वर्षांनीं ऋतुचक्राशीं मेळ ठेवण्यासाठीं वर्षारंभ बदलावा लागेल व अशाप्रकारचे फेरफार वर्षारंभांत खरोखरच केलेले आहेत; ही गोष्ट वरील विधानास म्हणजे वर्षमान सांपातिक नसून नाक्षत्र होतें या म्हणण्यासच जास्त पुष्टि आणितें.

आतां हा वर्षारंभ केव्हां धरीत असत हें पहाणें आहे. वर सांगितलेंच आहे कीं संवत्सर व यज्ञ हे शब्द बहुतेक समानार्थकच होते; व म्हणून त्या दोघांचा आरंभहि अर्थात् एकदमच होत असला पाहिजे. वेदांगज्योतिषामध्यें संवत्सराला उत्तरायणापसून आरंभ केलेला आहे व श्रौतसूत्रांमध्येंहि **गवामयना**दि वार्षिक सत्रांचा आरंभ तेव्हांपासूनच करावा असें सांगितलें आहे.× देवसंबंधीं सर्व कर्मे उत्तरायणामध्येंच केलीं पाहिजेत, असें जैमिन्यादिकांचें मत आहे. तसेंच कित्येक ज्योतिषग्रंथांत दिल्याप्रमाणें उत्तरायण म्हणजे मकरसंक्रमणापासून कर्कसंक्रमणापर्यंतचा काल होय. यावरून मकरसंक्रमण हा संवत्सराचा तसाच उत्तरायणाचाहि जुन्या वैदिककाळीं आरंभ असावा असें प्रथमदर्शनीं कोणास वाटेल, परंतु जरा सूक्ष्मपणें वार्षिक सत्रांतील प्रयोगांचें निरीक्षण केल्यास मकरसंक्रमण हा या सत्रांचा आरंभ नसला पाहिजे असेंच आढळून येईल. कारण पूर्वीं सांगितलेंच

---

* सांपातिक वर्ष नाक्षत्र वर्षापेक्षां स्थूलमानानें एका घटिकेनें लहान आहे. म्हणून आज जर चैत्रारंभी वसंत सुरू झाला तर सुमारें १८०० वर्षांनीं किंवा अगदीं स्थूल मानानें म्हटल्यास २००० वर्षांनीं तो फाल्गुनारंभीं होऊं लागेल. म्हणून वर्षारंभ जर वसंतारंभीं ठेवावयाचा असेल तर तो २००० वर्षांनीं चैत्रांत न करतां फाल्गुनांत करावा लागेल. आणखी दोन हजार वर्षांनीं माघांत करावा लागेल. तो अशा रीतीनें दर दोन हजार वर्षांनीं वर्षारंभ एक एक महिना मागें आणावा लागेल. संपात चल आहेत व वसंतसंपातांत सूर्य येईल त्या वेळेस वसंत ऋतूस सुरुवात होते. म्हणजे एक ऋतुपर्याय म्हणजे सांपातिक सौर वर्ष असा अर्थ झाला हें स्पष्टच आहे.

× वेदांगज्योतिष ५ व आश्वलायनश्रौतसूत्र १·२-१४-१; २-२-१४ ३ व २२.

आहे कीं, विषुवदिनाच्या योगानें जसे वर्षाचे तसे विषूवान् दिवसाच्या योगानें वार्षिक सत्राचे दोन समान भाग होतात.* सत्र हें वर्षाचें प्रतिबिंबच होतें व म्हणून प्रथमतः तरी त्याचें वर्षाशीं सर्वांशीं साम्य असलें पाहिजे. परंतु वरील कल्पनेप्रमाणें वर्षारंभ मकरसंक्रमणीं धरल्यास, विषूवान् दिवस खरोखर विषुव-दिवशीं म्हणजे संपातदिवशीं न येतां कर्कसंक्रमणीं येईल व त्यामुळें त्याचा 'समान अहोरात्राचा दिवस' असा जो अर्थ तो निरर्थक होईल;परंतु असें म्हणणें नीट नाहीं. कारण केव्हां तरी त्या शब्दाची योजना सार्थ होत असलीच पाहिजे. हें म्हणणें सत्राला जरी लागू नसलें, तरी निदान वर्षाला लागू असलेंच पाहिजे; म्हणजे अर्थात् विषूवान् हें नांव सार्थ होण्यास वर्षारंभ संपातीं झाला पाहिजे. आतां उत्तरायण या शब्दाचेहि दोन अर्थ होऊं शकतात.× एक वर सांगितलेला म्हणजे मकरपासून कर्कसंक्रमणापर्यंतचा काळ, व दुसरा म्हणजे वसंतसंपातापासून शारदसंपातापर्यंतचा काळ. पहिल्या अर्थाप्रमाणें सूर्य उत्तरेकडे वळला कीं उत्तरायण सुरू होतें, व दुसऱ्या अर्थाप्रमाणें उत्तरगोलार्धांत सूर्य जाऊं लागला म्हणजे उत्तरायण होतें. पहिल्या अर्थाप्रमाणें वर्षारंभ मकरसंक्रमणीं व दुसऱ्या अर्थाप्रमाणें तो वसंतसंपातीं धरला पाहिजे; परंतु वार्षिक सत्रांतील मधल्या दिवसाला विषूवान् दिवस म्हणणें तसेंच वसंताला ऽ ऋतूचें मुख म्हणणें व

* ऐतरेयब्राह्मण ४-२२. तैत्तिरीयब्राह्मण १-२-३-१. तांड्यब्राह्मण ४-७-१.

× सूर्याचें क्षितिजावरचें उदयस्थान नेहमीं एक नसतें, हें सर्वांस माहीत आहेच. वसंतऋतूला ज्या दिवशीं आरंभ होतो, त्या दिवशीं सूर्य बरोबर पूर्वेस उगवतो. त्यानंतर तो थोडा थोडा उत्तरेकडे उगवून तीन महिन्यांनीं उत्तर सीमेवर जातो व नंतर पुनः दक्षिणेकडे वळूं लागतो; तो सहा महि-न्यांनीं दक्षिण सीमेवर जातो. या सहा महिन्यांना दक्षिणायन व म्हणून पुढच्या सहा महिन्यांना उत्तरायण म्हणणें हा पहिला अर्थ. पूर्वेस उगवूं लागल्यापासून उत्तरेकडे वळून सीमेवर गेल्यावर पुनः मागें वळून पूर्वेस उगवूं लागण्यास लागणाऱ्या सहा महिन्यांस उत्तरायण म्हणणें हा दुसरा अर्थ.

ऽ तै. ब्रा.—मुखं वा एतत् ऋतूनाम् । यद्वसंतः । (१-१-२-६).

आग्रयणेष्टि अथवा अर्धवार्षिक यज्ञ दर वसंत व शरद् या ऋतूंमध्यें करावें लागणें, या गोष्टींचा विचार करतां वर दिलेल्या दोन अर्थांपैकीं दुसराच विशेष ग्राह्य दिसतो व तोच खरा जुना अर्थ होय असें दिसतें.

वैदिक ग्रंथांमध्यें उत्तरायणाचा जो संबंध आलेला आहे तो देवयान व पितृयान यांच्या वर्णनाच्या वेळेसच काय तो आहे. ऋग्वेदामध्यें देवयान व पितृयान हे शब्द पुष्कळ वेळां आलेले * आहेत. तरी देवयान या शब्दाचा अर्थ त्यांत कोठेंहि स्पष्ट केलेला नाहीं. बृहदारण्यक व छांदोग्य या उपनिषदांमध्यें देवलोक व पितृलोक यांचें सविस्तर वर्णन आहे. × " अर्चिषोहरन्ह आपूर्यमाणपक्षमापूर्यमाणपक्षाद्यान्षण्मासानुदङ्ङादित्य इति मासेभ्यो देवलोकं तेषां न पुनरावृत्तिः । धूमाद्रात्रिं रात्रेरपक्षीयमाणपक्षमपक्षीयमाणपक्षाद्यान्षण्मासान्दक्षिणादित्य इति मासेभ्यः पितृलोकम् " । गीतेमध्येंहि अशाचप्रकारचें वर्णन आहे. ऽ" अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।" व लगेच पुढें "धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् । " असें म्हटलें आहे. परंतु, **जोंपर्यंत सूर्य उत्तरेकडे असतो ते सहा महिने अथवा उत्तरायणाचे सहा महिने** अशा अर्थाचे जे वर शब्द आले आहेत त्याचा अर्थ काय? सर्व टीकाकारांच्या मतें त्यांचा अर्थ मकरसंक्रमणापासून कर्कसंक्रमणापर्यंतचे सहा महिने असा आहे. परंतु हा अर्थ वैदिक ग्रंथांतील वर्णनाच्या अगदीं उलट आहे. वर सांगितल्याप्रमाणें उत्तरायणाचे दोन्ही अर्थ होऊं शकतील, परंतु शतपथब्राह्मणामध्यें देवांचे ऋतु व पितरांचे ऋतु सांगितले आहेत त्यांत " वसंतो ग्रीष्मो वर्षा । ते देवा ऋतवः । शरद्धेमंतः शिशिरस्ते पितरो...स यत्र उदगावर्तते देवेषु तर्हि भवति देवांस्तर्ह्यभिगोपायति—अथ यत्र दक्षिणावर्तते पितृषु तर्हि भवति

* ऋग्वेद १-७२-७ व १०-२-७.

× बृहदारण्यक ६-२-१५.

ऽ प्रो. भानूंच्या मतें " अग्निर्ज्योति " याच्या ठिकाणीं " अग्निज्योति " असा पाठ असता तर बरें झालें असतें. ( श्रीमद्भगवद्गीता-उपसंहार-भगवद्गीतेचा अभ्यास, पान २३ पहा. )

प्रत २०७



पितृंस्तर्ह्यभिगोपायति ”। असें म्हटलें आहे. यावरून उत्तरायणाच्या अर्था-विषयीं असलेल्या सर्व शंका नाहींशा होतील. जर वसंत, ग्रीष्म व वर्षा हे देवऋतु आहेत व सूर्य जेव्हां उत्तरेकडे वळतो तेव्हां तो जर देवांमध्यें असतो, तर उघडच उत्तरायणाचा आरंभ वसंतसंपातापासूनच झाला पाहिजे. मकर-संक्रमणापासून त्याचा आरंभ होतो हें म्हणणें योग्य होणार नाहीं. कारण देवांचा पहिला ऋतु जो वसंत त्याला कोणत्याहि ठिकाणीं मकरसंक्रमणापासून आरंभ होत नाहीं. यासाठीं देवलोक, देवयान किंवा उत्तरायण याचा अर्थ वसंतसंपातापासून शरत्संपातापर्यंत होणाऱ्या वसंत, ग्रीष्म, वर्षा, या ऋतूंच्या सहा महिन्यांचा काळ असाच घेतला पाहिजे.

म्हणून याच्या उलट कांही पुरावा जोंपर्यंत मिळाला नाहीं, तोंपर्यंत प्राचीन वैदिककाळीं वर्षारंभ सूर्य वसंतसंपातीं असतांना होत असे असें मानावयास मुळींच हरकत नाहीं; व ज्याअर्थीं याच वेळीं सूर्य उत्तर गोलार्धांत जाई, त्याअर्थीं त्याच्या उत्तरायणाचाहि आरंभ तेव्हां सूर्य वसंतसंपातीं असतांना होत असे. यानंतर सहा महिन्यांनीं शरत्संपातीं विषुव दिन येत असे व पुढच्या सहा महिन्यांना पितृयान अथवा दक्षिणायन असें म्हणत. वर एके-ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, वैदिक कालानंतरच्या ज्योतिषग्रंथांत वर्षारंभ मकरसंक्रमणींहि दिलेला आहे. परंतु हा फेरबदल कधीं झाला असावा, हें कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि हा फरक झाल्यावर उत्तरायणाचाहि अर्थ फिरला. यासाठीं प्राचीन वैदिक गोष्टींचा अर्थ लावतांना उत्तरायणाचा ऊर्फ देवलोक किंवा देवयान याचा अर्थ नीट ध्यानांत ठेविला पाहिजे. कारण प्रसिद्ध ज्योतिषि सिद्धांतशिरोमणिकार भास्कराचार्य यांनाहि, उत्तरायण ह्मणजे देवांचा दिवस कसा अशी भ्रांति पडली होती. कारण त्यांच्या वेळीं उत्तरायणाचा प्रचलित अर्थ मकरापासून कर्कसंक्रमणाचा काळ असा होता. परंतु देवांचा दिवस म्हणजे उत्तरगोलार्धांत सूर्य असतो तो वेळ. तेव्हां उत्तरायण म्हणजे देवांचा दिवस हें जमावें कसें ? या शंकेचें भास्कराचा-

* शतपथब्राह्मण २-१-३.

यांना समाधान करतां आलें नाहीं; व " दिनोन्मुखेऽर्के तत्फलकीर्तनाय दिनमेव तन्मतम् ।" असें * म्हणून त्यांनीं कशी तरी वेळ मारून नेली आहे. परंतु त्यांना जर उत्तरायण म्हणजे वसंतसंपातापासून शरत्संपातापर्यंतचा काळ असें पूर्वी मानीत असत हें माहीत असतें, तर त्यांच्या हातून अशी चूक झाली नसती, असो.

याप्रमाणें प्राचीन वैदिकाळीं वसंतसंपातीं वर्षारंभ होत असे, परंतु काळानें तो मकरसंक्रमणीं येऊन ठेपला. हा फरक झाल्याबरोबर उत्तरायणाचाहि जुना अर्थ बदलून वर्षाच्या आयनिक विभागाचा तो दर्शक झाला. परंतु एवढ्यानेंच भागलें नाहीं. वर्षारंभाबरोबर वार्षिक सत्रांचा आरंभहि मकरसंक्रमणीं आला. तैत्तिरीय संहितेमध्यें हा फरक पूर्ण झाल्याचें दिसून येतें; व शतपथब्राह्मणांत जर उत्तरायणासंबंधीं कांहीं उल्लेख नसतां, तर त्याचा जुना अर्थ समजणें अशक्यच झालें असतें.

तरी या जुन्या पद्धतीचा अगदींच विसर पडला असें मात्र नाहीं, कारण नक्षत्रसत्रासाठीं वसंतसंपातच आरंभ धरीत असत. हल्लीं सुद्धां नर्मदेच्या दक्षिणेकडे रहाणारे लोक व्यावहारिक वर्ष × वसंत संपातापासून धरितात. आणि उत्तरायणामध्यें करावयास सांगितलेले सर्व धार्मिक विधि मकरसंक्रमणापासून आरंभ होणाऱ्या उत्तरायणांत करितात. याप्रमाणें आतांसुद्धां आपण जर दुहेरी वर्षारंभ आम्हीं धरितों, तर प्राचीन आर्यांनीं जुनी पद्धत टाकून देण्याच्या भीतीनें दुहेरी पद्धत स्वीकारली असल्यास त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं.

---

* गोलाध्याय ७–११ व १२.

× खरें पाहिलें असतां हल्लीं वसंतसंपातीं सूर्य येतो तेव्हां फाल्गुन महिना असतो व आपल्या वर्षाला आरंभ चैत्रापासून होतो. पांचव्या शतकांत नक्षत्रांना अश्विनीपासून आरंभ करण्याचा जेव्हां प्रघात पडला, त्या वेळीं वसंतऋतूस खरोखर चैत्रांत सुरुवात होऊन वर्षारंभहि तेव्हांच होत असे. तेव्हांपासून वसंतसंपात जरी मागें हटला आहे, तरी वर्षारंभ चैत्रांत करण्याची पद्धति तशीच कायम राहिली आहे.

आतांपर्यंत आपण असें पाहिलें कीं, प्राचीन आर्यलोकांचें वर्ष नाक्षत्र सौर होतें, महिने चांद्र होते व ते वर्षारंभ वसंत संपातापासून धरीत असत. तसेंच जेव्हां हा वर्षारंभ बदलून मकर संक्रमणापासून धरूं लागले, तेव्हां पूर्वींचा वर्षारंभ अजिबात न टाकतां त्याचा यज्ञकर्मांत उपयोग करीत असत व इतर व्यवहाराला नवीन वर्षारंभ धरीत असत. आतां संपातचलनाच्या योगानें ऋतुचक्र जसें जसें मागें येऊं लागलें तसे तसे वैदिक ऋषींनीं आपल्या पंचांगामध्येंहि फेरफार केले होते कीं काय, हें पहावयाचें आहे. हल्लींचीं आपलीं पंचांगें, वसंतसंपात रेवतीच्या चतुर्थ चरणीं आहे असें धरून केलेलीं असतात व जरी वसंतसंपात आतां रेवती पासून अठरा अंश मागें आला आहे, तरी सध्यां आपण नक्षत्रमालेला आरंभ अश्विनीपासूनच करतों. रेवतीमध्यें वसंतसंपात शा. श. ४९६ चे सुमारास होता, व तेव्हांपासून सध्यांची पद्धति सुरु झाली, असें मानून वसंतसंपाताची जागा नक्षत्रचक्रामध्यें बदलत गेल्याबद्दल कांहीं पुरावा सांपडतो कीं काय, हें आतां पहावयाचें. वर एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, वैदिक ऋषींचे आकाशसंबंधीं वेध नुसत्या डोळ्यांनींच घेतले असल्यामुळें त्यामध्यें गणिताची फारशी भानगड नाहींच. आपणहि तशाच प्रकारच्या साध्या पद्धतीचा स्वीकार केला पाहिजे. सूर्याच्या अगदीं जवळ असलेल्या तारका नित्य पहाणें हेंच त्याची गति निश्चित करण्याचें ज्यांचें साधन, त्या वैदिकऋषींनीं क्रान्तिवृत्ताचे २७ भाग* गणिताप्रमाणें केले असतील हें संभवत नाहीं. हे २७ भाग ढोबळ प्रमाणावर मुख्य मुख्य तारांच्या खुणांवरूनच केले असले पाहिजेत. ह्मणून जेव्हां सूर्य अमक्या नक्षत्रीं होता अशाप्रकारचे उल्लेख वैदिक

* कांहीं सायनवादी लोक ही गोष्ट कबूल करीत नाहींत. अगदीं प्राचीन कांळीं सुद्धां नक्षत्रें समविभागात्मक असून त्यांचा आरंभ वसंतसंपातापासून होता म्हणजे त्या संपातापासून १३°–२०′ इतक्या भागाला अश्विनी, त्यापुढें भरणी वगैरे नांवें होतीं असें त्यांचें मत आहे. पण कै. शं. बा. दीक्षित यांनीं हें म्हणणें खोडून नक्षत्रें तेव्हां तारात्मक होतीं असें दाखविलें आहे.

ग्रंथामध्यें आढळतील त्या वेळीं त्यांचा अर्थ सूर्य त्या नांवाच्या तारकापुंजाजवळ होता असेंच समजलें पाहिजे. आतां हें उघडच आहे कीं, असल्या स्थूल वेधांमध्यें दोन तीन अंशापर्यंतहि एखादे वेळीं चूक असेल, तरी ते वेदकालाइतक्या जुन्या कालचा निर्णय करण्यामध्यें अगदींच निरुपयोगी आहेत असें मात्र नाहीं. कारण सूर्याच्या क्रान्तिवृत्तांतील एखाद्या स्थितीमध्यें जरी पांच अंशांची चूक झाली तरी फक्त ३६० वर्षांचेंच अंतर आपल्या हिशोबांत चुकेल. एवढें अंतर ज्याठिकाणीं हजारांनीं काळ मोजावयाचा त्या ठिकाणीं कांहींच नाहीं म्हटलें तरी चालेल. असो. तर आपल्या पुढील विवेचनांत नक्षत्रें म्हणजे समविभागात्मक न समजतां त्या त्या नांवाचे नक्षत्रपुंज समजावयाचे. आतां जसा वसंतसंपातबिन्दु बदलत जाईल तसे अयनान्तबिन्दुहि बदलतील; व म्हणून जेव्हां वैदिक ग्रंथांमध्यें वसंतसंपाताच्या बदललेल्या स्थितीविषयीं कांहीं उल्लेख आढळेल, तेव्हां त्याच्या अनुरोधानें होणाऱ्या अयनांतांच्या फरकाबद्दलहि उल्लेख आढळले पाहिजेत. असे उल्लेख सांपडले म्हणजे आपल्या अनुमानांना अधिक पुरावा मिळाल्यासारखें होईल. तर आतां वसंतसंपाताच्या स्थितीविषयीं कोणते कोणते उल्लेख आहेत ते पाहूं व प्रथम तो कृत्तिका नक्षत्रांत होता असें सांगणाऱ्या वाक्यांचा विचार करूं.

वराहमिहिराच्या वेळीं वसंतसंपात रेवतीच्या चतुर्थचरणीं होता हें सुप्रसिद्ध आहे. परंतु त्यानें आपल्या ग्रंथामध्यें दोन ठिकाणीं अयनांताच्या त्याच्या पूर्वींच्या ग्रंथांत वर्णिलेल्या स्थितीविषयीं स्पष्टपणें सांगितलें * आहे. तो म्हणतो 'सांप्रत अयन पुनर्वसूपासून होतें; परंतु, पूर्वीं आश्लेषापासून होत असे.' या वराहमिहिराच्या म्हणण्यास, गर्गपराशरांच्याहि वचनांचा आधार आहे. तसेंच महाभारतामध्यें भीष्माचार्य शरपंजरीं पडले असतां उदगयनास आरंभ होईपर्यंत मरावयाचे थांबले व हा आरंभ माघशुक्लपक्षांत झाला असें वर्णन आहे. यावरून धनिष्ठारंभीं × उदगयन होऊन अर्थात्

* बृहत्संहिता ३–१ व २

× आकृति पहा

कृत्तिकामध्यें वसंतसंपात होत असे, हें उघड होतें. वेदांगज्योतिषांत हीच स्थिति दिली आहे. त्यांत * उत्तरायण धनिष्ठारंभीं, वसंतसंपात भरणीच्या पुढें १० अंश, दक्षिणायन आश्लेषार्धीं, व शरत्संपात विशाखाजवळ अशा अयन व संपात यांच्या जागा दिल्या आहेत. त्यावरून ज्योतिषि लोकांनीं अयनचलनाची मध्यमगति वर्षास ५० विकला धरून वेदांगज्योतिषांतील अयनादिकांची स्थिति इ. स. पूर्वीं १३०० वर्षांच्या सुमारास वर्तविली आहे.

तैत्तिरीयसंहिता, तैत्तिरीयब्राह्मण व दुसरे कांहीं ग्रंथ यांत पुष्कळ ठिकाणीं नक्षत्रचक्राचा आरंभ कृत्तिकापासून केला आहे. तैत्तिरीयब्राह्मणामध्यें + " कृत्तिकांमध्यें अग्न्याधान करावें, कारण कृत्तिका नक्षत्रांचे मुख होत " असें म्हटलें आहे. याचा अर्थहि कृत्तिकांपासून वर्षारंभ होत होता असा उघड दिसतो. कारण त्याच ब्राह्मणामध्यें " मुखं वा एतदृतूनां यद्वसंतः " म्हणजे वसंत हा ऋतूंचें मुख आहे किंवा वसंत हा वर्षांतील पहिला ऋतु आहे, असें म्हटलें आहे. अर्थात् या दोन्ही वाक्यांचा एकाच तऱ्हेचा प्रयोग असल्यामुळें त्यांचा अर्थहि एकाच पद्धतीनें केला पाहिजे.

याच तैत्तिरीयब्राह्मणामध्यें S " नक्षत्रें हीं देवांचीं मंदिरें आहेत. त्यांत देवनक्षत्रांमध्यें कृत्तिका पहिलें व विशाखा शेवटचें व यमनक्षत्रांमध्यें अनुराधा पहिलें व अपभरणी शेवटचें " असें म्हटलें आहे. मागें एकेठिकाणीं सांगितलेल्या शतपथब्राह्मणांतील वचनाच्या आधारावरून, या तैत्तिरीयब्राह्मणांतील वाक्याचा अर्थ लाविला पाहिजे; म्हणजे, त्यांत सांगितलेल्या दोन नक्षत्रविभागांचा देवयान व पितृयान यांशीं संबंध आहे, म्हणजे कृत्तिकापासून विशाखापर्यन्त देवनक्षत्रें, व त्यांत सूर्य आहे तोपर्यन्त देवयान किंवा उत्तरायण, आणि बाकीचीं यमाची किंवा पितृयानाचीं ऊर्फ दक्षिणायनाचीं नक्षत्रें, असें समजलें पाहिजे.

* वेदांगज्योतिष ५.

+ १—१—२—१ व १—१—२—६.

S १५—२—७.

हीं देवनक्षत्रें दक्षिणेकडे चालतात व यमनक्षत्रें उत्तरेकडे चालतात, म्हणजे सूर्य त्या नक्षत्रांमध्यें असतांना अनुक्रमें उत्तर व दक्षिण दिशांत असतो असें *वर्तमानकाळाच्या रूपामध्यें त्यांचें वर्णन आहे व यासाठीं तें वर्णन प्रत्यक्ष पाहून केलेलें असावें असें सहज वाटतें. या सर्व विवेचनावरून, तें जर बरोबर असेल तर, या वैदिक ग्रंथाच्या कालीं वसंतसंपातीं कृत्तिकांमध्यें उदगयनारंभ होत असे हें अगदीं उघड होतें.

परंतु तैत्तिरीयऽसंहितमध्यें याहूनही अधिक महत्त्वाचें असें स्थळ आहे. त्या- ठिकाणीं गवामयनासारख्या वार्षिक सत्राला आरंभ करण्यास उत्तम काळ कोणता याविषयीं विवेचन केलें आहे. त्याचा सारांश असा:—" संवत्सरा- साठीं दीक्षा घेणारांनीं एकाष्टकेच्या दिवशीं दीक्षा घ्यावी. एकाष्टका ही संवत्सराची पत्नी. ह्मणून एकाष्टकेच्या दिवशीं दीक्षा घेणारे संवत्सराच्या आरंभीं दीक्षा घेतात. परंतु ते संवत्सराच्या पीडेप्रत दीक्षा घेतात. व त्यांचा शेवटच्या नांवाचा ऋतु होतो व संवत्सरही व्यस्त होतो. ह्मणून फाल्गुनी पूर्ण- मासीं दीक्षा घ्यावी. कारण तें संवत्सराचें मुख आहे. त्या दिवशीं दीक्षा घेणारे संवत्सराच्या आरंभीं दीक्षा घेतात. तरी त्यांत एक दोष आहे तो हा कीं, त्यांचा विषुवान् मेघयुक्त दिवशीं येतो. ह्मणून चित्रा पूर्णमासीं दीक्षा घ्यावी. कारण तो संवत्सराचें मुख आहे. ह्मणून त्या दिवशीं दीक्षा घेणारे संव- त्सराच्या आरंभीं दीक्षित होतात. यांत कोणताच दोष नाहीं. पूर्णिमेच्या पूर्वीं चवथे दिवशीं दीक्षा घ्यावी. कारण त्यायोगें एकाष्टकेला सोमक्रय साधतो. व ह्मणून ती निष्फल होत नाहीं. हे यजमान सत्र आटोपून उठले ह्मणजे त्यांच्या मागोमाग ओषधी व वनस्पति याहि उठतात." अशाच प्रकारचा मजकूर

* यानि देवनक्षत्राणि तानि दक्षिणेन परियन्ति ।
यानि यमनक्षत्राणि तान्युत्तरेण ।

ऽ ७-४-८.

*तांड्य ब्राह्मणामध्येंहि आला आहे. व तेथें शब्दहि थोड्याशा फरकानें हेच आहेत. यामध्यें एकाष्टका हा जो शब्द आहे त्याचा अर्थ सर्व मीमांसकांच्या मतें माघांतली वद्य अष्टमी असा आहे. या दिवशीं वार्षिक सत्रास आरंभ करावा असें प्रथम सांगितलें; परंतु त्यास तीन नडी आहेत. पहिली अडचण म्हणजे ही कीं, एकाष्टका ज्या वेळीं आपण थंडीनें अगदीं त्रस्त होतो तेव्हां येते. दुसरी अडचण अशी कीं, या दिवशीं दीक्षा घेतल्यानें जरी वर्षारंभीं दीक्षा घेतली असें होतें, तरी ऋतूसंबंधानें पाहिलें असतां शेवटच्या ऋतूमध्यें दीक्षा घेतली असें होतें. याच्यासंबंधानें तांड्यब्राह्मणामध्यें आणखी असें म्हटलें आहे कीं,÷" ते अवभृथस्नानाला जातात तेव्हां पाण्यापासून त्यांना आनंद होत नाहीं" याचें कारण पाणी त्या वेळीं फार थंड असतें असें टीकाकार म्हणतो. आतां एकाष्टकेला सत्रारंभ करावयास तिसरी अडचण अशी कीं, संवत्सर त्या वेळीं व्यस्त म्हणजे उलटा होतो. याचा अर्थ शबरादिकांनीं दक्षिणायनान्त-बिन्दूपासून सूर्य माघारा वळल्यामुळें अयन पालटतें असा दिला आहे. आतां या अडचणीं येऊं नयेत म्हणून फाल्गुनी पूर्णमासी दीक्षा घ्यावी असें सांगितलें. कारण असें केल्यानेंही संवत्सरारंभीं दीक्षा घेतल्यासारखें होतें. परंतु त्यांतहि एक असा दोष आहे कीं, विषूवान् पावसाळ्यांत येतो व तें कांहीं इष्ट नाहीं. यासाठीं चित्रापूर्णमासी दीक्षा घ्यावी असें सुचविलें; व त्यांत कांहींएक अड-चण येत नाहीं असें सांगितलें. म्हणजे वर्षारंभीं दीक्षा घेतल्यासारखें होऊनही वरच्यापैकीं कांहींएक अडचण यांत येत नाहीं.


पण याहूनहि उत्तम दुसरी वेळ सांगितली. ती पूर्णमासाच्या पूर्वीं चार दिवस ही होय. ही वेळ साधल्यानें एकाष्टकेचाही उपयोग होतो; कारण त्या दिवशीं सोमक्रय पडतो, असें म्हटलें आहे. यावरून हा पूर्णमास एकाष्टकेच्या पूर्वींचा म्हणजे मघापूर्णमास असें जैमिन्यादि मीमांसकांनीं ठरविलें आहे, व त्याचा इतर गोष्टींशींही मेळ पडतो. सोमाकरानें लौगाक्षीचें " माघी पौर्णमा-

* ५–९

÷ तस्य सानिर्या यदपोऽनभिनन्दन्तोऽभ्यवयन्ति ( ५–९–३ ).

सीच्या पूर्वी चार दिवस सांवत्सरिक सत्रासाठीं दीक्षा घेतात " असें वचन एके ठिकाणीं दिलें आहे त्यावरून हीहि पूर्णिमा माघीच असली पाहिजे असें दिसतें. आतां वर दिलेलें मीमांसकांचें म्हणणें जर बरोबर असेल तर त्यावरून आपल्या विषयाला प्रस्तुत अशीं जीं अनुमानें निघतात तीं हीं:—तैत्तिरीयसंहिताकाळीं उदगयनारंभ माघ कृष्ण अष्टमीच्या पूर्वी व बहुधा माघी पूर्णिमेलाच होत असे. कारण अष्टमीला अयन पालटलेलें असे व पूर्णिमेच्या पूर्वी चार दिवस नसे. वर सांगितलेल्या तैत्तिरीयसंहितेंतील उताऱ्यामध्यें सत्रारंभ वर्षारंभींच झाला पाहिजे असा कटाक्ष दिसतो व म्हणून माघी पूर्णिमा हा एक वर्षारंभ असला पाहिजे. हा वर्षारंभ अर्थात् उदगयनारंभापासूनच होत होता. परंतु एकाच काळीं एकएक महिन्याच्या अंतरानें सारखे तीन वर्षारंभ असणें शक्य नाहीं. यासांठीं फाल्गुनीपूर्णमास व चित्रापूर्णमास हे दोन जुने वर्षारंभ तैत्तिरीयसंहितेमध्यें सांगितले आहेत, आणि त्या काळीं विषूवान् याचा खरा अर्थ माहीत नाहींसा झाला होता, असें उघड दिसतें.

अशारीतीनें वरील विवेचनावरून तैत्तिरीयसंहितेच्या काळीं वसंतसंपात कृत्तिकांमध्यें होता असें दाखविण्यास सबळ आधार मिळतो. कारण उदगयनारंभ माघ पूर्णिमेला झाला; म्हणजे दक्षिणायनारंभ मघा नक्षत्रांत सूर्य असतांना झाला पाहिजे; म्हणजे अर्थात् वसंतसंपात कृत्तिकांमध्यें आलाच. अशा रीतीनें वेदांगज्योतिषाच्या खेरीज तैत्तिरीयसंहिता व ब्राह्मण यांत आढळणाऱ्या चार निरनिराळ्या वचनांवरून वसंतसंपात कृत्तिकामध्यें होता हें स्पष्ट दाखवितां आलें. एक, नक्षत्रचक्रास व तदधिष्ठित देवतांस कृत्तिकांपासून आरंभ केलेला आहे असें सांगणारें वचन. दुसरें कृत्तिका नक्षत्रांचे मुख आहेत असें स्पष्ट वचन. तिसरें कृत्तिका देवनक्षत्रांचा आरंभ आहे हें वचन; व चवथें माघपूर्णिमेला उदगयनारंभ होत असे असें स्पष्ट सांगणारें सत्रारंभदिवसाविषयींचे विवेचन. या सर्व ठिकाणीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें वसंतसंपाताचा संबंध कृत्तिकांशीं लाविलेला आहे; व ही गोष्ट सिद्ध करण्यास आणखी पुराव्याची गरज आहे असें वाटत नाहीं.




सूचना:—पृथ्वी मध्यें आहे आणि तिच्या भोंवतीं क्रान्तिवृत्तांतून सूर्य फिरतो असें कल्पून ही आकृति काढिली आहे. हिच्यावरून दरवेळ संपात अमुक नक्षत्रांत होते हें ध्यानांत येईल; इतर प्रधान बिन्दु कोणत्या नक्षत्रांत आहेत हें समजेल; आणि उत्तरायणाचा महिनाही समजेल.

आतां कृत्तिका म्हणजे त्या नांवाचा तारकापुंज धरून तैत्तिरीयसंहिताकाळ इ. स. पूर्वीं सुमारें २३५० वर्षें इतका येतो. परंतु कांहीं युरोपियन पंडित या कृत्तिका नक्षत्रास विभागात्मक समजून हा काळ इ. स. पूर्वीं १४२६ पर्यंत आणतात. परंतु जे गृहस्थ वैदिक ऋषींना अयनान्तबिंन्दु संपातबिन्दु वगैरे गोष्टींचें सूक्ष्मज्ञान होणें शक्यच नव्हतें असें म्हणतात, त्यांनींच त्या ऋषींना नक्षत्रें समविभागात्मक करावयास लावावें हें मोठें आश्चर्य आहे. असें म्हणणें युक्तीस अगदींच सोडून आहे. पण वैदिक काळाची मर्यादा याहूनहि म्हणजे २३५० वर्षांहूनही फार दूर आहे असें सबळ पुराव्यानिशीं सिद्ध केल्यावर असल्या कुशंकांस मुळीं थाराच मिळणार नाहीं.

वेंटलेनें विशाखा म्हणजे दोन शाखांचें असा अर्थ करून व त्याचें कारण हें नांव पडण्याचे वेळीं सांपातिक* याम्योत्तरवृत्त विशाखांच्या दोन ताऱ्यांमधून बरोबर जात असे असें कल्पून, वसंतसंपाताला समविभागात्मक कृत्तिकांच्या आरंभीं आणून ठेविलें आहे. आतां तैत्तिरीयसंहिता व वेदांगज्योतिष यांच्या उदगयनारंभामध्यें एका पंधरवड्याचें अंतर आहे; व इतकें अंतर पडावयास वसंतसंपात १४ अंश तरी मागें आला पाहिजे. वेदांगज्योतिषामध्यें तो संपात भरणीच्या दहाव्या अंशांत दिला आहे. व या ठिकाणापासून समभागात्मक कृत्तिका × फक्त ३ अंश २० कला आहे; अर्थात् वेंटलीचें म्हणणें निरर्थक होतें. या कृत्तिका तारकात्मकच घेतल्या पाहिजेत; म्हणून तैत्तिरीयसंहिताकाळ वेंटलेप्रभृतींच्या मताप्रमाणें इ. स. पूर्वीं १४२६ न धरतां २३५० हाच धरिला पाहिजे.

* दोन्ही ध्रुवांतून जाणारीं जीं दक्षिणोत्तर वर्तुळें त्यांस याम्योत्तरवृत्तें म्हणतात. अशीं वृत्तें वाटतील तितकीं कल्पितां येतील. त्यांपैकीं दोन्ही संपातांतून जाणारें जें वृत्त त्यास सांपातिक याम्योत्तर वृत्त म्हणावें.

× एक समविभागात्मक नक्षत्र म्हणजे $13^\circ - 20'$ भरणीचे १० झाल्यावर अर्थात् कृत्तिका $3^\circ - 20'$ वर असणार. म्हणजे वेंटलेच्या म्हणण्याप्रमाणें पहातां तैत्तिरीय संहिताकालापासून वेदांगज्योतिषकालापर्यन्त संपात फक्त $3^\circ - 20'$ इतकाच मागें येतो; पण खरोखर तो निदान $14^\circ$ तरी मागें आलेला आहे.

वर सांगितलेल्या तैत्तिरीयसंहितेंतील संवत्सरसत्राच्या अनुवाकामध्यें चित्रापूर्णमास व फाल्गुनीपूर्णमास असे वर्षारंभ दिले आहेत. परंतु तैत्तिरीयसंहिताकाळीं उदगयनीं माघ महिन्यामध्यें वर्षारंभ होत असे हें वर दाखविलेंच आहे. आतां चित्रापूर्णमास व फाल्गुनीपूर्णमास यांचा अर्थ वेबरच्या म्हणण्याप्रमाणें चैत्र व फाल्गुन महिने असा न घेतां, त्या त्या महिन्यांतील पूर्णिमेचे दिवस असा घेतला पाहिजे. कारण एकाष्टकेच्या दिवशीं दीक्षा घेतल्यानें येणाऱ्या अडचणी टाळण्यासाठीं हे दुसरे दिवस सांगितले आहेत. अर्थात् त्यांचा संबंध विवक्षित दिवसांकडे आहे, महिन्यांकडे नाहीं; व हा अर्थ सायणासह सर्व मीमांसकांस संमत आहे.

परंतु या चित्रा अथवा फाल्गुनीपूर्णमासाला वर्षारंभाचे दिवस मानण्याचें कारण काय? सायणाचार्यांच्या मताप्रमाणें पाहतां हे दिवस वसंतामध्यें येतात म्हणून त्यांस वर्षारंभ म्हटलें. परंतु तैत्तरीयसंहितेच्या काळीं चैत्र वैशाख हे * वसंतऋतूचे महिने होत; फाल्गुन चैत्र हे नव्हते. ही अडचण दूर करण्याकरितां सायणाचार्यांनीं दुहेरी वसंताची कल्पना केली. एक चांद्र व दुसरा सौर. चांद्रवसंतामध्यें फाल्गुनचैत्र घातले व सौरामध्यें चैत्रवैशाख घातले. परंतु असें करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. शिवाय चांद्र ऋतूंचा कायमपणा नाहीं. कारण चांद्र वर्ष सौर वर्षाशीं जमवून घेण्यासाठीं अवश्य तेव्हां एक अधिक महिना धरीत असत. अर्थात् चांद्र महिन्यांचा व ऋतूंचा मेळ फार वेळ राहत नसे. परंतु सायणाचार्य म्हणतात त्याप्रमाणें दुहेरी ऋतु धरले तरी फाल्गुन वसंतामध्यें येऊं शकत नाहीं. सौर वर्षापेक्षां चांद्र वर्ष सुमारें अकरा दिवसांनीं कमी असल्यामुळें व ऋतु सूर्यावर अवलंबून असल्यामुळें एकदां चैत्र शुद्ध प्रतिपदेस वसंतारंभ झाल्यास पुढच्या वर्षीं चैत्र शुद्ध द्वादशीस होईल; असें होतां होतां तिसऱ्या वर्षीं अधिक मास धरल्यावर पुन्हां

* त्या वेळीं वसंतसंपात कृत्तिकामध्यें होता, म्हणजे वसंत ऋतूला वैशाखांत सुरवात होत असे म्हणून वास्तविक पाहिलें असतां वैशाख ज्येष्ठ हे वसंत ऋतूचे महिने होते.

तो चैत्रांत मूर्वस्थळीं येईल अशा रीतीनें दुहेरी ऋतु धरल्यास वसंतारंभ पुढें वैशाखापर्यंत जाईल. परंतु फाल्गुनामध्यें मागें येणें शक्य नाहीं. सायणाचार्यांच्या वेळीं म्हणजे चौदाव्या शतकांत वसंतारंभ आतांप्रमाणेंच फाल्गुनांत होत असे. परंतु तेव्हां, तैत्तिरीयकालापेक्षां उदगयनारंभ एक महिन्याहूनहि थोडा अधिक मागें हटला होता, या गोष्टीची बरोबर कल्पना न आल्यामुळें सायणाचार्यांनीं परस्परविरुद्ध दिसणाऱ्या वर सांगितलेल्या वर्षारंभांची, दुहेरी ऋतू कल्पून कशीतरी एकवाक्यता करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु आतां संपातचलनामुळें वर्षारंभांत बदल होत जातो हें आपल्याला समजल्यावर सायणाचार्यांची युक्ति अयुक्त म्हणून सोडून दिली पाहिजे.

सुश्रुताच्या वैद्यक ग्रंथामध्यें *" फाल्गुनश्चैत्रौ वसंतः " असें एकेठिकाणीं म्हटलें आहे. परंतु तो भाग त्यांत कोणी मागाहून घातलेला असावा असें दिसतें. कारण त्याच्या जरा पूर्वीं माघादिमासचक्र व शिशिरादिऋतुचक्र सांगून, माघ फाल्गुन शिशिरऋतु, चैत्र वैशाख वसंतऋतु वगैरे सांगितलें आहे. यावरून " फाल्गुनश्चैत्रौ वसंतः " वगैरे वर्णन पुढें कोणी तरी प्रक्षिप्त केलें असलें पाहिजे. सुश्रुत व चरक यांच्या ग्रंथाचें सार वर्णन करणाऱ्या वाग्भटानें " फाल्गुनश्चैत्रौ वसंतः " वगैरे वर्णनाचा कांहींएक संबंध न आणितां त्याच्यापूर्वीं सांगितलेली माघादि मासांची व शिशिरादि ऋतूंची पद्धत दिली आहे. यावरून " फाल्गुनश्चैत्रौ वसंतः " वगैरे वर्णन वाग्भटाच्या वेळीं सुश्रुताच्या ग्रंथांत नव्हतेंच, किंवा असलें तरी त्यास तें सुश्रुताचें खास असावें असें वाटलें नाहीं हें उघड आहे.

असो. तर याप्रमाणें तैत्तिरीयसंहिताकाळीं फाल्गुन हा वसंतमास होता असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. यासाठीं सायणाचार्यांचा तसा अर्थ याठिकाणीं तरी मान्य करतां येत नाहीं. शिवाय हा अर्थ कित्येक ब्राह्मणें व सूत्रें यांत आलेल्या " फाल्गुनी × पूर्णिमा ही संवत्सराची प्रथम रात्र "

* सूत्रस्थान अध्याय ६.

× एषा ह संवत्सरस्य प्रथमा रात्रिर्यत्फाल्गुनी पौर्णमासी । श ब्रा.६-२,२.१८.

अशा अर्थाच्या वचनांशींही विरुद्ध आहे. तैत्तिरीयब्राह्मणामध्यें * " उत्तरा फाल्गुनी ही संवत्सराची प्रथम रात्र, संवत्सराच्या आरंभीं अग्न्याधान करणारा पुष्कळ संपत्तिमान् होतो " असें म्हटलें आहे. तसेंच सूत्रकारांनींही " संवत्सरसत्रांचा आरंभ फाल्गुनी अथवा चैत्री पूर्णिमा या दिवशीं करावा " असें स्पष्ट सांगितलें आहे. + आतां या सर्व वचनांचा जर कांहीं अर्थ होत असेल तर फाल्गुनीं पूर्णिमा ही वर्षाची पहिली रात्र असें खरोखर एकेकाळीं मानीत असत हें आपल्याला कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

आतां वर सांगितल्याप्रमाणें ' फाल्गुनी पूर्णिमा हें संवत्सराचें मुख होय. ' या तैत्तिरीयसंहितेंतलि वाक्याचा सायणाचार्यांनीं दिलेला अर्थ तर ग्राह्य नाहीं तर दुसरा अर्थ कोणता घ्यावयाचा ? फाल्गुनीं पूर्णिमेला वसंतसंपातीं वर्षारंभ होत असे अशी तर कल्पनाच करतां येत नाहीं. कारण या रीतीनें वसंतसंपात उत्तराभाद्रपदांत येतो व अशी स्थिति येण्याला इ. स. पूर्वी २०,००० × वर्षेंपर्यंत आपल्याला गेलें पाहिजे. परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. उरला दुसरा मार्ग; म्हणजे त्या पूर्णिमेला उदगयनीं वर्षारंभ होत असे असें मानणें. माघी, फाल्गुनी आणि चैत्री या पूर्णिमा एकाच ठिकाणीं व एकाच कारणासाठीं सांगितल्या आहेत. या गोष्टीवरून हाच अर्थ खरा असें साहाजिक अनुमान होतें. हा अर्थ अगदीं स्वाभाविक व युक्तीला धरून दिसतो; व तैत्तिरीय संहि-

---

* ३-१. २. ८

+ आ. श्रौ. सू. १-२. १४. ३.

× संपाताची पूर्ण प्रदक्षिणा होण्यास सुमारें २६००० वर्षें लागतात; परंतु क्रांतिवृत्ताच्या उलट दिशेच्या एका गतिविशेषामुळें तो काल २१००० वर्षांचा होतो. हल्लीं वसंतसंपात पूर्वाभाद्रपदांत आहे. परंतु " फाल्गुनी पूर्णिमा हें संवत्सराचें मुख होतें " यावरून वसंतसंपात उत्तराभाद्रपदांत होता असें समजल्यास तेव्हांपासून आतांपर्यंत संपाताची एक पूर्ण प्रदक्षिणा होऊन व दुसऱ्या प्रदक्षिणेला सुरुवात होऊन तो पुनः पूर्वाभाद्रपदांत आला असें मानावें लागतें. व इतकी गोष्ट होण्याला सुमारें २२००० वर्षे लागतील.

तेच्या भास्करभट्ट नांवाच्या भाष्यकारानें हेंच मत दिलें आहे. त्यानें सांगितल्याप्रमाणें फाल्गुनी पूर्णिमेच्या दिवशीं एकदां केव्हां उदगयनीं वर्षारंभ होत असला पाहिजे. या मताप्रमाणें वैदिक कालाची मर्यादा आणखी २००० वर्षें मागें जाते व म्हणन यूरोपियन पंडित हें मत मान्य करावयास कांकूं करितात; परंतु जी गोष्ट सबळ पुराव्यावरून सिद्ध होईल तिच्या योगानें कित्येक लोकांच्या पूर्वकल्पित कल्पनांशीं जरी विरोध आला तरी आपणास ती एवढ्याच कारणावरून कधींही टाकून देतां कामा नये.

वर, कृत्तिकांमध्यें वसंतसंपात होता हें सिद्ध करण्यासाठीं आपण असें पाहिलें कीं, नक्षत्रचक्राचा आरंभ कृत्तिकांपासून केलेला आहे; दुसरें उदगयन माघशुक्लपक्षांत होत असे; तिसरें दक्षिणायननक्षत्र पित्रधिष्ठित होतें; व चवथें शारदसंपाताजवळील नक्षत्रामधून सांपातिक याम्योत्तरवृत्त जात असण्याचा संभव असतो. सारांश, जर वर्षारंभ माघांत होत होता असें मानलें तर त्याशीं क्रान्तिवृत्तांतील अयनादि प्रधानबिन्दूचीं नक्षत्रासंबंधीं स्थानें अगदीं जुळतात व अशारीतीनें ती गोष्ट तीं अप्रत्यक्षपणें स्थापित करतात. आतां वैदिककाळीं फाल्गुनी पूर्णिमेला उदगयनारंभीं वर्षारंभही होत असे ही गोष्ट सिद्ध करण्याला अशाचप्रकारचा कांहीं पुरावा मिळण्यासारखा आहे कीं नाहीं हें पहावयाचें. ऋतु एक महिना मागें यावयास स्थूलमानानें वसंतसंपात दोन विभागात्मक नक्षत्रें मागें यावयास पाहिजे. म्हणून उदगयनारंभ जर माघांत न होतां फाल्गुनांत झाला तर वसंतसंपातही कृत्तिकांच्यापुढें दोन नक्षत्रें म्हणजे मृगशीर्षांत येईल. तसेंच दक्षिणायन व शरत्संपात अनुक्रमें उत्तराफाल्गुनी व मूळ या नक्षत्रीं होतील, यासाठीं संपातादि बिन्दूंची अशाप्रकारची क्रान्तिवृत्तांतील स्थिति दाखविण्याला वैदिक ग्रंथांमध्यें काय आधार आहे हें आतां पहावयाचें.

कृत्तिकांप्रमाणें मृग हेंहि नक्षत्रांचें मुख होतें असें वैदिक ग्रंथामध्यें स्पष्टपणें म्हटलेलें कोठेंही आढळत नाहीं. तरी मृगशीर्ष याचें दुसरें नांव जें आग्रहायणी त्यावरून तसें दिसतें. आग्रहायणी याचा अर्थ **वर्षारंभ करणारें** असा आहे;

परंतु त्या नक्षत्राला हें नांव मिळालें कसें ? हा प्रश्न आहे. कोशकारांनीं व्युत्पत्ति देतांना मार्गशीर्षी पूर्णिमा ही वर्षाची प्रथम रात्र असल्यामुळें तिला आग्रहायणी असें म्हणतात व आग्रहायणीमध्यें पूर्णचंद्र मार्गशीर्षांत होतो, म्हणून त्या महिन्याला आग्रहायणिक असें नांव मिळालें असें सांगितलें आहे. हें ठीक आहे. परंतु ते आणखी असें म्हणतात कीं, अमरकोषांत सांगितल्याप्रमाणें मार्गशीर्षाचेंच आग्रहायणी असें नांव आहे, कारण त्या नक्षत्रीं चंद्र असतांना पूर्वी वर्षारंभ होत असे. परंतु हें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. कारण नक्षत्रावरून पूर्णमासाला नांव द्यावयाचें ही नेहमींची रीत आहे; म्हणून आग्रहायणीसंबंधानें मात्र पूर्णमासावरून नक्षत्राला नांव मिळतें असें म्हणणें बरोबर नाहीं. पाणिनीच्या मताप्रमाणेंही असल्या उलट्या पद्धतीला कांहीं आधार नाहीं. पाणिनीनें आग्रहायणीपासून आग्रहायणिक असें महिन्याचें नांव दिलें आहे. त्यावरून आग्रहायणी याचा अर्थ त्याच्या मतें मृगशीर्ष नक्षत्र असा अर्थ नसून मार्गशीर्षी पौर्णिमा असा असावा असें दिसतें. कारण महिन्यांचीं नांवें पूर्णमासावरून साधावीं असें त्याचें मत आहे. आतां आग्रहायणी हा पूर्णमासवाचक शब्द पाणिनीनें चैत्री वगैरे शब्दाप्रमाणें साधिला आहे कीं काय हें बरोबर समजत नाहीं. परंतु कार्तिकी वगैरे शब्दांच्या सादृश्यावरून पहातां, त्यानें अग्रहायण शब्दापासून आग्रहायणी शब्द साधिला असून, अग्रहायण हें मृगशीर्षाचें मूळचें नांव असावें, असें दिसतें. या शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधानें बराच मतभेद आहे; परंतु त्या सर्व मतांच्या मुळाशीं मार्गशीर्षी पूर्णिमेला पूर्वी एकदां वर्षारंभ होत असे व त्या पूर्णिमेच्या नांवावरून मृगशीर्षाला आग्रहायणी हें नांव पडलें ही कल्पना साधारण आहे. जर ही कल्पना दूर केली तर या शब्दासंबंधानें सर्व अडचण नाहींशी होते. शिवाय ही कल्पना खरी मानावयास वेद किंवा पाणिनि यांमध्यें आधार नाहीं. पाणिनीचें एकंदर धोरण अग्रहायण हें नक्षत्राचे नांव धरून त्यावरून आग्रहायणी हें पूर्णमासाचें नांव व त्यावरून आग्रहायणिक हें महिन्याचें नांव साधण्याचें आहे. नक्षत्रवाचक अग्रहायण शब्द आतां नाहींसा झाला आहे व अमरसिंहानें आग्रहायणी असाच

नक्षत्रवाचक शब्द दिला आहे. परंतु या जुन्या शब्दाच्या अर्थाचा विपर्यास करण्यांत अमरसिंह एकटाच वांटेकरी आहे असें नाहीं. मार्गशीर्षी पौर्णिमा ही संवत्सराची प्रथम रात्र होती, या कल्पनेवरून पुढील वाङ्मयामध्यें दुसऱ्याहि पुष्कळ चुका उत्पन्न झाल्या आहेत.

आतां मार्गशीर्षी पूर्णिमेला वर्षारंभ होत असे असें धरल्यास काय काय निष्पन्न होतें तें पाहूं. असें मानण्यास प्रत्यक्ष आधार " मासानां मार्गशीर्षोऽस्मि ऋतूनां कुसुमाकरः "* या गीतावचनाखेरीज दुसरा कोणताही नाहीं. आनंद-गिरीनें या गीतावचनावरील शांकरभाष्याच्या टीकेमध्यें मार्गशीर्ष महिना समृद्धीचा असतो म्हणून त्याचें विभूतिमत्त्व वर्णिलें आहे असें म्हटलें आहे. परंतु हें कारण समाधानकारक वाटत नाहीं. संदर्भावरून मार्गशीर्षाला वर्षारंभाचा महिना म्हणण्याचा आशय स्पष्ट दिसतो. सूर्यपंडित नांवाच्या एका ज्योतिष्यानें आपल्या परमार्थप्रपा नांवाच्या गीतेवरील टीकेमध्यें म्हटलें + आहे कीं, मार्गशीर्षाचें दुसरें नांव आग्रहायणिक असें आहे, व त्यांतील पूर्णिमा संवत्सराची पहिली रात्र असे. असा अर्थ घेतल्यास भगवद्गीतेंतील वरील वचन आग्रहायणिक शब्दाच्या चुकीच्या व्युत्पत्तीवर लिहिलें गेलें असावें असें दिसतें. परंतु या शब्दाची व्युत्पत्ति नीटपणें घेतल्यास त्यांत घोटाळा होण्यासारखें कांहींच नाहीं. आग्रहायणिक हा साधित शब्द असल्यामुळें त्या नांवाचा महिना वर्षारंभाचा असणें शक्यच नाहीं. परंतु त्या वेळीं अग्रहायण म्हणजे मृगशीर्ष, हें पहिलें नक्षत्र ही कल्पना अगदीं नाहींशी होऊन मार्गशीर्ष महिनाच वर्षारंभाचा होता असें मानूं लागले; व या नव्या कल्पनेला एकदां गीतेमध्यें स्थान मिळाल्या-बरोबर तिचा त्वरित सर्वत्र पसार होऊन विद्वानांनींही आपलें मत तसें बनविलें.

* भ. गी. १०–३५.

\+ यद्वा मृगशिरः पूर्णमासंबंधेन वर्षादिरभिहितस्तस्मिन्नेवाग्रहायणीत्यभि-धानात्। आग्रहायणं यस्यां साग्रहायणी। अत एव आग्रहायणिक इति मार्गशीर्ष-नाम। अतोऽस्य मासस्य मुख्यत्वाद्विभूतिमत्त्वम्।

या चुकीच्या कल्पनेचा इतर विद्वानांनींच अवलंब केला असें नाहीं, तर ज्योतिषी लोकांनींही तसेंच केलें. पण त्याचा परिणाम काय झाला पहा. जुन्या ज्योतिषग्रंथांमध्यें वर्षारंभ उत्तरायणी होत असे. म्हणजे वर्षाचा पहिला महिना तोच उत्तरायणाचाही पहिला महिना असे. आतां मार्गशीर्षी पूर्णिमेला संवत्सराची प्रथम रात्र म्हटलें तर स्वाभाविकपणेंच त्यादिवशीं उत्तरायण सुरू झालें असें ज्योतिषी समजणार. व मग अर्थात् दक्षिणायनबिन्दु मृगशीर्षी * येणार. म्हणजे वसंतसंपात त्याच्या मागें ९० अंश येणार. सूर्यसिद्धान्तामध्यें मृगशीर्षाचे विषुवांश रेवतीपासून ६३ दिले आहेत. त्यावरून मृगशीर्षाच्या मागें ९० अंश म्हणजे रेवतीच्या मागें २७ अंश वसंतसंपात आला. परंतु वैदिक ग्रंथांमध्यें नक्षत्रारंभ कृत्तिकांपासून होत असून माघामध्यें उत्तरायण होत असे असें सांगितले आहे. यावरून त्या वेळीं वसंतसंपात रेवतीच्या पुढें निदान २७ अंश तरी होता. आतां या दोन गोष्टींचा मेळ कसा घालावयाचा ? वेदहि खोटे नाहींत व गीताहि खोटी नाहीं. दोन्हीहि सारखींच प्रमाण. पण दोहोंमध्यें असा विरोध. म्हणून आमच्या ज्योतिष्यांनीं संपाताच्या आंदोलनाची, म्हणजे संपातक्रांन्तिवृत्तांत सबंध प्रदक्षिणा न करितां रेवतीच्या पुढें मागें २७ अंशच हालतो अशी कल्पना लढवून वरील विरोध नाहींसा केला. अर्वाचीन ज्योतिर्विदांनीं ही कल्पना गणितशास्त्राच्या नियमांच्या विरुद्ध आहे असें ठरविलें आहे; पण तिला भारतीय ज्योतिषग्रंथामध्यें स्थान कसें मिळालें याचें दुसरें सयुक्तिक कारण अद्यापि कोणी दिलेलें नाहीं× बेंटले व व्हिटने यांच्या मतें या आंदोलनाच्या

* मृगामध्यें पूर्णचंद्र ज्या दिवशीं होईल ती मार्गशीर्षी पूर्णिमा. पूर्णिमेच्या दिवशीं चंद्रसूर्य समोरासमोर म्हणजे एकमेकांपासून १८० अंशावर असणार. म्हणजे मार्गशीर्षी पूर्णिमेला सूर्य मृगनक्षत्रापासून १८० अंशावर असेल. आतां त्या दिवशीं जर अर्वाचीन पद्धतीचें उत्तरायण सुरू होतें असें मानलें तर अर्थातच वसंतसंपात मृगाच्या मागें फक्त ९० अंशांवर येईल. ( आकृति पहा )

× भारतीय ज्योतिःशास्त्र या ग्रंथांत दीक्षितांनीं हेंच कारण दिलें आहे. ( पान ३३२ ).

सीमा, रेवतीच्या पुढें २७ अंशांवर म्हणजे कृत्तिकांमध्यें सूर्य असतांना वसंतसंपातीं वर्षारंभ होत असे, या गोष्टींवरून ठरविल्या असाव्या. परंतु एवढीच गोष्ट आंदोलनाची कल्पना उत्पन्न करण्यास पुरेशी नाहीं. रेवतीच्या दोन्ही बाजूंस २७ अंशांवर वसंतसंपात होत असे, असें कायमपणें समजल्याशिवाय कांहीं आमच्या ज्योतिष्यांनीं आंदोलनाची कल्पना काढिली नाहीं. यासाठीं त्या कल्पनेचें वर सांगितलेलें कारणच खरें असलें पाहिजे.

असो. तर अशा रीतीनें मार्गशीर्षी पूर्णिमेला उदगयनीं वर्षारंभ होत असे, असें मानल्यास वर सांगितलेली अपरिहार्य अडचण येते. अर्थात् ही कल्पना आपल्याला सोडून दिली पाहिजे. रेवतीच्या मागें २७ अंशांवर वसंतसंपात असावयास आपल्याला सांप्रत चालू असलेल्या संपातप्रदक्षिणेच्या आरंभीं तरी गेलें पाहिजे, अथवा सुमारें ६०० वर्षें आणखी वाट तरी पाहिली पाहिजे. म्हणून असलीं निरर्थक अनुमानें ज्यांपासून निघतात त्या गोष्टीच आपण सोडून दिल्या पाहिजेत. आतां " मार्गशीर्षी पूर्णिमा वर्षाची प्रथम रात्र " या वचनाचा दुसराहि कोणता अर्थ होऊं शकत नाहीं. या दिवशीं उदगयन होत असे असा अर्थ घेतल्यास काय परिणाम होतो हें आतां आपण पाहिलेंच. आतां वर्षारंभ धरण्याची दुसरी पद्धति म्हणजे वसंतसंपातापासूनची, व तीप्रमाणें पाहूं गेलें तरी,*मार्गशीर्षांत वसंतसंपात येण्यास तो अभिजितनक्षत्रीं असला पाहिजे. म्हणजे आपल्याला तो काळ इसवी सनापूर्वी २०,००० वर्षें ढकलिला पाहिजे; परंतु हें तर असंभवनीय दिसतें. या सर्व विवेचनावरून आग्र-

---

* मार्गशीर्षी पूर्णिमेला वसंतसंपात होत असे म्हणजे त्या दिवशीं सूर्य वसंतसंपातीं होता असें मानलें म्हणजे वसंतसंपात मृगशीर्षाच्या पुढें किंवा मागें १८०° असला पाहिजे. अभिजित् नक्षत्राचा क्रांतिवृत्ताशीं ( यांतच सर्व नक्षत्रें आहेत ) कांहीं संबंध नाहीं. तरी त्यांतून जाणारें याम्योत्तरवृत्त मृगापासून १८०° अंशावरून जातें. एवढ्यावरून व या वृत्तामध्यें क्रांतिवृत्ताजवळ एवढी मोठी तारा दुसरी नसल्यामुळें त्यांत वसंतसंपात होईल असें वर म्हटलें आहे. खरोखर अभिजित् नक्षत्रांत वसंपसंपातबिंदु कधीं यावयाचा नाहीं.

हायणी याचा सध्यां प्रचलित असलेला अर्थ घेऊन चालावयाचें नाहीं हें उघड होतें. आतां उरला अर्थ, त्या नांवाच्या नक्षत्रामध्यें सूर्य असतांना वर्षारंभ होत असे हा. मग त्या नक्षत्राचें नांव अग्रहायण असो, आग्रहायणी असो, अगर अग्रहायणी असो. तें नक्षत्र वर्षामध्यें पहिलें होतें एवढा आपल्या मुद्याचा प्रश्न. आतां यापुढें अग्रहायण म्हणजे मृगशीर्षनक्षत्र असेंच घेऊन चालावयाचें.

असो. तर मग फाल्गुनामध्यें उदगयन झालें म्हणजे त्याअन्वयें वसंतसंपातीं वर्षारंभ मृगशीर्षी ऊर्फ अग्रहायणी होणार. म्हणजे माघांत उत्तरायण झालें असतां जसा वसंतसंपात कृत्तिकांत होतो तसेंच येथेंहि. याप्रमाणें तैत्तिरीय ब्राह्मणांतील "फाल्गुनीपूर्णमास हें संवत्सराचें मुख आहे" या वचनाला आग्रहायणामध्यें दडून राहिलेल्या गोष्टीनें पाठबळ मिळतें. मृगशीर्षामध्यें वसंतसंपात येतो. व कदाचित् मूळनक्षत्राचे नांवही या गोष्टीवरून पडलें असेल; कारण, त्या वेळीं वर्षारंभीं सूर्यास्ताबरोबर उगवणारें तेंच नक्षत्र होतें. ही मूळ शब्दाची व्युत्पत्तीहि कांहीं अशीं मृगामध्यें वसंतसंपात होता असें दाखविण्यास उपयोगी पडेल

मागें सांगितलेंच आहे कीं, वर्षाचीं दोन अयनें जीं उत्तर व दक्षिण त्यांचा वैदिककाळचा अर्थ व नंतरचा अर्थ यांमध्यें भेद आहे. वैदिककाळीं सूर्याच्या उत्तरगोलार्धातील कालाला उत्तरायण म्हणत; परंतु नंतर, त्याचा अर्थ मकरपासून कर्कसंक्रमणापर्यंतचा काळ असा झाला. म्हणजे पूर्वी, पितृयाण किंवा हल्लींचें दक्षिणायन याचा आरंभ कर्कसंक्रमणापासून होई. उदगयन फाल्गुनी पूर्णिमेला झालें म्हणजे, अर्थात् दक्षिणायन किंवा पितृयाण भाद्रपदी पौर्णिमेला होणार, म्हणजे भाद्रपदाचा कृष्णपक्ष हा पितृयाणाचा पहिला पंध्रवडा झाला. म्हणून त्यालाच विशेषेंकरून पितरांचा पंध्रवडा ऊर्फ पितृपक्ष हें नांव मिळालें. अजूनही आपण याच पक्षांत पितरांचीं विशेष* श्राद्धें करितों. भाद्रपदवद्यपक्षाला पितृपक्ष हें नांव कां मिळालें यांचें कारण कोणीहि आजपर्यंत दिलेलें नाहीं.

* पक्ष. महालयश्राद्धें.

परंतु फाल्गुनी पूर्णिमेला वर्षारंभ होतो या संहितावचनाचा नीट अर्थ घेतल्यास, म्हणजे त्या पूर्णिमेला उत्तरायणारंभ होत असे असें समजल्यास, ह्या गोष्टीचा अगदीं सहज रीतीनें उलगडा होतो. म्हणजे त्या वेळीं दक्षिणायनाचा आरंभ भाद्रपदी पूर्णिमेला होत असे व म्हणून त्याच्या पुढच्या पक्षाला पितृयाणाचा पहिला पंधरावडा ऊर्फ पितृपक्ष म्हणूं लागले.

आतां, आपलाच पितृपक्ष भाद्रपदांत होतो असें नाहीं. पारशी लोकांचाहि तेव्हांच होतो. ही गोष्ट फारच महत्त्वाची आहे. कारण ज्या जुन्या काळासंबंधीं आपण विचार करीत अहों त्या काळीं भारतीय, इराणी व हेलनिकआर्य * हे सर्व एकच होते. आतां, आपली उपपत्ति जर खरी असेल तर तिला या आर्य लोकांच्या निरनिराळ्या शाखांच्या चालीरीती, दंतकथा वगैरे गोष्टींवरून चांगला आधार मिळेल. मृगशीर्षांत वसंतसंपात होता हें दाखविण्यास असा पुरावा पुष्कळ आहे हें आपण पुढें पाहूं. सध्यां आपण प्राचीन अवेस्तिक पंचागासंबंधें डॉ. गिइगरनें केलेल्या अनुमानांचा थोडा विचार करूं. त्यानें "मध्यर्यो×" म्हणजे "वर्षाचा मध्य" हा शब्द आधारभूत धरून, त्यावरून प्राचीन अवेस्तिक पंचांगांतील वर्षाचा आरंभ दक्षिणायनापासून होत असे असें अनुमान केलें आहे. ही गोष्ट आपल्या उपपत्तीशीं अगदीं जुळते. पारशी लोकांनीं असल्या प्रत्येक बाबतींत आपल्या अगदीं उलट मत स्वीकारिलें आहे; व म्हणून आपला वर्षारंभ उत्तरायणीं झाला तर त्यांचा त्याच्या उलट म्हणजे दक्षिणायनीं व्हावयाचा व असेंच खरोखर आहे. पारशी व हिंदु यांच्या जुन्या पंचांगाचा मेळ इतकाच आहे असें नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं, दोघांचेही पितृपक्ष भाद्रपदांत एकाच वेळीं येतात. पारशी लोकांचा पहिला महिना फ्रवाशिनम् म्हणजे पितृमास हा आहे, व त्याचा आरंभ दक्षिणायनापासून होतो. या महिन्यापासून

* ग्रीक.

× मध्यर्यो व इंग्रजी [ Midyear मिडइयर ] यांचें साम्य दिसतें.

चवथा महिना तिश्र्येहे, किंवा तिश्र्याचा मास हा आहे व हें, तिश्र्यनक्षत्र म्हणजे *सिरिअस्‌चा तारा होय असें मानतात, आतां आपल्याकडे भाद्रपदापासून मोजलें असतां ४ था महिना मार्गशीर्ष म्हणजे मृगशीर्षाचा मास हा येतो; व मृगशीर्ष व सिरिअस्‌ हे अगदीं जवळच आहेत. तसेंच फ्रवशिनम्‌ महिन्यामध्यें दक्षिणायनीं वर्षारंभ धरिला म्हणजे दथुषो महिन्याचा आरंभ बरोबर वसंतसंपातीं होतो. हा दथुषो महिना सृष्टिकर्त्या अहुरमझ्दाचा आहे. यावरून तो एकदां वर्षारंभाचा महिना असावा असें दिसतें. याप्रमाणें जुन्या अवेस्तिक पंचांगामध्यें वसंतसंपातीं आरंभ होणाऱ्या वर्षाच्या कांहीं खुणा आपल्याला आढळतात. या गोष्टी व विशेषेंकरून दोघांचे पितृपक्ष एक असणें हें केवळ काकतालीय असेल असें संभवत नाहीं. आतां, त्यांच्यांत वर्षारंभ उत्तरायणांतून दक्षिणायनांत जरी गेला तरी पितृपक्षासारखी पूर्वापार चालत आलेली पवित्र गोष्ट स्थानभ्रष्ट करणें हें त्यांस योग्य वाटलें नाहीं. म्हणून अजूनही दोघांचे पितृपक्ष एकच आहेत.

याप्रमाणें तैत्तिरीयसंहिता व दुसरीं ब्राह्मणें यांत असलेल्या फल्गुनीपूर्णमास वर्षाचें मुख होतें या वचनाचा स्वभाविकपणें संदर्भावरून होणारा—म्हणजे त्या दिवशीं उत्तरायण होत असे असा—अर्थ घेतल्यास, व मृगशीर्षवाचक अग्रहायण शब्दाचा वर्षारंभ करणारें असा खरा अर्थ घेतल्यास, त्या नक्षत्रामध्यें एकदां वसंत संपात होता हें उघड होतें. पितृपक्षाच्या कालावरूनही असेंच दिसतें. व त्याच वेळीं पारशी लोकांचाही पितृपक्ष येतो. या गोष्टीवरून वरील म्हणण्यास चांगला सबळ आधार मिळतो. कृत्तिकांमध्यें वसंतसंपात होता ही गोष्ट अशाच प्रकारच्या पुराव्यावरून वर सिद्ध केलेली आहे; व म्हणून मृगशीर्षसंबंधानेंहि अशाच प्रकारचें अनुमान करावयास कांहीं हरकत दिसत नाहीं. मृगशीर्षापासून नक्षत्रचक्राला आरंभ होत असे असें सांगणारें स्पष्ट वाक्य जरी कोठें आढळत नाहीं तरी तसें मानावयास बहुतेक भागच पडेल अशा कांहीं गोष्टी पुढील विवेचनांत

* व्याध.

येणार आहेत; त्यांवरून वरील अनुमानासंबंधानें शंकेला बहुतकरून जागाच राहणार नाहीं.

आकाशाच्या ज्या भागामध्यें मृगशीर्षनक्षत्रपुंज आहे तो भाग सर्वांत अत्यन्त प्रेक्षणीय आहे. एकाद्या निरभ्र रात्रीं सहज आकाशाकडे पहाणाऱ्याचेंही लक्ष या तारकापुंजाच्या मनोहर स्वरूपाकडे वेधल्यावांचून रहाणार नाहीं. मग प्राचीन आर्यांना तर त्यांच्या वेळीं या आकाशाच्या भागामध्यें वर्षारंभीं सूर्योदय होत असल्यामुळें तो अधिकच मनोवेधक झाला असला पाहिजे. या पुंजामध्यें व्याधासह पांच पहिल्या प्रतीचे तारे आहेत, दुसऱ्या प्रतीचे बरेच आहेत, व बाजूला आकाशगंगा आहे. या आकाशप्रदेशामध्यें प्राचीन कवींच्या प्रतिभेला भराऱ्या मारण्यास चांगलाच अवकाश मिळाला. या नक्षत्रपुंजावरून किती तरी गोष्टी प्राचीन आर्यांमध्यें उत्पन्न झाल्या. त्यांपैकीं कांहींचें परीक्षण करून त्यावरून आपल्या उपपत्तीला कांहीं आधार मिळतो कीं नाहीं हें आतां पहावयाचें आहे. आपल्या उपपत्तिप्रमाणें जर त्यांचा आजपर्यंतच्या अर्थाहून अधिक नीट अर्थ लागला, तर आपल्या उपपत्तीला खरी मानावयास एक सबळ कारण मिळेल; परंतु हें परीक्षण करण्यापूर्वीं प्राचीन ग्रंथांत वर्णिल्याप्रमाणें विवक्षित तारा व त्यांचे कल्पिलेले आकार हे निश्चित करण्याचा थोडा प्रयत्न करूं.

मृगशीर्ष याच्या अर्थावरून त्या पुंजाच्या आकाराची कल्पना सहज होईल. परंतु त्यांत अनेक तारा असल्यामुळें हा आकार कल्पिण्यास त्यांपैकीं कोणत्या घ्यावयाच्या हें सांगणें जरा कठीण आहे. शीर्ष शब्दावरून सबंध मृग आकाशांत होता असें दिसत नाहीं. रुद्रानें प्रजापतीस बाणानें वेधिलें या शतपथ*ब्राह्मणांतील गोष्टीसंबंधानें सायणाचार्य आपल्या भाष्यांत म्हणतात. " रुद्रानें प्रजापतीचें शिर बाणानें छेदिलें × व तो बाण व शिर ही दोन्ही

* श. ब्रा. २-१-२-८.

× इषुणा तस्य शिरश्चिच्छेद........ इषुः शिरश्चेत्युभयमंतरिक्षमुत्प्लुत्य नक्षत्रात्मनावस्थितं दृश्यते ।

अंतरिक्षांत जाऊन नक्षत्र रूपानें राहिलेलीं दिसतात. ” ऋग्वेदांत शीर्षच्छेदाविषयीं याच प्रकारचें वर्णन नाहीं. तरी त्यांत प्रजापतीची गोष्ट दिली आहे. दुसऱ्या ठिकाणीं ऋग्वेदामध्यें इन्द्रानें वृत्राचें शिर छेदिलें व वृत्र हा मृग रूपानें दिसला अशीं वर्णनें आहेत. यावरून ऋग्वेदांत मृगाच्या शीर्षाचेंच वर्णन आहे असें दिसतें. ग्रीक पुराणामध्यें सुद्धां ही गोष्ट आली आहे. अपालो देवानें आपली बहीण ओरायनवर प्रीती करते हें पाहून क्रोधानें तिच्याकडून समुद्रांतील एका दूरच्या वस्तूचा बाणानें छेद करविला, व ती वस्तू ओरायनचेंच शिर होतें असें आढळून आलें. यावरून, आपल्याला शरविद्ध असें छेदून टाकिलेलें मृगाचें शिरच कोठें तें पाहिलें पाहिजे. अमरसिंहानें मृगशीर्षाच्या वर असलेल्या तीन तारांना इन्वका हें नांव दिलें* आहे. पण कांहींजणांच्या मताप्रमाणें ओरायन पुंजाच्या शिरोभागीं असलेल्या तीन लहान तारानांच जर मृगशीर्ष समजलें तर मृगशीर्ष व इन्वका हीं एकच होतात. म्हणजे अमरानें दिलेला भेद निरर्थक होतो. यासाठीं सबंध मृगाची आकृति या पुंजांत आहे असें न समजतां फक्त शरविद्ध असें डोकेंच आहे असें समजलें पाहिजे. असें समजल्यावर ही आकृति निश्चित करणें कठीण नाहीं. कारण वरील गोष्टीमध्यें जो बाण आला आहे तो ओरायनच्या पट्यांतील तीन तारा आहेत हें उघड आहे. म्हणजे मृगशीर्षाची आकृतिही, ओरायनचा पट्टा, त्याचे मागचे दोन पाय व पुढला डावा पाय मिळून कल्पिली पाहिजे. या आकृतीप्रमाणें अमरानें दिलेली इन्वाकांची जागाहि साधते. या आकृतीत इन्वका म्हणजे बाण अथवा ओरायनच्या पट्यांतील तीन तारा होत. या पुंजामध्यें दुसऱ्याही कित्येक आकृतींची कल्पना केली असेल. सर्व मृग शरीर, व यज्ञोपवीत धारण करणारा प्रजापति या आकृतींची ही कल्पना केलेली आहे. परंतु या सर्व कल्पनांत शीर्षाची कल्पना सर्वांत जुनी दिसते. व ती वरूनच वाढत वाढत दुसऱ्या कल्पना निघाल्या असें वाटतें.

---

* मृगशीर्षं मृगशिरस्तस्मिन्नेवाग्रहायणी । इन्वकास्तच्छिरो देशे तारका निवसन्ति याः ॥

या विवेचनांत मृगशीर्ष नक्षत्र ओरायनपुंजांतच आहे असें आपण मानलें आहे. व जरी याबद्दल कित्येक पंडितांनी शंका घेतली आहे, तरी यांत असंभवनीय असें कांहींच नाहीं. कारण रमणीय अशा रोहिणीमागून लगेच येणारा दुर्वृत्त प्रजापति रुद्राच्या त्रिकांड बाणानें विद्ध होऊन पडलेला, व तो बाण त्याच्या शिरामध्यें अडकून राहिलेला अद्याप दिसतो आहे. या गोष्टीवरून तारकापुंजासंबंधानें तर शंका रहाणें संभवतच नाहीं.

याप्रमाणें मृगशीर्षाची आकृति प्रथमतः कशी कल्पिली होती हें पाहिल्यावर दुसऱ्या तारा निश्चित करणें कठीण नाहीं. रोहिणीसंबंधानें शंका नाहींच. रुद्र आर्द्रा नक्षत्राची देवता असल्यामुळें त्याचें स्थान अर्थात् आर्द्रा म्हणजे ओरायनचा उजवा स्कंध हें होय. परंतु ऐतरेय ब्राह्मणामध्यें ज्याला हल्लीं आपण मृगव्याध म्हणतों तोच रुद्र असें सांगितलें आहे.* आकाशगंगेला त्या वेळीं कांहीं विशेष नांव होतेसें दिसत नाहीं. पारशी, ग्रीक व भारतीय आर्य या तिघांमध्यें आकाशगंगेला साधारण असें नांव नाहीं. परंतु तिच्याकडे त्या वेळीं लोकांचें लक्षच लागलें नव्हतें असें मात्र म्हणतां येणार नाहीं. ग्रीक ज्योतिषामध्यें या गंगेच्या दोन्ही बाजूंना कॅनिस मेजर× व कॅनिस+ मायनर असे दोन कुत्रे आहेत. हे अगदीं पूर्वींपासूनचेच आहेत कीं काय, याविषयीं कांहीं जणांस शंका आहे. परंतु प्लूटार्कच्या लिहिण्यावरून कॅनिस, ओरायन व अर्सा हे पुंज ग्रीक लोकांना अगदीं पूर्वींपासून माहीत होते हें उघड दिसतें. कारण तो म्हणतो " ज्या पुंजांना इजिप्शियन लोक ऐसिस, हार्स व टायफॉन् ह्मणतात, त्यांसच ग्रीक लोक अनुक्रमें कॅनिस, ओरायन् व अर्सा असें ह्मणतात." या प्लूटार्कच्या ह्मणण्यावरून हे तीन तरी पुंज मूळ इजिप्शियन किंवा खाल्डियन नव्हत एवढें सिद्ध होतें. यांपैकीं अर्सा हे वेदांतील सप्तऋक्ष व पारशांचे हेप्टोइरिंग होत. यावरून प्लूटार्कच्या कॅनिस विषयींच्या म्हणण्याच्याहि सत्यतेबद्दल साक्ष पटते. ह्मणजे कॅनिस, ओरायन व अर्सा हे पुंज आर्यांचेच मूळचे आहेत यांत कांहीं संशय नाहीं.

*ऐ. ब्रा. (३-३३) ×मोठा कुत्रा व +धाकटा कुत्रा.

आतां हे तारकापुंज जर मूळचे आर्यांचेच आहेत, तर आर्यजातीच्या तिन्ही शाखांमध्यें या पुंजांविषयीं कांहीं सारख्या सारख्या गोष्टी असल्या पाहिजेत. वेदांमध्यें देवयान व पितृयान यांच्या विषयींच्या कल्पना अगदीं सार्वत्रिक झाल्या होत्या असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या कल्पना बहुधा दिवस व रात्र अथवा उजेड व काळोख यांवरून बनल्या असाव्या. वेदामध्यें पितृयान ह्मणजे आकाशाचा अगदीं खालचा भाग. ह्मणजे ज्यांत अपार समुद्र आहेत व जेथें वैवस्वताचें ह्मणजे यमाचें राज्य आहे असा प्रदेश असें वर्णन* आहे. त्याचप्रमाणें देवयानामध्यें इन्द्राचें राज्य आहे. याप्रमाणें एकंदर आकाशगोलाचे एक प्रकाशित व ज्ञात आणि दुसरा जलमय व अंधकारयुक्त असे दोन भाग केलेले आहेत. आतां या देवयान व पितृयानरूपी गोलार्धांना एके ठिकाणीं जोडणें आहे. हें काम वसंत व शारदसंपातांनीं केलें; व हीं संपातस्थानें स्वर्गाचीं ऊर्फ देवलोकाचीं ऊर्फ देवयानाचीं द्वारें झालीं. मग तीं राखण्याकरितां कुत्रेहि मिळाले. ही स्वर्गद्वाराची कल्पना वेदांपासून आलेली आहे.

पारशी लोकांमध्यें ही गोष्ट जास्त पूर्णपणें राहिली आहे. त्यांच्यांत संपात ह्मणजे नुसता दरवाजा नाहीं, तर तो देवलोक व यमलोक यांच्या मधला पूल आहे. त्याला चिन्वत् सेतु ह्मणतात, व तो राखणारे कुत्रे मृत मनुष्यांच्या आत्म्यांना त्यावरून जावयास मदत करितात. ग्रीक कथांमध्यें कर्बेरास नांवाचा तीन डोक्यांचा कुत्रा यमलोकाचे दरवाजे राखण्यासाठीं ठेविला आहे व ×ऋग्वेदांत यमाचा चार डोळ्यांचा कुत्रा त्याच्या राज्याचा मार्ग राखीत आहे. या गोष्टींचा आश्चर्यकारक सादृश्यावरून त्यांचें मूळ एक असलें पाहिजे हें उघड दिसतें. परंतु त्यांचा आजपर्यंत कोणी समाधानकारक अर्थ दिलेला नाहीं. पण ओरायनमध्यें वसंतसंपात होता असें जर आपण समजलों, तर वर सांगितलेले कुत्रे, स्वर्ग व यमलोक यांच्या सीमेवर येतील व मग सर्व वरील गोष्टी आकाशांत स्पष्ट दिसतील. आपल्या ग्रंथांमध्यें मृत मनुष्याच्या आत्म्याला

* ऋग्वेद ९-११३-८.

× ऋ. १०. १४. १०

यमलोकाला जातांना एक नदी * उलटावी लागते असें वर्णन आहे, व ग्रीक लोकामध्येंही अशी कल्पना आहे. मृगशीर्षामध्यें वसंतसंपात धरिल्यास ही नदी ह्मणजे आकाशगंगा हें सहज समजेल. यमलोकाला जाण्यासाठीं या नदीजवळ ग्रीकलोकांनीं अर्गास ह्मणजे नौका ठेवली आहे. वेदांमध्येंही + दिव्यनांवेंतून उत्तम लोकाला जाण्याचें वर्णन आहे. तेथें दैवीम् नावम् असे शब्द आहेत. अथर्व वेदांतहि ( ६. ८०. ३ ) दिव्यस्य शुनः असे शब्द आहेत. या दोहोंची सांगड घातली असतां दिव्य किंवा दैवी याचा अर्थ आकाशांतील ( दिवसंबंधी ) असा घेतला पाहिजे. महिम्नस्तोत्रादि अर्वाचीन संस्कृत ग्रंथांमध्यें रुद्राचें दिव्य शरीर वर्णिलें आहे, त्याठिकाणीं दिव्य शब्दाचा अर्थ आकाशांतील असा उघड आहे. असो. या उत्तम लोकाला जाण्याचा मार्ग राखण्याकरितां ठेविलेल्या कुत्र्यांचेंही दोन्ही वाङ्मयामध्यें वर्णन आहे. आकाशगंगा ही स्वर्गाची ह्मणजे देवयानाची सीमा समजल्यास या गोष्टींचा सहज उलगडा होतो. ह्मणजे ही दिव्य नाव व हे कुत्रे ह्मणजे, अर्गो नेविस व कॅनिस हे नक्षत्रपुंज होत. या विवेचनावरून आकाशांतील स्थितीवरून वरील कल्पना रचल्या गेल्या असेंच समजण्याचें कारण नाहीं. उलट पूर्वीं अस्तित्वांत असलेल्या कल्पनांवरूनही आकाशांतील ताऱ्यांना नावें मिळालीं असतील. अनार्य लोकांच्या पुराणकथांवरून असेंच दिसतें. तरी वर सांगितलेल्या आर्यांच्या कथांची उत्पत्ति आतां सांगितल्याप्रमाणेंच झाली असावी असें तिन्ही आर्य शाखांच्या गोष्टींतील विलक्षण सादृश्यावरून दिसतें. आतां या निरनिराळ्या आर्यराष्ट्रांच्या गोष्टींतील कुत्र्यांच्या रंगरूपामध्यें कांहीं भेद आढळतो. यावरून कदाचित् हे एक नसतील अशी शंका येईल; परंतु एकाच ग्रंथामध्येंही त्यांचें निरनिराळें वर्णन असल्यामुळें अशी शंका निरर्थक होते. रंगरूप, वचनलिंग या गोष्टी यांमध्यें फारशा महत्त्वाच्या नाहींत.

* वैतरणी; मृताच्या नांवानें एक गाय द्यावी, ह्मणजे त्याला या नदीपलीकडे जावयाचा नावेचा खर्च देतां येतो असें गरुडपुराणांत सांगितलें आहे.

+ ऋग्वेद १०-६३-१०

ऋग्वेदांतील सरमा कुत्री ही व स्वर्गद्वाररक्षक कुत्रे हीं देखील एकच होत असें दिसतें. कारण इन्द्राच्या गाई शोधण्यासाठीं तिला पाठविल असतां पर्णींनीं तिला गोंजारून दूध प्यावयास दिलें; व मग ती परत आल्यावर गाई पाहिल्याचें नाकबूल करूं लागली. तेव्हां इन्द्रानें तिला लाथ मारिली; त्याबरोबर ती दूध ओंकली. आतां हें दूध म्हणजे आकाशगंगेचें पाणी किंवा इंग्रजी शब्दाप्रमाणें दुधाच्या* नदींतील दूध हें सहज लक्षांत येईल. ऋग्वेदामध्यें, ×शुनाशिरौ यांची स्वर्गांतील दुधाचा पृथ्वीवर वर्षाव करण्याविषयीं प्रार्थना केली आहे. मॅक्समुल्लरच्या मतें हे शुनाशिरौ म्हणजे कॅनिस ऊर्फ श्वानपुंजच होत. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांतील एका ऋचेंत,+ ऋतुदेवता जे ऋभु त्यांना संवत्सरसमाप्तीचे वेळीं श्वान जागे करीत, असें म्हटलें आहे. हें वर्णन कॅनिस ऊर्फ श्वानपुंज वर्षारंभीं अथवा पितृयानाच्या शेवटीं पूर्वेस सूर्योदयापूर्वी उगवत असे त्याचें आहे. या सर्व गोष्टींचा व विशेषत: श्वान वर्षारंभ करीत या गोष्टीचा त्या वेळीं वसंतसंपात श्वानपुंजांत अथवा मृगशीर्षांत होता असें मानिलें म्हणजे चांगला उलगडा होतो.

या उपपत्तीवरून दुसऱ्याहि कित्येक गोष्टींचा समाधानकारक अर्थ लावतां येतो. मृगशीर्ष सूर्योदयीं उगवूं लागलें म्हणजे वसंत ऋतु सुरू झाल्यामुळें सर्व सृष्टि प्रफुल्लित होत असे व म्हणून पुराणामध्यें विष्णूचे जे सात्त्विक गुण सांगितले आहेत ते या मृगशीर्षामध्यें सर्व दिसतात असें म्हणण्यास हरकत नाहीं; पण हें नक्षत्र शरत्संपातीं सूर्यास्ताबरोबर उगवूं लागलें म्हणजे सर्व गोष्टी बदलून जात; त्यामुळें, तें इंद्रवृत्रांच्या युद्धाची भूमि अथवा त्या भयंकर रुद्राचें स्थान असें वैदिक ऋषींच्या लक्षांत सहज आलें

*मृगशीर्षपुंज आकाशगंगेच्या जवळ आहे. इंग्रजींत आकाशगंगेला "दुधाचा मार्ग, अशा अर्थाचें Mliky way असें नांव आहे. विष्णूचें वास्तव्यहि क्षीरसागरांत आहे. तेव्हां हा क्षीरसागर व Mliky way बहुधा एकच असावे.

× ऋ. ४-५७-५.

+ ( १-१६१-१३ )

असेल. तात्पर्य हें नक्षत्र सात्त्विक व तामसिक अशा दोन्ही गुणांचें म्हणजे विष्णु व रुद्र या दोहोंचेंही द्योतक होतें. ग्रीक कथांमध्यें कर्बेरास व अर्थ्रास अशा दोन स्वर्गद्वाररक्षक कुत्र्यांचें वर्णन आहे. यांपैकीं अर्थ्रास म्हणजे वैदिक वृत्र होय असें सर्व समजतात. पण हा वृत्र या यमलोकाच्या द्वाराशीं कसा आला हें कोणी सांगितलेलें नाहीं. परंतु ऋग्वेदांतील नमुचीच्या गोष्टीचा आपल्या प्रस्तुत उपपत्तीप्रमाणें अर्थ घेतल्यास सर्व गोष्टी नीट जमतात. वर एकेठिकाणीं सांगितलेंच आहे कीं वृत्र हा ऋग्वेदांत पुष्कळदां मृगरूपानेंहि आला आहे. आतां, नमुचि व वृत्र यांच्या वर्णनावरून ते दोन असावे असें कांहीं वाटत नाहीं. खरोखर पाहिलें असतां, शुष्ण, पिप्रु, कुयव, नमुचि व वृत्र हीं सर्व इंद्राच्या एकाच शत्रूचीं नावें आहेत. आतां, मृगरूपधारी वृत्राला अथवा नमुचीला इन्द्रानें मस्तक छेदून मारिलें असें वर्णन आहे; व यावरून रुद्रानें तोडिलेलें प्रजापतीचें शिर व हें मृगाचें शिर एकच होय असें सहज कळतें. आतां, इन्द्रानें नमुचीला "**परावति**" म्हणजे दूरच्या प्रदेशांत+ मारिलें आहे. या "**परावती**" चा अर्थ यमलोक असा दिसतो; पण ऋग्वेदांत§ दहाव्या मंडळांत एके ठिकाणीं, इन्द्रानें नमुचीला मारून देवलोकाचे मार्ग मोकळे केले, असें वर्णन आहे. त्यावरून नमुचीला मारण्याचें नक्की ठिकाण देवयानाचें द्वार हें होय. वाजसनेयी संहितेमध्यें ( १०-१४ ) एका याज्ञिक विधीच्या वर्णनांत नमुचीच्या वधाचा काल व स्थान हीं दिलीं आहेत. त्यांत ऋत्विज् यजमानाला पूर्वादि सर्व दिशांमधून व वसंतादि सर्व ऋतूंमधून ( वसंतापासून शिशिरापर्यंत ) नेल्यावर व्याघ्रचर्माखालीं झांकलेला एक धातूचा तुकडा दूर फेंकून देऊन म्हणतो कीं, " नमुचीचें शीर्ष फेंकून दिलें. " या शब्दांचा जर कांहीं अर्थ होत असेल तर तो हाच कीं, ऋतूंस-

* ऋ. १-८०-७; ५-३२-३; ५-३४-२; ८-९३-१४.

\+ ऋ. १-५३-७

§ ऋ. १०-७३-७. त्वं जघंथ नमुचिं मखस्युं दासं कृण्वान ऋषये विमायं ।
त्वं चकर्थ मनवे स्योनान्पथो देवत्रांजसेव यानान् ॥

बंधानें पाहिल्यास शिशिराच्या शेवटीं किंवा ऋग्वेदांत वर्णन केलेल्या पितृयानाच्या द्वाराशीं वृत्राचा वध झाला. आतां यावरून नमुचि किंवा वृत्र, म्हणजे ग्रीक लोकांचा आर्थास हा यमलोकाच्या द्वाराशीं कसा आला हें समजेल.

या नमुचीच्या मरणाविषयीं तांड्य* ब्राह्मणामध्यें एक चमत्कारिक गोष्ट† दिली आहे. इन्द्र व नमुचि यांमध्यें असें ठरलें होतें कीं, इन्द्रानें नमुचीला रात्रीं मारूं नये, दिवसा मारूं नये, तसेंच शुष्क अथवा क्लिन्न अशा कोणत्याहि शस्त्रानें मारूं नये. ह्मणून इन्द्रानें त्याला दिवस व रात्र यांच्या संधीस ह्मणजे उषोदय होऊन सूर्योदय होण्याच्या पूर्वी पाण्याच्या फेसानें मारिलें. आतां यांचें हें युद्ध दैनिक नसून वर्षाकालाच्या आरंभीं होणारें आहे. हा वेळ नक्की म्हटला ह्मणजे देवयान व पितृयान यांच्या संधीचा होय. कारण ऋग्वेदांत वर्णन केल्याप्रमाणें नमुचीच्या मरणानें देवलोकाचा मार्ग मोकळा होतो असें आहे. परंतु वरील गोष्टींतला पुढला भाग ह्मणजे इन्द्रानें नमुचीला पाण्याच्या फेसानें मारिलें ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ऋग्वेदांतहि आठव्या× मंडळांत इन्द्रानें नमुचीचें मस्तक पाण्याच्या फेंसानें छेदिलें असें वर्णन आहे. आतां हा फेंस कोठला आला? अर्थात् नमुचीला जर देवयानाच्या द्वाराजवळ मारिलें आहे व त्याचें मस्तकहि जर अजून तेथें आहे, तर हा फेंस आकाशगंगेशिवाय दुसरा कोठचा असणार? आकाशाला सागराची व तारकांना फेंसाची उपमा देण्याची चाल संस्कृत वाङ्मयामध्यें पुष्कळ आहे. "नेदं नभोमण्डलमंबुराशिर्नैताश्च तारा नवफेनभंगाः"। हें सुभाषित तर

* तां. ब्रा. १२-६-८

† या ब्राह्मणांतील गोष्टीवरूनच पुढें पुराणांत हिरण्यकशिपूची व नरसिंह अवताराची गोष्ट आली असावी.

× ऋ. ८-१४-१३. अपां फेनेन नमुचेः शिरः इन्द्रोद वर्तयः ॥

प्रसिद्धच आहे. * शिवमहिम्न स्तोत्रामध्येंही " तारागणगुणित फेनोद्गमरुचिः । " म्हणजे " तारासमूहांच्या योगानें ज्याच्या फेणाचें रमणीयत्व वृद्धिंगत झालें आहे, " असें रुद्राच्या मस्तकावरील गंगाप्रवाहाला विशेषण दिलें आहे. शिवाय याच स्तोत्रकारानें पुढें २२ व्या † श्लोकांत " रुद्रानें स्वकन्याभिलाषी प्रजापतीला बाणानें विद्धिलें " या गोष्टीचा उल्लेख करून, ही सर्व गोष्ट अद्यापि आकाशांत धडधडीत दिसते आहे असें म्हटलें आहे. यावरून शिवाच्या मस्तकावरील गंगा म्हणजे रुद्राच्या ऊर्फ व्याधाच्या ताऱ्याजवळ असलेला आकाशगंगेचा पट्टाच होय, असा कवीचा आशय स्पष्ट दिसतो. आतां, महिम्नकाराच्या प्रतिभेला जर आकाशगंगेंत फेंस दिसला तर वैदिक ऋषींच्याहि उज्ज्वल प्रतिभेला तो दिसला असल्यास त्यांत नवल काय ? पारशी धर्मग्रंथामध्येंहि मिथ्र हा राक्षसांवर आपलें वनंतरूपी वज्र फेंकतो असें वर्णन आहे. वनंत ह्मणजे पारशी दस्तुरांच्या मताप्रमाणें आकाशगंगाच होय. यावरून इन्द्राचें फेनरूपी शस्त्र ह्मणजे आकाशगंगाच होय असें निःसंशय ठरतें. तर याप्रमाणें संपातांची आपण मानिलेली स्थिति धरिली असतां नमुचीच्या गोष्टीचा चांगला उमज पडतो.

---

* श्लोक १७. वियद्व्यापी तारागणगुणितफेनोद्गमरुचिः
प्रवाहो वारां यः पृषतलघु दृष्टः शिरसि ते ।
जगद्द्वीपाकारं जलधिवलयं तेन कृतमि-
त्यनेनैवोन्नेयं धृतमहिम दिव्यं तव वपुः ॥ ( पु. चा. )

ही शिवस्वरूपाची कल्पना खरोखर फारच उदात्त आहे. सर्व विश्वाला व्यापणारी आकाशगंगा ज्याच्या मस्तकावर आहे, तो रुद्र स्वतः किती मोठा असला पाहिजे याची कल्पनाच करावयाला पाहिजे असें कवी ह्मणतो. स्वर्गोलाला वलयभूत झालेल्या या आकाशगंगेचें याहून सरस वर्णन करणें अशक्य आहे.

† प्रजानाथं नाथः प्रसभमभिकं स्वां दुहितरं
गतं रोहिद्भूतां रिरमयिषुमृष्यस्य वपुषा ।
धनुष्पाणेर्यातं दिवमपि सपत्राकृतममुं
त्रसन्तं तेऽद्यापि त्यजति न मृगव्याधरभसः ॥

आतां मृगानुसारी भयंकर व्याध जो रुद्र तत्संबंधीं गोष्टींकडे वळूं. पौराणिक कथांमधील रुद्राचें वर्णन ह्मणजे मस्तकीं गंगा, स्मशानवासाची आवड, किरातवेष, अशाप्रकारचें आहे. या गोष्टी, पितृयानाच्या द्वारीं, व आकाशगंगेच्या जरा खालीं जो व्याध आहे तोच रुद्र समल्यास, सर्व चांगल्या जुळतात. परंतु या गोष्टींचा प्रस्तुत प्रश्नाशीं कांहीं संबंध नाहीं. रुद्राची वर्षक्रमांतील स्थिति दाखविणाऱ्या गोष्टी आपल्याला पाहिजे आहेत. वसंतसंपात ओरायनमध्यें असतांना प्रजापतीपासून ह्मणजे ओरायनपासून वर्षारंभ होत असे. आतां रुद्रानें प्रजापतीला मारलें; व पूर्वीं सांगितल्याप्रमाणें प्रजापति, संवत्सर व यज्ञ हे शब्द समानार्थक आहेत. म्हणजे रुद्रानें प्रजापतीला ऊर्फ यज्ञाला संवत्सरारंभीं मारिलें असें होतें. याच गोष्टीच्या आधारें दक्षयज्ञाचा रुद्रानें विध्वंस केला, ही कथा रचिली असावी. *महाभारतामध्यें " रुद्रानें यज्ञाचें हृदय बाणानें विद्ध केलें; नंतर तो विद्ध झालेला यज्ञ अग्नीसह मृग होऊन पळून गेला, व त्याच रूपानें आकाशांत जाऊन रुद्र पाठीस लागला आहे अशा रूपानें तो तेथें विराजमान होतो आहे, " असें वर्णन आहे. या गोष्टीवरूनच रुद्राला यज्ञहा हें नांव मिळालें. तांड्य+ब्राह्मणांतील ही प्रजापतीची गोष्ट जरा निराळी आहे. त्या ठिकाणीं त्यानें आपण होऊनच स्वतःला बळी देण्यासाठीं देवांच्या स्वाधीन केलें असें वर्णन आहे. परंतु हें कसेंहि असलें तरी, रुद्रानें यज्ञाला ऊर्फ प्रजापतीला संवत्सरारंभीं मारिलें ही

---

* ततः स यज्ञं विव्याध रौद्रेण हृदि पत्रिणा ।
अपक्रान्तस्ततो यज्ञो मृगो भूत्वा सपावकः ॥
स तु तेनैव रूपेण दिवं प्राप्य व्यराजत ।
अन्वीयमानो रुद्रेण युधिष्ठिर नभस्तले ॥

यांत मृगाचें **शीर्ष** विद्धिलें असें न ह्मणतां **हृदय** विद्धिलें असें ह्मटलें आहे, यावरून **सगळाच** मृग आकाशांत होता अशी भारतकाळीं कल्पना असावीसें दिसतें.

+ तां. ब्रा. ७-२-१. आणखी तै. ब्रा. ३-९-२२-१.

गोष्ट खरी. याकाळासंबंधानें दुसरीहि एक सूचक गोष्ट आहे. शूलगव यज्ञ वसंत अथवा शरदृतूमध्यें आर्द्रानक्षत्रीं करावा असें आश्वलायन* गृह्यसूत्रांत सांगितलें आहे. हल्लीं या वाक्याचा अर्थ, ज्या दिवशीं चंद्र आर्द्रांत असेल त्या दिवशीं—मग तो दिवस कोणताहि असो—या यज्ञाला आरंभ करावा, असा घेतात. पण, त्याचा मूळचा अर्थ वसंतामध्यें अथवा शरदृतूमध्यें आर्द्रानक्षत्रीं पूर्णमास किंवा दर्श असतांना या यज्ञाला आरंभ करावा, असा असावासें वाटतें. असा अर्थ घेतल्यास हा यज्ञ उत्पन्न झाला त्या वेळीं वसंत-संपात आर्द्रानक्षत्राजवळ होता असें होतें. संपात कांहीं काळानें मागें आल्या-वर पूर्णमास किंवा दर्श हे आर्द्रानक्षत्रीं वसंतांत किंवा शरदांत होत नाहींसे झाल्यावर या यज्ञाचा आरंभदिवस पूर्णमास किंवा दर्श हाच घेणें शक्य नसल्यामुळें आर्द्रा नक्षत्रांत चंद्र असलेला सदर ऋतूंतील कोणताहि दिवस आरंभाला घ्यावा असा अर्थ झाला असावा. परंतु ही गोष्ट इतकी खात्री पटविण्याजोगी नाहीं. रुद्राजवळ कुत्रे आहेत या वाजसनेयी संहितेंतील वर्ण-नावरून वैदिकऋषींना व्याधाजवळ म्हणजे रुद्राजवळ असलेला श्वानपुंज माहीत होतासें दिसतें. हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

याप्रमाणें मृगशीर्षांत वसंतसंपात होता असें धरल्यानें आपल्या पुराणांतील मुख्य मुख्य देवतांचें मूळ व स्थान त्या तारकापुंजांत अथवा त्याच्या आसपास कोठेंतरी आहें असें आपल्याला अगदीं स्पष्ट दिसलें. वसंतांत आढळणाऱ्या सात्त्विकवृत्तीची देवता × विष्णु, मेघविद्युदादिकांचा अधिपति रुद्र व वर्षारंभ करणारी यज्ञदेवता प्रजापति या सर्वांची एकाच जागीं सांगड केली आहे. एकंदरींत आपल्या त्रैमूर्तींचें पूर्णस्वरूप या तारकापुंजांत वसंतसंपात असतांना त्यांत प्रतिबिंबित झालें होतें. दत्तात्रेयनांवाचें हें त्रिमूर्तिस्वरूप श्वानरूपी वेदांनीं अनुगम्य

* आ. गृ. सू. ४–९–२.

× मृगशीर्षपुंज आकाशगंगेच्या जवळ आहे. इंग्रजींत आकाशगंगेला "दुधाचा मार्ग" अशा अर्थाचें milky way असें नांव आहे. विष्णूचें वास्तव्यहि क्षीरसागरांत आहे. तेव्हां हे क्षीरसागर व milky way बहुधा एकच असावे.

मान असें वर्णिलें आहे. मृगशीर्षांतील तीन तारे व त्यांच्यामागें असलेला श्वान यांवरून त्या स्वरूपाची कल्पना करणें कठीण नाहीं. आकाशाच्या दुसऱ्या कोणत्याहि भागामध्यें या सर्व गोष्टी इतक्या मनोवेधक रीतीनें एकत्र झालेल्या आढळणें कठीण आहे.

मृगशीर्षाविषयीं विचार करितांना ग्रीक लोकांनीं ओरायनपुंजाला आपण स्वतः नांव दिलें होतें असें प्लूटार्कच्या म्हणण्यावरून स्पष्ट होतें हें सांगितलेंच आहे. त्या ठिकाणीं या ह्मणण्याला पुष्टी आणणाऱ्या व ओरायनपुंजांत एकदां वसंतसंपात होता हें दाखविणाऱ्या कांहीं वैदिक गोष्टींचेंही परीक्षण केलें. आतां या तारकापुंजाचें नांव व आकृति हीं, ग्रीक, पारशी व भारतीय आर्य लोक एकमेकांपासून दूर होण्यापूर्वींच ठरलीं होतीं, असें दाखविणाऱ्या गोष्टींचा विचार करावयाचा. या गोष्टी व कदाचित् ओरायन हें नांव सुद्धां त्या काळीं वसंतसंपात मृगशीर्ष पुंजाजवळ होता असें मानल्यानें चांगल्या समजतात, असें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

पूर्वीं दाखविलेंच आहे कीं, अग्रहायण या शब्दाची नाहीं तरी आग्रहायणी याची तरी परंपरा पाणिनीच्या वेळेपर्यंत आपल्याला लावितां येते, व हा शब्द नक्षत्रवाचक असल्यामुळें तो आग्रहायणी या पौर्णिमेच्या नांवावरून झाला असें ह्मणणें चुकीचें आहे. हायन शब्द ऋग्वेदांत आलेला नाहीं. तरी अथर्ववेद व ब्राह्मणें यांत आलेला आहे. पाणिनीच्या मतें हा शब्द 'हा' ह्मणजे जाणें अथवा त्याग करणें या धातूपासून निघाला आहे, व त्याचे व्रीहीधान्य व वेळ असे दोन अर्थ आहेत. या हायन शब्दाचा अयन व आग्रयण ( ह्मणजे अर्धवार्षिक यज्ञ) या शब्दांशीं संबंध लाविल्यास या दोन्ही अर्थांचीं कारणें समजतात. एकंदर वर्षाचे अयनात्मक दोन विभाग हे फार प्राचीन आहेत. देवयान व पितृयान या रूपांनीं हे भाग पूर्वीं होते याविषयीं मागें विवेचन आलेंच आहे. या अयन शब्दाला ह् लाविल्यास त्यापासून हायन शब्द सहज होईल. अशाप्रकारें आरंभीं स्वर असलेल्या शब्दांना ह् लावण्याची रीत अजूनही आपल्याला आढळते. उदाहरणार्थ, इंग्रजी हिस्टरी (इतिहास ) हा शब्द इस्तरी

यावरून निघाला आहे, असें मॅक्समुल्लरनें आपल्या भाषाशास्त्र नांवाच्या ग्रंथांत दाखविलें आहे. यासाठीं अयन शब्दावरून हयन व त्यावरून पुढें हायन शब्द साधिल्यास त्यांत विलक्षण असें कांहीं नाहीं. आतां एकाच शब्दाची दोन रूपें असल्यास सहजच त्यांचा एका एका विशिष्ट कार्याकडे उपयोग होऊन त्यांमध्यें अर्थभिन्नत्व येतें. अशा शब्दांना संस्कृत कोशकार योगरूढ असें ह्मणतात. ह्मणजे या शब्दामध्यें धात्वर्थ व रूढी या दोहोंचा थोडथोडा भाग असतो. त्याप्रमाणें अयन याचा पूर्वीचा **अर्धवर्ष** हा अर्थ कायम राहून **हायन** हा शब्द सबंध वर्षाचा वाचक होऊन बसला असावा. आतां अयनाचें हयन झाल्यावर आग्रयण ह्मणजे अग्र+अयन हा अग्र+हयन किंवा अग्रहयण असा सहजच झाला; व हयनाचें पाणिनीच्या प्रज्ञादि गणाच्या अन्वयें हायन झाल्यावर अग्रहयणाचें आग्रहायण असें रूप झालें.

परंतु सध्यांच्या व्युत्पत्तिशास्त्राच्या नियमाप्रमाणें ही रीत जरी हतकी साधी दिसते तरी आपल्या वैय्याकरणांनीं ती मान्य केली नव्हती. आरंभीं ह् लावणें किंवा असल्यास काढणें या तत्त्वावर ब्ऱ्याच संस्कृत शब्दांची सहज व्युत्पत्ति सांगता येईल. मृगाच्या डोक्यांतील तीन तारांना इन्वका किंवा हिन्वका हे शब्द आहेत. पण संस्कृत व्याकरणकार ते दोन निरनिराळ्या **इन्व्** व **हिन्व्** या धातूंवरून साधितात. पण त्यांनीं, इन्व, हिन्व्; अय्, हय्; अट्, हट्; अन्, हन्; अशा प्रकारचीं दुहेरी रूपें कां असावीं याचें कारण कधींहि दिलेलें नाहीं. त्याचें ह्मणणें अयन **शब्द अय्**=जाणें यापासून निघाला, हयन् हय्=जाणें यापासून व हायन हा–जाणें यापासून निघाला. परंतु अशा रीतीनें सगळ्या शब्दांची व्यवस्था न लावतां आल्यामुळें त्यांना पुष्कळदां *पृषोदरादि गणाचा आश्रय करावा लागला आहे. परंतु तें कसेंहि असलें

*पृषोदर शब्द **पृषत् व उदर** यांपासून झालेला आहे. यामध्यें त् चा लोप व्हावयास कांहीं नियम नसल्यामुळें हा शब्द अनियमितपणें साधणाऱ्या सर्व शब्दांचा प्रतिनिधि झाला आहे. पृषोदरादि गण म्हणजे अनियमितपणें साधणाऱ्या शब्दांचा वर्ग.

तरी इतकें खरें कीं, अयन व हायन या दोहोंचाही धात्वर्थ गमन असा आहे; व जेव्हां त्या दोहोंचाही कालभाग दाखविण्याकडे उपयोग होऊं लागला तेव्हां त्यांना विशिष्ट अर्थहि मिळाला. ह्मणजे अयन हा शब्द अर्धवर्षवाची झाला व हायन पूर्णवर्षवाचक झाला. आतां पहिल्या अयनाचा आरंभ तोच वर्षाचाही आरंभ. म्हणून अयनारंभवाचक आग्रयण शब्दाचा संवत्सरारंभ-वाचक अग्रहायण असा स्वरूपभेद झाला.

अयन शब्दाच्या अर्थाविषयीं विचार करतां प्रथमतः सूर्याचें गमन एव-ढाच त्याचा अर्थ असून पुढें या गमनावरून नियमित झालेला वेळ ह्मणजे अर्ध वर्ष असा अर्थ झाला असें दिसतें; व आग्रयणेष्टि या प्रत्येक अयनारंभ-दिवशीं करावयाच्या दोन अर्धवार्षिक इष्टि असाव्यात असें वाटतें. मनुस्मृ-त्यादि वेदकालानंतरच्या ग्रंथांमध्यें **आग्रयणेष्टि** ह्मणजे **नवान्नइष्टि** असें ह्मटलें आहे. परंतु संपातचलनामुळें ऋतु मागें मागें येऊन या इष्टि अयनारंभीं न होतां कोणत्या तरी दुसऱ्या वेळीं होऊं लागल्यामुळें मन्वादिकांची वर सांगित-लेली कल्पना झाली असावी. कारण आश्वलायनानें श्रौतसूत्रामध्यें दोनच आग्रयणेष्टि सांगितल्या आहेत. एक वसंतारंभीं करावयाची व दुसरी शरदा-रंभीं. वसंत व शरद् हे ऋतु पूर्वीं सांगितल्याप्रमाणें देवयान व पितृयान यांचे म्हणजे जुन्या उत्तरायणाचे व दक्षिणायनाचे आरंभ होत. आश्वलायनानें हव-नासाठीं व्रीहि, श्यामाक व यव अशीं तीन धान्यें सांगितलीं ‡ आहेत; व याव-रूनच तीन आग्रयणेष्टीची कल्पना पुढें निघाली असें दिसतें. कारण *तैत्तिरीय संहितेंतील " संवत्सरासाठीं दोनदां धान्य शिजवावयाचें " या वचनावरून ही कल्पना मूळची नव्हे हें उघड दिसतें. म्हणून, पूर्वीं प्रत्येक अयनाच्या आरंभीं एक एक अशा एकंदर फक्त दोन इष्टि होत्या व तेव्हां आग्रयण या-पुढील ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें नवान्नभक्षणाशीं कांहीं संबंध नव्हता, असें उघड दिसतें. कारण असा अर्थ घेतल्याशिवाय या इष्टि आश्वलायनानें सांगि-

‡ आ. गृ. सू. १-२-९-१.

* तै. सं. ५-१-७-३.

तल्याप्रमाणें वसंत व शरद् या ऋतूंच्याच आरंभीं कां कराव्या याचा उलगडा होत नाहीं.

तर याप्रमाणें अमरसिंहाच्या अग्रहायणी शब्दाची परंपरा पाणिनीच्या पूर्वीं वेदकाळापर्यंतही ह्मणजे आग्रयणी या वैदिक शब्दाशीं, लावितां येतें. पण आग्रयणी शब्दाचा वैदिककालीं एक तारकापुंज असा अर्थ होता हें कशावरून ? असा प्रश्न सहजीं उत्पन्न होतो. पाणिनीच्या वेळीं चालू असलेल्या आग्रहायणीचा मृगशीर्ष नक्षत्र हा अर्थ, अर्थात् परंपरागतच असला पाहिजे. आतां, प्रत्येक अयनाचा आरंभ सूर्य कोणत्या तरी नक्षत्रांत असतानांच होणार; म्हणूनच पहिल्या अयनाच्या आरंभीं सूर्याबरोबर उगवणारें नक्षत्र असा आग्रयण याचा हळूहळू अर्थ आला असें समजणें हें कांहीं गैर नाहीं. वैदिक ग्रंथामध्यें आग्रयण याचा तन्नामक नक्षत्र असा अर्थ देणारें वचन कोठें आढळत नाहीं. परंतु तैत्तिरीय संहितेमध्यें यज्ञांतल्या ग्रहांचा म्हणजे पात्रांचा आरंभ आग्रयणापासून आसावा असें सांगितलें आहे, व त्या पात्रांपैकी दुसऱ्या दोन पात्रांना शुक्र व मंथिन् अशीं ग्रहवाचक नावें दिलीं *आहेत. यावरून आग्रयण हेंहि एक आकाशांतील तारागणवाचक नांव असावें असें अनुमान होतें; व त्याच्या स्थानावरून तें नक्षत्र वर्षारंभीचें असावें असें दिसतें. यज्ञ ग्रंथांतला पात्रवाचक ग्रह शब्द आकाशांतील ग्रहांचा वाचक झाला. ह्या यज्ञपात्रांची संख्या व चंद्रसूर्यादि आपल्या ग्रहांचीं संख्या सारखीच आहे. म्हणून मृगशीर्षवाचक हल्लींचा अग्रहायण शब्द आग्रयण या वैदिक शब्दाचेंच रूपान्तर असावा, व मृगशीर्षाला पूर्वीं यज्ञकर्मांत आग्रयण म्हणत असावें, असा बराच संभव दिसतो. आग्रयणेष्टीचा खरा अर्थ लोपल्यावर अग्रहायण ऊर्फ आग्रयण या शब्दाचा अयनारंभीचें नक्षत्र असा अर्थ जाऊन तो शब्द ज्या महिन्यांत ती इष्टि होते त्या महिन्याचा वाचक झाला, व त्यावरून "मासांना मार्गशीर्षोहम्" वगैरे कल्पनांचा पुढें प्रादुर्भाव झाला. आग्रयण शब्दाचा मृगशीर्ष असा

* रुद्रामध्यें हा शुक्र, मंथिन् आग्रयण, विश्वेदेव, ध्रुव हीं नावें एका ठिकाणीं लागोपाठ आलेलीं आहेत.

अर्थ कसाही नाहींसा झाला असो, तरी आग्रहायणीचा पाणिनीच्या वेळीं ओरायन नक्षत्रपुंज असा अर्थ होता हें खास व हा अर्थ त्यास परंपरागतच कळला असला पाहिजे.

या मृगशीर्ष ऊर्फ ओरायनवरून कशा कशा कथा उत्पन्न झाल्या हें आपण पूर्वी पाहिलें आहेच. एकदां तें आपल्या कन्येचाच अभिलाष करणाऱ्या प्रजापतीचें शिर झालें. कांहींनी त्याला यमलोकाच्या द्वाराशीं इंद्रानें छेदिलेलें नमुचीचें डोकें मानिलें. ग्रीक लोकांतही ओरायनची अशीच दोन तीन प्रकारची गोष्ट आहे. कांहीं म्हणतात, ' ओरायनवर इऑस ( उषस् ) हिची प्रीति बसल्यामुळें तिनें त्याला दूर नेलें. परंतु ही गोष्ट देवांस न आवडल्यामुळें आर्टेमिस हिनें त्यास आर्टिजिया येथें बाणानें ठार मारिलें." दुसरे ह्मणतात, "आर्टेमिलची त्यावर प्रीति बसली; परंतु तिचा भाऊ जो अपालो त्यास हें न खपल्यामुळें तो समुद्रांतील दूरची एक वस्तु तिला दाखवून म्हणाला, 'तुला ही वस्तु बाणानें छेदितां येणार नाहीं.' त्यावर तिनें लागेच बाणाचा नेम धरून त्याचें छेदन केलें. परंतु पुढें ती वस्तु म्हणजे समुद्रांत पोहत असलेल्या ओरायनचेंच शिर होतें असें आढळून आलें. " आणखी कांहीं असें म्हणतात कीं, "ओरायननें आर्टेमिसचा अयोग्य रीतीनें अभिलाष केल्यावरून तिनें त्याला एका बाणानें ठार मारिलें." या सगळ्या गोष्टींत अभिलाष, बाण, व शीर्षच्छेदन या वैदिकग्रंथांतील सर्व बाबी आढळून येतात. हें नक्षत्र सूर्योदयीं मावळूं लागणें हें वादळांच्या वगैरे म्हणजे वर्षाकाळाच्या आगमनाचें लक्षण असें ग्रीक लोकांत मानीत; व त्या अन्वयें या नक्षत्राला इंब्रिफर अथवा ॲक्वोसस म्हणजे **वर्षाकाळाला आणणारें** अशा अर्थाचीं नावें त्यांनीं दिलीं होतीं. म्हणजे वेदांत जसें श्व या तारकेला वर्षारंभ करणारी व तिलाच शुनाशिरौ या नांवानें पर्जन्यागमनसूचक असें म्हटलें आहे, तसेंच हें ग्रीक लोकांचें समजावयाचें.

पण जर्मन लोकांतल्या दंतकथा तर याहूनही स्पष्ट आहेत. प्रो. कुह्न म्हणतो---आमच्या प्राचीन व अर्वाचीन अशा दोन्ही दंतकथांमध्यें एक व्याध आहे. त्याला पूर्वी वोडन ऊर्फ गोडन या नावानें मुख्य देव मानीत असत. हा

एका हरिणामागें लागून त्याला बाण मारितो. अशाविषयीं बऱ्याच कथा आहेत. जर्मन कथांमध्यें हा हरिण म्हणजे सूर्यदेवतेचा प्राणी आहे. म्हणजे ही सर्व गोष्ट वेदांतील रुद्रानें ऋष्यरूपी प्रजापतीला मारण्याच्या गोष्टीसारखीच आहे. तसेंच जर्मनींतील व इंग्लंडांतील मध्ययुगीय* तपश्चरणनियमांच्या ग्रंथांत असें वर्णन आहे कीं, जुन्या वर्षाचा शेवट व नव्याचा आरंभ यांच्या मधल्या डाएझ्वोल्फटन म्हणजे वैदिक द्वादशाह, या नांवाच्या काळांत त्या काळचे लोक एक खेळ करीत असत; त्यांत दोन माणसें मुख्य काम करणारीं असत, एक हरिणाचें सोंग घेतलेला व दुसरा हरिणीचें सोंग घेतलेला. हे बारा दिवस सर्व वर्षांत फार पवित्र असल्यामुळें व त्या वेळीं देव मनुष्यांचीं घरें पाहाण्यासाठीं पृथ्वीवर उतरतात अशी कल्पना असल्यामुळें, वर सांगितलेला खेळ त्या देवांचेंच कांहीं तरी चरित्र दाखवीत असावा असें समजण्यास अगदीं हरकत नाहीं. एकंदरींत भारतीय व जर्मन लोकांच्या जुन्या दंतकथांमध्यें फारच साम्य आहे, असें यावरून उघड दिसतें."

या वर्णनांत आलेला जो हरिणाचा खेळ तो जुनें वर्ष व नवें वर्ष यांच्या मधल्या बारा दिवसांत होत असे. त्या दिवसांना+श्वानाचें दिवस अशा अर्थाचें नांव आहे. या दिवसांचा हरिण व व्याध यांशी कांहीं तरी संबंध दिसून येतो. मागें सांगितलेंच आहे कीं, आपलेकडे प्रथम चांद्र व सौर वर्षाचा मेळ बसविण्यासाठीं दर वर्षीं चांद्र वर्षाच्या शेवटीं बारा दिवस धरित असत. हेंच त्या जर्मन लोकांच्या बारा पवित्र दिवसाचें मूळ असलें पाहिजे. वैदिक ग्रंथांतही हा द्वादशाह वार्षिक सत्रासाठीं दीक्षा घेण्याचा काळ असल्यामुळें पवित्र मानिलेला होता. जर मृग व व्याध हे वर्षारंभ करीत आसतांच्या वेळेला अनुलक्षून वर सांगितलेल्या दंतकथा आहेत असें मानिलें, तर त्यांची उपपत्ति अगदीं सहज लावितां येते. मागें एकेठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, ऋग्वेदांत " ऋतुदेवता जे ऋभु त्यांना श्वान वर्षाच्या शेवटीं जागे करीत,"

* Mediaeval Penitentials.

+ Dog days.

असें वर्णन आहे. हीच गोष्ट पाश्चिमात्य देशांतील श्वानांच्या दिवसांचें मूळ होय असें दिसतें. आतां या दिवसांचें वर्षांतील स्थान पालटलें आहे; परंतु त्याचें कारण संपातचलनामुळें ऋतु मागे मागें येतात हेंच होय. याचें दुसरें उदाहरण म्हणजे पूर्वींचें व हल्लींचें पितृपक्षाचें स्थान होय. पूर्वी हें दक्षिणायनारंभीं असे; पण आतां तसें नाहीं. याविषयीं मागें एकेठिकाणीं विवेचन आलेंच आहे. तात्पर्य, ओरायन ऊर्फ व्याध या नक्षत्रामध्यें वसंतसंपात होता. त्या वेळेला अनुलक्षून वर सांगिलेल्या जर्मन कथा आहेत असें मानल्याशिवाय, हा हरिणांचा खेळ जुन्या वर्षाच्या शेवटीं व नव्या वर्षाच्या आरंभीं असलेल्या बारा दिवसांतच कां होत असे, व त्या दिवसांना श्वानाचे दिवस असें कां ह्मणत याचा उलगडा होणार नाहीं.

आतां, या विवेचनावरून उघड दिसेल कीं, जर्मन व ग्रीक लोकांत, ओरायनमध्यें वसंतसंपात असतांना ज्या वेळीं वर्षारंभ होत असे त्या काळाचें स्मरण राहिलें आहे. पूर्वीं दाखविल्याप्रमाणें पारशी लोकांच्या प्राचीन पंचांगावरूनहि ह्याच काळाचें अनुमान होतें. ह्मणजे पारशी, ग्रीक, जर्मन व भारतीय हे चार आर्य लोकांचे वर्ग, या कथा उत्पन्न झाल्यावर व आग्रयण ऊर्फ ओरायन यांचें स्वरूप ठरून गेल्यावर एकमेकांपासून विभक्त झाले असें दिसतें. ही गोष्ट सिद्ध करण्यास आणखी पुराव्याची गरज आहेसें वाटत नाहीं. तरी आणखी एका चमत्कारिक गोष्टींतही या राष्ट्रामध्यें विशेष साम्य दिसून येतें. ती जरा मजेदार व महत्त्वाची असल्यामुळें तीविषयीं थोडा विचार करूं.

ग्रीक पुराणामध्यें, ओरायन हा आपल्या वधानंतर नक्षत्ररूपानें आकाशांत राहिला; व तेथें तो, पट्टा, तरवार, सिंहचर्म व गदा हीं धारण करणाऱ्या राक्षसाच्या रूपानें दिसत आहे, असें वर्णन आहे. आतां ओरायनची उत्पत्ति जर वर सांगितलेल्या आर्य राष्ट्रांची फूटाफूट होण्याच्या पूर्वींची असेल, तर या ओरायनच्या उपकरणांविषयींही त्या सर्वांच्या ग्रंथांमध्यें कांहीं तरी उल्लेख आढळले पाहिजेत. जरा सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास ते तसे आहेत, असें

आढळून येईल. वेदांमध्यें मृगशीर्षाची देवता सोम आहे. म्हणजे पारशी लोकांचा हओम. अवेस्त्यांतील या हओमाच्या सूक्तांत एक श्लोक आहे. त्यांत "हे हओमा तुला मझ्दानें (ईश्वरानें) ताराखचित अशी एक मेखला दिली आहे," असें म्हटलें आहे. पण मूळामध्यें एव्यऑघनेम् असा जो शब्द आहे त्याची मेखला शब्दावरून चांगली कल्पना होणार नाहीं. हा शब्द मूळ झेंद असून त्याचा कस्ति–म्हणजे पारशी लोक जें पवित्र सूत कंबरे भोंवतीं गुंडाळतात तें–असा अर्थ आहे. म्हणजे हओमाची मेखला म्हणजे त्याची कस्ति होय. ओरायनच्या पट्याविषयीं पारशी धर्मग्रंथांत जास्त कांहीं उल्लेख नाहींत. तरी वरील श्लोकावरून तशाप्रकारचें उल्लेख आपल्या ग्रंथांत कोंठे सांपडतील याचा चांगला सुगावा लागतो. वैदिक ग्रंथांत मृगशीर्षाला प्रजापति किंवा यज्ञ म्हटलेलें आहे हें पूर्वीं दाखविलेंच आहे. म्हणून या ओरायनच्या म्हणजे यज्ञाच्या कमरेभोंवताल्च्या पट्याला सहजच यज्ञाचें उपवस्त्र ऊर्फ यज्ञोपवीत म्हणावें लागेल. पण सांप्रत यज्ञोपविताचा अर्थ ब्राह्मणाच्या गळ्यांतील सूत्र असा आहे. तेव्हां त्याचा संबंधही ओरायनच्या पट्याशीं म्हणजे प्रजापतीच्या उर्फ यज्ञाच्या उपवस्त्राशींच आहे असें दाखवितां येईल.

यज्ञोपवीत शब्द यज्ञ व उपवीत यांजपासून झालेला आहे. व त्या समासाचे **यज्ञासाठीं उपवीत** किंवा **यज्ञाचें उपवीत** असे दोन्ही विग्रह होतील. पण परिजातस्मृतिसारामध्यें "यज्ञाख्यः परमात्मा य उच्यते चैत्र होतृभिः। उपवीतं यतोऽस्येदं तस्माद्यज्ञोपवीतकम् ॥" म्हणजे परमात्म्याला यज्ञ म्हणतात, व त्याचें हें उपवीत म्हणून त्याला यज्ञोपवीत म्हणतात, असें सांगितलें आहे. त्यावरून दुसराच विग्रह ग्राह्य दिसतो. यज्ञोपवीत धारण करतेवेळीं ह्मणावयाच्या मंत्राचें पूर्वार्ध असें आहेः——

**यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात् ।**

ह्मणजे, 'यज्ञोपवीत हें परम पवित्र आहे; तें पूर्वी प्रजापतीबरोबर उत्पन्न झालें' या मंत्राचें व वर सांगितलेल्या पारशी मंत्राचें बरेंच साम्य आहे. दोघांमध्येंही हें उपवीत त्या त्या देवतेच्या बरोबरच उत्पन्न झालें (सहज) असें ह्मटलें आहे. हें साद्दश्य काकतालीय असणें संभवत नाहीं; व ह्मणून

आपल्या पवित्र सूत्राची ह्मणजे जानव्याची कल्पना या मृगशीर्षाच्या पट्या-वरूनच निघाली असें दिसतें. उपवीत याचा मूळ अर्थ कापडाचा तुकडा असा आहे; सूत्र असा नाहीं. यावरून यज्ञोपवीताचें मूळस्वरूप कमरेभोंवतीं गुंडाळावयाचा पट असें होतेसें दिसतें. तैत्तिरीय संहितेंत निवीत, प्राचीनावीत व उपवीत हे शब्द आले आहेत. पण मीमांसक* त्यांचा संबंध जानव्याकडे न लावतां यज्ञाचे वेळीं घ्यावयाच्या पटाकडे किंवा मृगाजिनाकडे लावतात. सूत्रामध्यें वर्णिलेल्या उपनयनविधीमध्येंही जानव्याचा संबंध कांहीं नाहीं. पण आतांमात्र उपनयनामध्यें जानवेंच मुख्य झालें आहे. और्ध्वदेहिक विधि करतानां व यज्ञकरतांना जानव्याशिवाय आणखी एक वस्त्राचा तुकाडा परिधान करावयाचा असतो. व ह्या चालीचेंही मूळ वर सांगितलेल्या गोष्टींतच आहे असें दिसतें.

परिधान करावाच्या तीन जानव्यांपैकीं एक उत्तरीय वस्त्राच्या ऐवजीं आहे, असें देवलानें म्हटलें× आहे. यावरून जुनी मूळची रीत काय होती हें स्पष्टच दिसतें. तात्पर्य पहावयाचें एवढेंच कीं, यज्ञोपवीताचा मूळचा अर्थ लहानसें अरुंद वस्त्र असा असून होतां होतां स्मृतिकाळीं त्याचा सूत्र अथवा जानवें असा अर्थ झाला. आतां हें वस्त्र अथवा सूत्र परिधान करण्याची आपली व पारशांची सध्यांची पद्धति निराळी आहे. पारशी लोक आपल्या प्रजा-पतीप्रमाणेंच म्हणजे कमरेभोंवतीं तें गुंडाळतात; व आपण उजव्या खांके-खालून व डाव्या खांद्यावरून घालतों. पण ही आपली पद्धत मागाहून आली असें दिसतें. कारण तैत्तिरीय संहितेमध्यें नेहमींची जानव्याची स्थिति म्हणजे निवीत अशी दिली आहे. हल्लीं निवीत म्हणजे दोन्ही हात मोकळे ठेऊन गळ्यांत सरळ माळेप्रमाणें असलेली जानव्याची जागा. परंतु कुमारिल भट्टानें आपल्या तंत्रवार्तिकामध्यें निवीत* म्हणजे कमरेभोंवतीं गुंडाळणें असाही

---

* अत्र प्रतीयमानं निवीतादिकं वासोविषयं । न त्रिवृत्सूत्रविषयं । ' अजिनं वासो वा दक्षिणतः उपवीय " इत्यनेन सदृशत्वात्। अर्थः-याठिकाणीं निवि-तादि शब्दांचा संबंध वस्त्राशीं आहे; तिहेरी सूत्राशीं (जानव्याशीं) नाहीं. तै. आरण्यक २. १ यांतील ' अजिन (कातडें) किंवा वस्त्र उजवीकडे नेऊन " वगैरे वचनावरून हें उघड दिसतें.

× तृतीयमुत्तरीयार्थं वस्त्राभावे तदिष्यते ।

* निवीतं केचिद्वल्वेणिकाबंधं स्मरन्ति । केचित्पुनः परिकरबंधं ।

३४६२

अर्थ दिला आहे. आनंदगिरि व गोविन्दानन्द यांनींही शांकरभाष्यावरील आपल्या टीकेमध्यें असाच अर्थ दिला आहे. यावरून ब्राह्मणही पूर्वी आपलें उपवीत पारशी लोकांप्रमाणेंच कमरेभोंवतीं बांधीत असत, म्हणजे कांहीं करावयाचें असल्यास ते खरोखरच कंबरबस्ता करीत असत, असें दिसतें. यावरून ब्राह्मणांचें जानवें व पारशांची कस्ति हीं दोन्ही प्रजापतीच्या उपवीताच्याच प्रतिकृति आहेत हें उघड आहे. आपल्या इकडे ओरायनच्या उपकरणांपैकीं एवढें उपवीतच राहिलें आहे असें नाहीं. उपनयन विधीचें जरा निरीक्षण केल्यास मेखला, दंड व चर्म हींहि आह्मी राखून ठेविलीं आहेत असें दिसेल. ज्या मुलाची मुंज करावयाची असते त्याला कमरेभोंवतीं दर्भाची एक मेखला बांधावयाची असते. तिला नाभिस्थानाजवळ तीन गांठीं द्यावयाच्या असतात.× या गांठी ह्मणजे मृगशीर्षांतील वरच्या तीन तारांची प्रतिमाच होत. दुसरें, त्या मुलाला पळसाचा एक दंड घ्यावा लागतो. नवीन मुंज झालेल्या मुलाला आणखी मृगाजिन लागतें. वस्तुतः हें मृगाजिन पूर्वी सर्व अंगभर परिधान करावयाचें होतें. पण होतां होतां त्याची मजल जानव्यालाच एक लहानसा तुकडा लावण्यापर्यंत आली. अशा रीतीनें मुलाला सज्ज करणें ह्मणजे त्याला प्रजापतीचें स्वरूप देणेंच होय. ब्राह्मण होणें ह्मणजे आद्य ब्राह्मण जो प्रजापति त्याचें स्वरूप धारण करणें. प्रजापतीनें मृगरूप धारण केलें होतें; त्याच्या कमरेला मेखला होती व हातांत दंड होता. ह्मणून आम्हीहि ब्राह्मण होणाऱ्या मुलाला मृगाजिन, मेखला व दंड हीं दिलीं.

याप्रमाणें ब्राह्मण बटूला प्रजापतीचा म्हणजे ओरायनचा बहुतेक पोषाख मिळाला; पण ओरायनची तरवार त्याजवळ नाहीं. शिवाय ओरायनचें चर्म सिंहाचें आहे आणि ब्राह्मण बटूचें हरिणाचें आहे. या भेदाचें कारण समजत नाहीं; कदाचित् ओरायनसंबंधानें या कल्पना मागाहून उद्भवल्या असतील. सिंहचर्माबद्दल थोडेंसें कारण सांगतां येईल. सायणाचार्यांनीं मृग शब्दाचे हरिण व सिंह असे दोन्ही अर्थ दिले आहेत. या दोन राष्ट्रांनीं हे दोन निरनिराळे अर्थ घेतले असावे. मृग शब्दाच्या खऱ्या अर्थाबद्दल अजून संशय आहे. म्हणून मृगाजिनाचें चुकीनें सिंहाजिन होऊं शकेल. असो, एकंदरींत नवीन मुंज झालेल्या ब्राह्मण बटूचा पोषाख, ओरायनचा पोषाख, व पारशी

× मेखलां त्रिरावर्त्य नाभिप्रदेशे ग्रंथित्रयं कुर्यात् ।

लोकांची कस्ति यांतील वर दाखविलेल्या विलक्षण साम्यावरून, ओरायनचें स्वरूप व तत्संबंधी कथा, हीं, या तिन्ही लोकांची म्हणजे ग्रीक, पारशी व भारतीय आर्य, यांची फाटाफूट होण्यापूर्वींचींच होत यांत संशय नाहीं.

आतां, ह्याप्रमाणें या नक्षत्रपुंजांविषयींच्या पौर्वात्य व पाश्चिमात्य कथांमध्यें जर इतकें साम्य आहे, निरनिराळ्या आर्य राष्ट्रांमध्यें त्याच्या स्वरूपाविषयीं जर सारख्याच कल्पना आहेत; तसेंच या नक्षत्रपुंजाच्या खालीं व पुढें असलेले तारकापुंज * कॅनिस मेजर व कॅनिस+ मायनर, म्हणजे ग्रीक, कॉन् व प्रोक्वान् व आपले श्वन् व प्रश्वन् म्हणजे ( मागचा ) कुत्रा व पुढचा कुत्रा, हे जर नांवानें व परंपरेनेंही मूळचे आर्यच आहेत, तर स्वतः ओरायन यांचेंही नांव एकाद्या प्राचीन आर्य शब्दाचेंच स्वरूपान्तर असलें पाहिजे, असें मानावयास काय हरकत आहे ? ओरायन हें अगदीं प्राचीन ग्रीक नांव आहे. ओरायन्, क्कॉन्, प्रोक्वान् आणि अर्क्टॉस या चार शब्दांपैकीं, क्कॉन् व प्रोक्वान् हीं संस्कृत श्वन् व प्रश्वन् यांचींच रूपान्तरें व अर्क्टॉस हें ऋक्षसूचें रूपान्तर असलें पाहिजे, असें साहजिक अनुमान होतें. परंतु तें ठरविण्याचें काम जरा अवघड आहे. ग्रीक ओरायन हा पारधी होता म्हणजे त्याला समान असा आपला रुद्र. परंतु रुद्राच्या नांवांपकीं कोणतेंही नांव ओरायनच्या नांवाशीं मिळत नाहीं. परंतु मृगशीर्ष पुंजाच्या आग्रहायण यां नांवाचें मूल स्वरूप जो आग्रयण शब्द त्याचें व ओरायनाचें साम्य दिसतें.

आग्रयण शब्दांतील आद्य आ बद्दल ग्रीकमध्यें ओ होईल. तसेंच आयन याबद्दल ग्रीकमध्यें इऑन् असें होईल. परंतु र् च्या पूर्वीं ग् चा लोप कसा झाला हें सांगणें कठीण आहे. असा लोप शब्दाच्या आरंभीं होतो अशीं उदाहरणें× आहेत. पण व्युत्पत्तिशास्त्रज्ञांच्या मतें ग्रीक व संस्कृत यांच्या परस्पर संबंधांत असा लोप शब्दाच्यामध्यें झाल्याचें उदाहरण नाहीं. इतर भाषांच्या संबंधांत अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत. व तो नियम ग्रीक व संस्कृत यांच्या संबंधालाहि लाविल्यास आग्रयण शब्दापासून ( ओ र्इऑन ) ओरायन शब्दाची सिद्धि

* व्याध

\+ पुनर्वसूच्या तारा चार धरल्यास आकाशगंगेच्याजवळ असेलल्या दोन तारा.

× संस्कृत **ग्रावन्** याचें ग्रीक **लॅऑस्** व **घ्राण** याचें र्हिनास् अशीं रूपें आहेत.

करतां येईल. परंतु ओरायन शब्दाचें मूळ जरी आपल्याला नक्की समजलें नाहीं, तरी निरनिराळ्या आर्य राष्ट्रांतील दंतकथांमधील परस्पर सादृश्यावरून त्याचें मूळस्वरूप कांहीं तरी प्राचीन आर्य शब्दच असला पाहिजे यांत संशय नाहीं. व हें मूळ जरी नक्की समजलें नाहीं तरी वरील एकंदर विवेचनास कोणताही बाध येत नाहीं. या उपपत्तीची बहुतेक भिस्त वैदिक ग्रंथांतील वाक्यावरच आहे, व त्यांचें एकंदर धोरण वसंतसंपात एकदां मृगशीर्षांत होता हें दाखविण्याचें आहे, असें आपण पाहिलेंच आहे. या उपपत्तीला पारशी व ग्रीक दंतकथांवरून चांगली बळकटी येते. तसेंच जर्मन लोकांतील दंतकथांचाही या उपपत्तीवरून चांगला उमज पडतो. पुष्कळ वैदिक गोष्टींचा या उपपत्तीप्रमाणें समाधानकारक अर्थ लागतो हें पूर्वीं दाखविलेंच आहे. अशी जी ही उपपत्ति, इतक्या गोष्टींचा, इतक्या आख्यायिकांचा, इतक्या दंतकथांचा समाधानकारक उलगडा करते, ती खरी मानावयास कोणती हरकत आहे ? परंतु या उपपत्तीला प्रत्यक्ष प्रमाण ह्मणून वेदवचनेंही दाखवितां येतील; व तीं दाखविल्यावर या गोष्टीसंबंधानें शंकेला जागाच रहाणार नाहीं. असो.

वेदांग ज्योतिषांतील कृत्तिकांच्या स्थितीवरून काढलेल्या अनुमानास मॅक्समुलरनें नांवें ठेविलीं आहेत. कां तर त्या स्थितीसंबंधानें वेदांत कांहीं उल्लेख नाहींत. परंतु वेदकाळीं जर वसंतसंपात मृगशीर्षांत होता, तर तो कृत्तिकांत असल्याचे दाखले वेदांमध्यें मिळणार कसे ? परंतु या गोष्टीकडे लक्ष न देतां आजपर्यन्त विद्वान् लोकांनीं भलत्याच गोष्टीवर काथ्याकूट केली आहे. परंतु जर त्यांनीं वैदिक सूक्तांचें योग्य तऱ्हेनें परीक्षण केलें असतें, तर त्यांना ही गोष्ट सहज कळून आली असती. मग ‘ संवत्सराच्या शेवटीं श्वान ऋभूंना जागे करीत ’ या वैदिक ऋचेचा खरा अर्थ कळण्यास त्यांना अडचण पडली नसती. यमाच्या कुत्र्याचें स्थान व वृत्राच्या वधाची जागा, यांच्या ऋग्वेदांतील वर्णनावरून व वृक ऊर्फ श्वानपुंज देवयानाच्या टोंकाला असलेला अपार समुद्र उलटून आल्यावर सूर्याच्या पूर्वीं उगवूं लागतो, या वर्णनावरून त्या काळची संपाताची जागा स्पष्ट दिसून येते.

कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, वैदिक ऋषींना आकाशस्थ गोलांच्या सामान्य गतींविषयींही माहिती होती असें दिसत नाहीं. परंतु हें मत फार संदिग्ध आहे. हल्लींच्याप्रमाणें निरनिराळीं वेधयंत्रें त्यावेळीं नव्हतीं व म्हणून

लोकांची कस्ति यांतील वर दाखविलेल्या विलक्षण साम्यावरून, ओरायनचें स्वरूप व तत्संबंधीं कथा, हीं, या तिन्ही लोकांची म्हणजे ग्रीक, पारशी व भारतीय आर्य, यांची फाटाफूट होण्यापूर्वींचींच होत यांत संशय नाहीं.

आतां, ह्याप्रमाणें या नक्षत्रपुंजांविषयींच्या पौर्वात्य व पाश्चिमात्य कथांमध्यें जर इतकें साम्य आहे, निरनिराळ्या आर्य राष्ट्रांमध्यें त्याच्या स्वरूपाविषयीं जर सारख्याच कल्पना आहेत; तसेंच या नक्षत्रपुंजाच्या खालीं व पुढें असलेले तारकापुंज * कॅनिस मेजर व कॅनिस+ मायनर, म्हणजे ग्रीक, कॉन् व प्रोक्कान् व आपले श्वन् व प्रश्वन् म्हणजे ( मागचा ) कुत्रा व पुढचा कुत्रा, हे जर नांवानें व परंपरेनेंही मूळचे आर्यच आहेत, तर स्वतः ओरायन यांचेंही नांव एकाद्या प्राचीन आर्य शब्दाचेंच स्वरूपान्तर असलें पाहिजे, असें मानावयास काय हरकत आहे ? ओरायन हें अगदीं प्राचीन ग्रीक नांव आहे. ओरायन्, कॉन्, प्रोक्कान् आणि अर्क्टॉस या चार शब्दांपैकीं, क्कॉन् व प्रोक्कान् हीं संस्कृत श्वन् व प्रश्वन् यांचींच रूपान्तरें व अर्क्टॉस हें ऋक्षस्चें रूपान्तर असलें पाहिजे, असें साहजिक अनुमान होतें. परंतु तें ठरविण्याचें काम जरा अवघड आहे. ग्रीक ओरायन हा पारधी होता म्हणजे त्याला समान असा आपला रुद्र. परंतु रुद्राच्या नांवांपकीं कोणतेंही नांव ओरायनच्या नांवाशीं मिळत नाहीं. परंतु मृगशीर्ष पुंजाच्या आग्रहायण यां नांवाचें मूल स्वरूप जो आग्रयण शब्द त्याचें व ओरायनाचें साम्य दिसतें.

आग्रयण शब्दांतील आद्य आ बद्दल ग्रीकमध्यें ओ होईल. तसेंच आयन याबद्दल ग्रीकमध्यें इऑन् असें होईल. परंतु र् च्या पूर्वीं ग् चा लोप कसा झाला हें सांगणें कठीण आहे. असा लोप शब्दाच्या आरंभीं होतो अशीं उदाहरणें× आहेत. पण व्युत्पत्तिशास्त्रज्ञांच्या मतें ग्रीक व संस्कृत यांच्या परस्पर संबंधांत असा लोप शब्दाच्यामध्यें झाल्याचें उदाहरण नाहीं. इतर भाषांच्या संबंधांत अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत. व तो नियम ग्रीक व संस्कृत यांच्या संबंधालाहि लाविल्यास आग्रयण शब्दापासून ( ओ र्इऑन ) ओरायन शब्दाची सिद्धि

* व्याध

+ पुनर्वसूच्या तारा चार धरल्यास आकाशगंगेच्याजवळ असेलल्या दोन तारा.

× संस्कृत **ग्रावन्** याचें ग्रीक **लॅऑस्** व **घ्राण** याचें ऱ्हिनास् अशीं रूपें आहेत.

करतां येईल. परंतु ओरायन शब्दाचें मूळ जरी आपल्याला नक्की समजलें नाहीं, तरी निरनिराळ्या आर्य राष्ट्रांतील दंतकथांमधील परस्पर साहश्यावरून त्याचें मूळस्वरूप कांहीं तरी प्राचीन आर्य शब्दच असला पाहिजे यांत संशय नाहीं. व हें मूळ जरी नक्की समजलें नाहीं तरी वरील एकंदर विवेचनास कोणताही बाध येत नाहीं. या उपपत्तीची बहुतेक भिस्त वैदिक ग्रंथांतील वाक्यावरच आहे, व त्यांचें एकंदर धोरण वसंतसंपात एकदां मृगशीर्षांत होता हें दाखविण्याचें आहे, असें आपण पाहिलेंच आहे. या उपपत्तीला पारशी व ग्रीक दंतकथांवरून चांगली बळकटी येते. तसेंच जर्मन लोकांतील दंतकथांचाही या उपपत्तीवरून चांगला उमज पडतो. पुष्कळ वैदिक गोष्टींचा या उपपत्तीप्रमाणें समाधानकारक अर्थ लागतो हें पूर्वीं दाखविलेंच आहे. अशी जी ही उपपत्ति, इतक्या गोष्टींचा, इतक्या आख्यायिकांचा, इतक्या दंतकथांचा समाधानकारक उलगडा करते, ती खरी मानावयास कोणती हरकत आहे ? परंतु या उपपत्तीला प्रत्यक्ष प्रमाण ह्मणून वेदवचनेंही दाखवितां येतील; व तीं दाखविल्यावर या गोष्टीसंबंधानें शंकेला जागाच रहाणार नाहीं. असो.

वेदांग ज्योतिषांतील कृत्तिकांच्या स्थितीवरून काढलेल्या अनुमानास मॅक्समुलरनें नांवें ठेविलीं आहेत. कां तर त्या स्थितीसंबंधानें वेदांत कांहीं उल्लेख नाहींत. परंतु वेदकाळीं जर वसंतसंपात मृगशीर्षांत होता, तर तो कृत्तिकांत असल्याचे दाखले वेदांमध्यें मिळणार कसे ? परंतु या गोष्टींकडे लक्ष न देतां आजपर्यन्त विद्वान् लोकांनीं भलत्याच गोष्टीवर काथ्याकूट केली आहे. परंतु जर त्यांनीं वैदिक सूक्तांचें योग्य तऱ्हेनें परीक्षण केलें असतें, तर त्यांना ही गोष्ट सहज कळून आली असती. मग ' संवत्सराच्या शेवटीं श्वान ऋभूंना जागे करीत ' या वैदिक ऋचेचा खरा अर्थ कळण्यास त्यांना अडचण पडली नसती. यमाच्या कुत्र्याचें स्थान व वृत्राच्या वधाची जागा, यांच्या ऋग्वेदांतील वर्णनावरून व वृक ऊर्फ श्वानपुंज देवयानाच्या टोंकाला असलेला अपार समुद्र उल्टून आल्यावर सूर्याच्या पूर्वीं उगवूं लागतो, या वर्णनावरून त्या काळची संपाताची जागा स्पष्ट दिसून येते.

कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, वैदिक ऋषींना आकाशस्थ गोलांच्या सामान्य गतींविषयींही माहिती होती असें दिसत नाहीं. परंतु हें मत फार संदिग्ध आहे. हल्लींच्याप्रमाणें निरनिराळीं वेधयंत्रें त्यावेळीं नव्हतीं व म्हणून

तेव्हांचे वेध आतांच्या इतके सूक्ष्म नव्हते, असा जर वरील म्हणण्याचा अर्थ असेल, तर तें अक्षरशः खरें आहे. परंतु वैदिक ऋषींना सूर्य व उषा याखेरीज दुसरें कांहीं माहीत नव्हतें; नक्षत्रें, मास, अयनें, वर्ष, वगैरे गोष्टी त्यांना अगदीं अपरिचित होत्या, असा जर त्याचा अर्थ असेल तर मात्र या म्हण-ण्याला ऋग्वेदांत मुळींच आधार नाहीं. अर्जुनी, अघा, हीं नक्षत्रांचीं नावें ऋग्वेदांत* आलीं आहेत. तसेंच नक्षत्रांचा सामान्यतः निर्देश× आणि चंद्राच्या आणि सूर्याच्या+ गतींचें ऋतूत्पादकत्व यांविषयींचेही उल्लेख त्यांत आहेत. देवयान व पितृयान या नांवांनीं वर्षाचीं दोन अयनें त्या वेळीं प्रसिद्ध होतीं. चांद्र व सौर वर्षांचा मेळ ठेवण्यासाठीं धरलेल्या अधिक महिन्याचेंही वर्णन ऋग्वेदांत× आहे. वरुणानें सूर्यासाठीं केलेला विस्तीर्ण मार्ग जो ऋत ज्यांमध्यें द्वादशादित्यांनां ठेविलेलें आहे, व ज्या मार्गाचा सूर्यादि ज्योति कधीं अतिक्रम करीत नाहींत, तो म्हणजे क्रांतिवृत्ताचा पट्टाच होय. प्रोफेसर लड्विग् याच्या मतें तर ऋग्वेदामध्यें क्रांतिवृत्त व विषुववृत्त यांमधील नतीचा म्हणजे ऽतिर्यक्-त्वाचाही उल्लेख आला आहे. वेदकालीं सप्तर्षि हे ऋक्षाः* या नांवानें माहीत होते. ऋग्वेदांत आलेले शतभिषक् ह्मणजे शततारका नक्षत्रच असावें असें दिसतें. यासंबंधानें ऋग्वेदांतील पांचव्या मंडळांतलें चाळीसावें सूक्त तर फार

---

* सूर्याया वहतुः प्रागात् सविता यमवासृजत्। **अघासु** हन्यन्ते **गावो-र्जुन्योः** पर्युह्यते ॥ ऋ. १०, ८५, १३.

× सोमेनादित्या बलिनः सोमेन पृथिवी मही। अथो **नक्षत्राणा**मेषा उपस्थे सोम आहितः ॥ १०, ८५ २.

+ पूर्वापरं चरतो माययैतो शिशू क्रीळन्तौ परियातो अध्वरम् । विश्वा-न्ययो भुवनाभिचष्ट ऋतूँरन्यो विदधज्जायते पुनः ॥ १०, ८५, १८.

× ऋ. १, २५, ८.

ऽ क्रांतिवृत्त ह्मणजे पृथ्वीचा सूर्याभोंवतीं फिरण्याचा मार्ग; व पृथ्वीचें पूर्व-पश्चिम मध्यवृत्त ह्मणजे विषुववृत्त. त्याची पातळी आकाशाला मिळेपर्यंत वाढ-विली ह्मणजे जें होतें तें आकाशाचें विषुववृत्त. हें विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांमध्यें सुमारें २३½ अंशाचा कोण आहे. यालाच नति म्हटलें आहे.

* सप्तर्षीनुहस्मैवै पुरर्क्षा (पुरा ऋक्षा) इत्याचक्षते ॥ श. ब्रा. २ १,२,४.

महत्त्वाचें आहे. या सूक्तामध्यें सूर्याच्या एका खग्रासग्रहणाचें वर्णन आहे. या सूक्ताच्या एका ऋचेंत अत्रीनें "सूर्याला तुरीय ब्रह्मानें जाणिलें" असें ह्मटलें × आहे. त्याचा अर्थ अत्रीनें तुरीय नांवाच्या वेधयंत्रानें ग्रस्त सूर्याचा वेध घेतला असा केला पाहिजे. या पद्धतीनें वरील सूक्ताची ओढाताण केल्याशिवाय सरळ अर्थ लागतो. यावर कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, वैदिक ऋषींस ज्योतिषाचें इतकें ज्ञान असलें तरी त्यांस ग्रहांची माहिती नव्हती. परंतु याहि म्हणण्यांत कांहीं तथ्य नाहीं. नक्षत्रें पहात असतां गुरुशुक्रासारखे सर्व नक्षत्रांहून अधिक तेजःपुंज गोल त्यांना न दिसणें हें केवळ असंभवनीय आहे. शुक्राचें कांहीं दिवस पूर्वेस दिसणें, नंतर कांहीं दिवसांनीं पश्चिमेस दिसणें, तसेंच त्याचें कांहीं एक नियमित अंशांपर्यन्तच वर येणें, या गोष्टींकडे नुसत्या वरवर पहाणाऱ्यांचेंही लक्ष न लागणें शक्य नाहीं. पण या संबंधानें नुसत्या अनुमानांवरच थांबण्याची गरज नाहीं. ब्राह्मणकाळीं ग्रह माहीत होते यांत तर शंकाच नाहीं. तैत्तिरीय ऽ ब्राह्मणामध्यें 'बृहस्पति प्रथम तिष्य म्हणजे पुष्य नक्षत्राजवळ उत्पन्न झाला' असें वर्णन आहे. व अजूनहि गुरुपुष्य योग हा फार मंगल समजतात. आतां खुद्द *ऋग्वेदासंबंधानें पहावयाचें. यज्ञामध्यें लागणाऱ्या दोन पात्रांना शुक्र व मंथिन् अशीं नावें आहेत. वर एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें हीं नावें पात्रांना आकाशस्थ गोलांच्या नांवावरून पडलीं असावीं असें दिसतें. वार्षिक सत्र ह्मणजे सूर्याच्या वार्षिक गतीची प्रतिमाच होय. म्हणून यज्ञांतील वस्तूंना नक्षत्र ग्रहादिकांचीं नांवें देणें अगदीं स्वाभाविक होतें. वरील पात्रांना शुक्राचें पात्र मंथिन्चें पात्र असेंहि तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे. आतां शुक्र व मंथिन् वगैरे शब्दांचा सोमरस किंवा दुसरा एखादा अर्थ घ्यावयास कांहीं आधार नाहीं. यास्तव तीं नावें ग्रहांचीच होत यांत संशय नाहीं. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांत वेनाचें एक सूक्त आहे. वेन

× गूळ्हं सूर्यं तमसापव्रतेन तुरीयेण ब्रह्मणाऽविंददत्रिः ॥ ५, ४०, ६.

ऽ बृहस्पतिः प्रथमं जायमानः । तिष्यं नक्षत्रमभिसंबभूव ॥

तै. ब्रा. ३-१-१-५.

* ऋ. सं. ४-५०-४ यांत 'बृहस्पतिः प्रथम जायमानो महो ज्योतिषः परमे व्योमन्'। असें तै. ब्रा. तील वरील वचनासारखेंच वचन आलें आहे.

शब्द वेन् किंवा विन् ( प्रीति करणें ) या धातूपासून निघाला आहे. त्याच्या सूक्तामध्यें, " सूर्याचा पुत्र," " ऋताच्या अग्रीं " "लाटेसारखा समुद्रांतून येतो " अशीं तत्संबंधानें † वाक्यें आहेत. यावरून वेन हें नांव व्हीनस् शब्दाचें मूळ आर्यरूप असावें असें दिसतें. शुक्रग्रहवाचक लॅटीन व्हीनस ही प्रीतीची देवता आहे. संस्कृत वेन शब्दहि प्रीति करणें या अर्थाच्या धातूपासूनच निघाला आहे. शिवाय यज्ञामध्यें शुक्रपात्र घेतानांच या वेनाच्या सूक्ताचा उपयोग करावयाचा असतो. या गोष्टी लक्षांत आणतां वैदिक वेन व लॅटीन व्हीनस् हीं एकच असलीं पाहिजेत असें दिसतें. आतां या शब्दांची लिंगें एकच नाहींत. लॅटीन् व्हीनस स्त्रीलिंगी आहे. परंतु हा लिंगभेद मोठासा महत्वाचा नाहीं. यूरोपमध्यें जातांना चंद्राचाहि असाच लिंगविपर्यय झाला आहे. शुक्र वेदकाळीं माहीत होता, या गोष्टीला दुसरा आधार ग्रीक भाषेंतील क्रुप्रिस् हा शब्द आहे. हा शब्दही शुक्रग्रहवाचकच आहे. स्वशास्त्राच्या ( phonetics ) नियमाप्रमाणें संस्कृत शुक्र शब्दाचें ग्रीक रूप क्रुप्रॉस् असें होईल. पण यूरोपमध्यें जातांना या ग्रहाचा लिंगविपर्यय झाल्यामुळें कुप्रॉस् याचें क्रुप्रिस् असें स्त्रीलिंगी रूप झालें. अशारीतीनें या ग्रहाच्या लॅटीन व ग्रीक भाषेंतील अनुक्रमें व्हीनस व क्रुप्रिस् या नांवाची परंपरा वैदिक वेन व शुक्र या शब्दांशीं लावतां येते. यावरून असें दिसतें कीं, हे तीन प्रकारचे लोक एकत्र असतानांच शुक्राची माहिती होऊन त्याचें नामकरणही झालें होतें.

या वरील विवेचनांतील कांहीं गोष्टी जरी संशयित असल्या तरी त्यावरूनही वैदिक ऋषींना ज्योतिषांतील ढोबळ गोष्टी तरी निदान माहीत होत्या एवढें उघड होतें. चंद्रसूर्यांच्या वार्षिक गतीवरून होणारे कालविभाग त्यांनीं ठरविले होते. सौरवर्षाचें मानही त्यांनीं निश्चित केलें होतें, व चांद्रवर्षाचा त्याशीं मेळ घातला होता. नक्षत्रांच्या उदयास्तांचें त्यांनीं योग्य निरीक्षण केलें होतें. चंद्र, सूर्य व त्यांना माहीत असलेले ग्रह, हे आकाशांतील एका ऋत नांवाच्या

† सूर्यस्य शिशुम् ( १०, १२३. १ );
ऋतस्य सानौ ( १०, १२३, २ );
समुद्रादूर्मिमुदियर्ति वेनः (१०, १२३, २ );

विशिष्ट पट्याचें* कधींही अतिक्रमण करीत नाहींत हें त्यांना समजलें होतें. चंद्रसूर्यांच्या ग्रहणाकडेही त्यांचें बरेंच लक्ष गेलें होतें. इतक्या गोष्टी ज्या लोकांना परिचित होत्या, त्यांना साहजिकच, त्या त्या वेळीं उगवणाऱ्या नक्षत्रांवरून, मासारंभ, वर्षारंभ, वगैरे ठरवितां आले असले पाहिजेत. यंत्रांच्या साहाय्यावांचूनही दिवस व रात्र केव्हां सारखीं होतात, तसेंच सूर्य दक्षिणेकडे अथवा उत्तरेकडे केव्हां वळतो, हें कळणें फारसें कठीण नाहीं. ह्मणून अशा प्रकारच्या साध्या गोष्टी समजण्याची त्यांची शक्ती होती व तशा त्यांना त्या समजत असत, असें पुढील विवेचनांत धरून चलावयाचें आहे,

ऋग्वेदांत पहिल्या $ मंडळांत एक ऋचा आहे, तिचा मागें एकदोनदां उल्लेख आला आहेच. तींत "एक श्वान ऋभूंना संवत्सराच्या शेवटीं जागें करी" अशा अर्थाचा मजकूर आहे. ती ऋचा अशी:—

सुषुप्वांस॑ ऋभव॒स्तद॑पृच्छ॒तागो॑ह्य॒ क इ॒दं नो॑ अबूबुधत्
श्वानं॑ ब॒स्तो बो॑धयि॒तार॑मब्रवीत्संवत्स॒र इ॒दम॒द्या व्य॑ख्यत ॥

अर्थः—"हे ऋभूहो तुम्हीं निजून उठल्यावर विचारिलेंत कीं हें अगोह्य आतां आह्मांला कोणी जागें केलें ? बस्त्यानें (सूर्य—अगोह्य) तो जागें करणारा श्वान होय असें सांगितलें व ह्मणाला, आज संवत्सर आटोपल्यावर त्यानें असें केलें." ऋभू ह्मणजे सूर्याचे किरण असें यास्क व सायणाचार्य ह्मणतात; परंतु कित्येक दुसऱ्या गोष्टींवरून, कांहीं यूरोपीय पंडितांनीं सुचविल्याप्रमाणें, त्यांचा अर्थ ऋतु असा घेणें बरें दिसतें. हे ऋभू ह्मणजे ऋतुदेवता वर्षभर काम करून नंतर आगोह्याच्या ह्मणजे सूर्याच्या घरीं बारा दिवस पर्यंत स्वस्थ झोंप घेत पडतात, असें वर्णन आहे. हे बारा दिवस म्हणजे चांद्रसौर वर्षांचा मेळ घालण्यासाठीं धरलेले अधिक दिवस होत. यांचा कोणत्याच वर्षांत अन्तर्भाव होत नसल्यामुळें ऋतूंनीं आपलें काम बंद करून त्या दिवसांत स्वस्थ झोंप घेतली

* हा पट्टा ह्मणजे राशिचक्र (zodiac) होय क्रान्तिवृत्ताच्या दोहों बाजूंना आठ आठ अंश इतका भाग यांत येतो. चंद्र व सूर्य व इतर ग्रह यांतूनच नेहमीं फिरतात; याच्या बाहेर कधीं जात नाहींत. अश्विन्यादि सर्व नक्षत्रेंहि या पट्यांतच आहेत.

$ १, १६१, १३.

म्हणणें अगदीं योग्यच आहे. आतां प्रश्न एवढाच कीं, हा ऋतूंना जागें करणारा कुत्रा कोण ? वरील विवेचनावरून तो कुत्रा म्हणजे मृगपुंजाजवळचा श्वानपुंजच असला पाहिजे हें उघड आहे. म्हणजे अर्थातच या तारकापुंजाशीं सूर्य आला म्हणजे वसंत ऋतूस, व नव्या वर्षास सुरुवात होऊन ऋतुदेवता जाग्या होऊन आपलें काम चालू करीत. म्हणजे वसंतसंपात त्या वेळीं श्वानपुंजाजवळ होता. श्वानपुंजाजवळ वसंतसंपात असला म्हणजे उत्तरायणारंभ फाल्गुनी पौर्णिमेला येतो व मृगशीर्षही नक्षत्रमालेच्या आरंभ होतें. अशा रीतीनें तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण यांतील वचनांचा उलगडा होतो. वसंतसंपात मृगांत होता हें दाखविण्याला ऋग्वेदांतील हें स्पष्ट वाक्य आहे.

दुसराहि असाच एक स्पष्ट उल्लेख आहे. परंतु तो ज्या सूक्तांत आहे तिचा अर्थ आजपर्यंत कोणास नीट कळलाच नाहीं. हें सूक्त म्हणजे दहाव्या* मंडळांतील वृषाकपीचें सूक्त होय. वृषाकपि म्हणजे कोण ? याविषयीं अनेकांचे अनेक तर्क आहेत. पण त्या सर्वांच्या मतें तें सूर्याचें एक कोणतें तरी स्वरूप आहे. आतां हें स्वरूप नक्की कोणतें असावें हें पहावयाचें. वृषाकपि हा शब्द विष्णु व शंकर या दोहोंचाही वाचक† आहे. पूर्वी मृगशीर्षाच्या वर्णनांत सांगितलेंच आहे कीं, या दोन्ही देवांची कल्पना मृगशीर्षाच्या अनुक्रमें सूर्योदयी व सूर्यास्तीं उगवण्याच्या योगानें सूचित होणाऱ्या गोष्टीमुळेंच उत्पन्न झाली असावी. ही गोष्ट लक्षांत आणता वृषाकपि याचा अर्थ या सूक्तांत शरत्संपातीं असलेला सूर्य असा घेतला पाहिजे. या सूक्तांमध्यें जी गोष्ट आहे तिचा मथितार्थ असा—" वृषाकपि हा मृग असून इन्द्राचा मित्र आहे. पण तो जेथें उन्मत्त होतो तेथें यज्ञ बंद पडतात. या मृगानें इन्द्राणीच्या कांहीं आवडत्या वस्तू नासून टाकिल्या. म्हणून ती इन्द्राला या मृगाला इतका आवडता करून ठेवण्याबद्दल रागें भरली. पण इन्द्र त्याला शिक्षा न करितां उलट त्याच्या मागोमाग जाऊं लागला. म्हणून इन्द्राणी रागावून त्या मृगाचें मस्तक छेदण्यास निघाली व त्याच्यामागें तिनें एक कुत्रा लावून दिला. पण इतक्यांत इन्द्रानें मध्यें पडून तिला समजविली..

* ऋग्वेद १०–८६.

† हरोविष्णूर्वृषाकपिः ॥ अमर.

मग ती म्हणते, शिक्षा म्हणजे शीर्षछेदन वगैरे इन्द्राच्या आवडत्या मृगाला न होतां दुसऱ्याच एकाला झाली. नंतर वृषाकपि आपल्या घरीं खालीं ( नेदीयसः ) जावयास निघाला. तेव्हां इन्द्रानें त्यास निरोप देऊन यज्ञांना पुनः आरंभ व्हावा म्हणून त्यास आपल्या घरीं पुनः यावयास सांगितलें. त्याप्रमाणें जेव्हां वृषाकपि पुनः इंद्राच्या घरीं वर ( उदंचः ) आला तेव्हां त्याबरोबर तो पूर्वींचा द्वाड मृग नव्हता. म्हणून वृषाकपि, इन्द्र व इन्द्राणीं तेथें आनंदानें भेटलीं. ”

आतां या गोष्टींतील महत्वाच्या भागांचा विचार करू. वृषाकपीच्या योगानें यज्ञ बंद पडतात, इन्द्राणीनें त्याच्या मागें कुत्रा लावून दिला, तो आपल्या घरीं म्हणजे खालीं ( नेदीयसः) गेला व पुनः इन्द्राच्या घरीं वर ( उदंचः ) आल्यावर यज्ञ पुनः सुरू होतात, ह्या यांतील महत्वाच्या व न समजण्यासारख्या गोष्टी आहेत, पण वृषाकपि याचा अर्थ, मृगशीर्षांत वसंतसंपात असतांना शरत्संपातीं असलेला सूर्य, असा घेतला म्हणजे या सर्व गोष्टी चांगल्या समजतात. मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, पूर्वीं उत्तरायणाचा उर्फ देवयानाचा आरंभ वसंतसंपातापासून व दक्षिणायनाचा उर्फ पितृयानाचा शरत्संपातापासून होत असे.

आतां हें उघडच आहे कीं, पितृयानामध्यें कोणतींही देवकर्मैं व यज्ञ होत नाहींत. ज्या अर्थीं मृग नक्षत्र सूर्यास्तीं उगवूं लागलें ह्मणजे पितृयानाला आरंभ होत असे, त्या अर्थीं वृषाकपीच्या योगानें यज्ञ बंद पडणें हें योग्यच आहे. त्याच्यामागें कुत्रा लावून दिला आहे या गोष्टीवरून त्या नक्षत्राची ओळख पटण्याला आतां उशीर लागणार नाहीं. हा कुत्रा म्हणजे श्वानपुंजच होय. आतां यापुढें उघडच वृषाकपि दक्षिणायनांत गेल्यामुळें ‘खालीं’ गेला व पुढें वसंतसंपातांत पुनः आल्यावर ह्मणजे देवयानांत आल्यावर ‘वर’ म्हणजे उत्तरेकडे असलेल्या इन्द्राच्या घरीं आला. मग अर्थात्च नूतनवर्षारंभ झाल्यामुळें यज्ञयागांनांही सुरुवात होते. आतां या वेळीं हें नक्षत्र सूर्योदयीं उगवूं लागल्यामुळें अर्थात्च तें दिसेनासें झालें, म्हणजे सूर्य इन्द्राच्या घरीं म्हणजे उदगयनांत शिरल्यावर तो द्वाड मृग नाहींसा झाला. अशा रीतीनें वृषाकपिरूपी सूर्य म्हणजे शरत्संपातांतील सूर्य असें मानिल्यास या सूक्ताचा बराच समाधानकारक व सरळ अर्थ लागतो. यावरून या सूक्तामध्यें मृगशीर्ष व श्वानपुंज यांचेंच वर्णन केवळ आहे असें नाहीं, तर सूर्य ज्यावेळीं विषुववृत्ता-

च्या दक्षिणेस किंवा उत्तरेस येऊं लागतो तेव्हांची त्याची स्थितीही त्यांत स्पष्टपणें वर्णिली आहे. या गोष्टीशीं ऋभूंची गोष्ट जोडली म्हणजे आपणाला या गोष्टी जेव्हां रचल्या गेल्या तो काळ निश्चित करण्याला बिनचूक व खात्रीलायक पुरावा मिळतो. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास तैतिरीय संहिता व ब्राह्मणें यांत दिलेले प्राचीन वर्षारंभ केवळ काल्पनिक नसून खरोखरच तेव्हां ते पूर्वीपासून परंपरागत आलेले होते, असें अगदीं कबूल केलें पाहिजे.

याप्रमाणें तैत्तिरीय संहितेंत सांगितलेल्या दोन प्राचीन वर्षारंभांपैकीं एकाची परंपरा ऋग्वेदापर्यंत नेऊन पोंचविली, व तत्संबंधाच्या वैदिक कथांस, पारशी व ग्रीक या दुसऱ्या आर्य शाखांच्या जुन्या ग्रंथांवरून व त्यांत असलेल्या दंतकथांवरून पूर्ण पाठबळ मिळतें असेंही आपण पाहिलें. एकेका राष्ट्रांतील कथा व्यक्तिशः घेतल्यास त्या कदाचित् निर्णायक नसतील. परंतु त्यांची परस्पर तुलना करतां जर त्या सर्वांवरून एकच अनुमान निघतें असें आढळलें, तर मात्र त्या सर्वांचें एकत्र फल निर्णायकच असलें पाहिजे. या तीन राष्ट्रांच्या पुराणकथांमधील साम्य विद्वान् लोकांस अगोदरच कळून आलेलें आहे. परंतु हे सर्व लोक ज्या काळीं एकत्र रहात असत, त्या काळाचा कांहीं सुगावा न लागल्यामुळें त्या सर्व कथांचें त्यांस एकीकरण करतां आलें नाहीं. पण ओरायनसंबंधाच्या गोष्टी व विशेषेंकरून त्याची वसंतसंपातांतील स्थिति यांवरून हा सुगावा आपणाला मिळतो, व त्यावरून अति प्राचीन आर्यसुधारणाकालाचें कोडें बऱ्याच समाधानकारक रीतीनें सुटतें. ओरायन हा कोण व कोठला हें आतां समजलें. आतां, इन्द्राचें वृत्राला किंवा नमुचीला मारण्याचें फेनात्मक शस्त्र म्हणजे काय, चिन्वत् सेतूवर ठेवलेला चार डोळ्यांचा कुत्रा हा कोण, अथवा ऋभूंनां श्वानानें संवत्सराच्या शेवटीं जागें केलें ह्मणजे काय, या गोष्टींबद्दल कांहीं तरी तर्क करीत बसण्याचें कारण नाहीं.

इतकें समजल्यावर मग या विषयांत ज्योतिःशास्त्रविषयक काठिण्य मुळींच नाहीं. नक्षत्रादिकांच्या स्थानपर्यायावरून आपण काल मोजीत असतों. पण या कालमापनकोष्टकांत संपाताच्या प्रदक्षिणाकालाहून मोठें परिणाम असलेलें अद्यापि माहीत नाहीं. म्हणून जर आपल्याला प्राचीनकाळच्या नक्षत्रादिकांच्या जागा निश्चित समजल्या तर त्या कालाचें मान निश्चित करण्यास हें उत्तम साधन होईल.

सुदैवानें असल्या प्रकारचें उल्लेख ऋग्वेदांत आहेत व ते ग्रीक, पारशी व भारतीय आर्य एकत्र रहात असत त्या वेळचे आहेत; हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. म्हणून त्यांचें ग्रीक व पारशी कथांच्या सहाय्यानें आपणांस स्पष्टीकरण करतां येईल. फाल्गुनी पूर्णमास हा एकदां वर्षारंभ होता असें सांगणाऱ्या तैत्तिरीय संहितेंतील व ब्राम्हणांतील वचनांवरून पहातां पहातां आपल्याला मृगशीर्षाचें असें एक नांव आढळलें कीं, त्याचा वास्तविक अर्थ घेतल्यास त्यावरून प्राचीनकाळीं एकदां वसंतसंपात त्या नक्षत्रांत होता असें दिसेल. यावरून तैत्तिरीयसंहितावचनाच्या सत्यत्वाबद्दल साक्ष पटली. कारण फाल्गुनी पौर्णिमेला जर सूर्य दक्षिणायनीं असला तर पूर्णचंद्र सूर्याच्या अगदीं समोर म्हणजे उत्तराफल्गुनी नक्षत्रांत असला पाहिजे. म्हणजे उत्तराफल्गुनी नक्षत्रीं उत्तरायण बिंदु आला; वसंतसंपात मृगशीर्षात आला. * याच मानानें पहातां दक्षिणायन जर माघी पौर्णिमेला झालें तर वसंतसंपात कृत्तिकांत येतो, व तें पौषांत झाल्यास तो संपात अश्विनींत येतो. म्हणजे अश्विनी व पौष, कृत्तिका व माघ, आणि मृगशीर्ष व फाल्गुन या अयनचलनाच्या योगानें अनुक्रमें बदलत जाणाऱ्या वर्षारंभाच्या परस्परसंबद्ध जोड्या आहेत. हे सर्व वर्षारंभ आर्यसुधारणेच्या निरनिराळ्या काळीं अस्तित्वांत होते हें दाखविणारीं वचनें व पुराणकथा पुष्कळ आहेत हें आपण पूर्व विवेचनांत पाहिलें आहेच.

याप्रमाणें येथवर आपण तैत्तिरीयसंहितेंत सांगितलेल्या दोन प्राचीन वर्षारंभांपैकीं एकाचा विचार केला. परंतु त्याच्याच बरोबर बहुतेक त्याच शद्बांनीं सांगितलेल्या दुसऱ्या वचनाचा अर्थ कसा करावयाचा ? याचें उत्तर जसा एकाचा केला तसाच दुसऱ्याचा करावयाचा हेंच होय. फाल्गुनी पौर्णिमेला दक्षिणायन झाल्यास वसंतसंपात मृगशीर्षांत येतो. त्याचप्रमाणें चैत्री पौर्णिमेला जर तें झालें तर वसंतसंपात पुनर्वसूंत होईल. ( आकृति पहा ) हा काळ प्राचीन होतो. वेदांमध्यें संदिग्ध गोष्टीपलीकडे त्यासंबंधानें कांहींच आढळत नाहीं; आणि ग्रीक व पारशी लोकांत असल्या संदिग्ध गोष्टीहि नाहींत.

पुनर्वसूंत वसंतसंपात होता अथवा तें नक्षत्र नक्षत्रचक्रांत कधीं पहिलें मानीत असत, असें स्पष्ट सांगणारीं वचनें आढळत नाहींत. अथवा तद्वाचक दुसरें एखादें नांवही नाहीं, कीं ज्यावरून आग्र-

* आकृति पहा.

हायणामध्यें सांपडलेल्या गोष्टीसारख्या गोष्टींचा कांहीं पत्ता लागेल. तरी पण यज्ञग्रंथांत पुनर्वसूंच्या प्राचीन स्थितीच्या कांहीं खुणा आहेत. अदिति ही पुनर्वसूंची अधिष्ठात्री देवता आहे; आणि ऐतरेय* ब्राह्मण व तैत्तिरीयसंहिता यांमध्यें असें सांगितलें आहे कीं "आदितिपासून सर्व यज्ञांना आरंभ व्हावा, व अदितिबरोबरच त्यांची समाप्ति व्हावी, असा तिला वर मिळालेला आहे." यज्ञ देवांपासून निघून गेला, तेव्हां त्यांनां कांहीं विधि करितां येईनासे झालें. व तो कोठें गेला असावा हेंही त्यांना समजेना. अशा स्थितींत अदितीनें देवांना मदत करून यज्ञारंभ करून दिला; व म्हणून वर सांगितलेला वर तिला मिळाला आहे. याचा अर्थ असा आहे कीं या काळाच्या पूर्वी यज्ञ वाटेल तेव्हां करीत असत; परंतु तेव्हांपासून ते अदितीपासून करावे असें ठरवून टाकिलें. म्हणजे अदिती ही यज्ञाची ऊर्फ संवत्सराची आरंभक झाली. वाजसनेयी संहितेंत (४. १९) अदितीला 'उभयतः शीर्ष्णी' म्हणजे "दोहोंकडून डोकें असलेली" असें म्हटलें आहे; आणि हीं डोकीं म्हणजे अदितीपासून आरंभ होणाऱ्या व अदितीपाशीं संपणाऱ्या यज्ञांचीं टोकें होत, असा अर्थ टिकाकारांनी दिला आहे.

याज्ञिक परिभाषेमध्यें विषूवानाच्या पूर्वीच्या चवथ्या दिवसाला अभिजित्-दिन असें म्हटलें आहे. त्यावरून वरील गोष्टीस आधार मिळतो. अभिजित् दिनाचें नांव अभिजित् नक्षत्रावरून पडलें असें मानल्यास, म्हणजे त्या दिवशीं सूर्य त्या नक्षत्रीं होता असें समजल्यास, विषूवान् ऊर्फ शरत्संपात अभिजित् नक्षत्राच्या पुढें चार अंश येतो. अदिति ऊर्फ पुनर्वसू यांमध्यें वसंतसंपात होता असें मानिल्यास गणितानें अभिजित् नक्षत्राची हीच स्थिति येते. सूर्यसिद्धान्ताप्रमाणें रेवतीपासून पुनर्वसूचे विषुवांश ९३ व अभिजित्चे २६६ व चाळीस कला अथवा सुमारें २६७, असे आहेत. पुनर्वसूंत वसंतसंपात होता असें मानिलें म्हणजे शरत्संपाताचे ९३+१८०=२७३ विषुवांश झाले. म्हणजे अभिजित् शरत्संपाताच्या ऊर्फ विषुवदिनाच्या मागें

* यज्ञो वै देवेभ्य उदक्रामत्ते देवा न किंचनाशक्नुवन्कर्तुं न प्राजानंस्ते ऽब्रुवन्नदितिं त्वयेमं यज्ञं प्रजानामेति सा तथेत्यब्रवीत्सा वै वो वरं वृणा इति। वृणीष्वेति सैतमेव वरमवृणीत मत्प्रायणा यज्ञाः संतु मदुदयना इति तथेति। (ऐ. ब्रा. १–८).

२७३–२६७=६ अंश आलें. आतां पुनर्वसूंत वसंतसंपात असला म्हणजे या विषुवदिनाची खूण धरण्यासाठीं शरत्संपाताला अभिजित् इतकें दुसरें कोणतेंही नक्षत्र जवळ नाहीं. अशा रीतीनें हें नक्षत्र विषुवागमनसूचक असल्यामुळें त्यांचें नांव पूर्वी नक्षत्रांच्या यादींत पडलें असावें; व जेव्हा अयनचलनामुळें हा त्याचा उपयोग नाहींसा झाला तेव्हां तें त्यांतून निघालें असावें असें दिसतें. तात्पर्य अभिजित्‌दिनाच्या स्थानावरून अदितीच्या वरील गोष्टीस बराच आधार मिळतो. द्वादशादित्य हे अदितीचे पुत्र आहेत, याचा अर्थ आदित्याच्या वार्षिक क्रमाला आरंभ अदितीपासून होतो असाच केला पाहिजे. तसेंच ती वसंतसंपातीं असल्यामुळें देवयान व पितृयान यांच्यामध्यें होती म्हणून तिला देवांची आई असें ऋग्वेदांत* म्हटलें आहे तेंही योग्यच आहे. तिच्यापासून आदित्य उत्पन्न झाले ( ऋ० १०–७२–८ ), याचा अर्थही सूर्याचा वार्षिक क्रम अदितीपासून सुरु होत असे असाच होय.

तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें नक्षत्रीय प्रजापतीचें स्वरूप वर्णन केलें आहे. त्यांत चित्रा हें त्याचें शीर असें [1]म्हटलें आहे. या विषयीं अनेकांचे अनेक तर्क आहेत, पण त्यांपैकीं कोणताच समाधानकारक नाहीं. बादरायणानेंही ब्रह्मयाचें असेंच स्वरूप कल्पिलें आहे, व त्यांत तो मेष हें त्याचें शिर असें म्हणतो. आतां मेष ही पहिली राशी असल्यामुळें तिला शिर म्हणणें योग्यच आहे. व याच अनुरोधानें तैत्तिरीय संहितेंतील; प्रजापतिस्वरूपाचा अर्थ केल्यास, चित्रापूर्णमासीं ज्या वेळीं वर्षारंभ होत असे त्यावेळीं चित्रा हें शिर होणें साहजिक आहे. तरी या गोष्टींविषयीं कांहीं खात्री देतां येत नाहीं.

---

* ऋग्वेद १०–७२–५.

१ यो वै नक्षत्रीयं प्रजापतिं वेद । उभयोरेनं लोकयोर्विदुः । हस्त एवास्य हस्तः । **चित्रा शिरः** । निष्ट्या हृदयम् । उरू विशाखे । प्रतिष्ठानूराधाः । एष वै नक्षत्रीय प्रजापतिः । २ मेष शिरोथ वदनं वृषभो विधातुः वक्षो भवेन्नृमिथुनं हृदयं कुलीरः । सिंहस्तथोदरमथो युवतिः कटिश्च बास्तिस्तुला भृदथ मेढ्नमष्टमः स्यात् ॥ धन्वीचास्योरुयुगं मकरो जानुद्वयं भवति । जंघाद्वितयं कुंभः पादौ मत्स्यद्वयं चेति ॥

या दोन गोष्टीं खेरीज करून वेदकालीन आद्य पंचांगासंबंधानें आणखी कांहीं माहिती लागेलशी दिसत नाहीं. तरी या गोष्टींवरून व चित्रापूर्णमासीं वर्षारंभ होत असे या तैत्तिरीय संहितेंतील स्पष्ट वचनावरून पूर्वी, पूनर्वसूंमध्यें वसंतसंपांत असतांना वर्षारंभ करणारें पंचांग होतें हें निःसंशय ठरतें.

येथवर आपण एकंदर तीन प्रकारच्या प्राचीन पंचांगांचा विचार केला. त्यांपैकीं अगदीं पहिल्याच्या काळाला आपण अदितीकाळ किंवा मृगशीर्ष पूर्वकाल म्हणूं. याची मर्यादा अदमासें इ. स. पूर्वी ६००० पासून ४००० पर्यंत. या काळीं पूर्ण ऋचा वगैरे झाल्या असाव्या असें नाहीं. अर्धवट गद्य, अर्धवट पद्य, अशा वाक्यांत देवांचीं नांवें, त्यांच्या विशेष संज्ञा व पराक्रम वगैरे ग्रथित केले असावे. या काळाविषयींचें कांहींच स्मारक ग्रीक व पारशी लोकांत राहिलें नाहीं, व याचें कारण एवढेंच असावें कीं, हे लोक जेव्हां आपलें मूलस्थान सोडून निघाले तेव्हां त्यांनीं त्या वेळीं चालू असलेलें पंचांग मात्र बरोबर नेलें. परंतु भारतीय आर्यांनीं आपल्या परंपरागत गोष्टी मोठ्या काळजीनें श्रद्धापूर्वक जतन करून ठेविल्या आहेत.

आतां दुसरा जो मृगशीर्ष काल, त्याच्या मर्यादा स्थूलमानानें इ. स पूर्वी ४००० पासून २५०० पर्यंत. हा काळ म्हणजे आर्द्रा नक्षत्रापासून कृत्तिकांशी वसंतसंपात येईपर्यंतचा काळ होय. हा काळ सर्वांत महत्वाचा आहे. ऋग्वेदाचीं बरींच सूक्तें या वेळीं झालीं होतीं, व कित्येक गोष्टीही रचल्या गेल्या होत्या. या काळाच्या उत्तर भागांत ग्रीक व भारतीय आर्य हे एकामेकांपासून विभक्त झाले; व म्हणूनच त्यांच्यांत व ऋग्वेदांतही कृत्तिकाकालाविषयीं कांहीं प्रमाणें मिळत नाहींत. हा काल विशेषेंकरून सूक्तरचनेचा होता.

तिसरा म्हणजे कृत्तिकाकाळ. याच्या मर्यादा इ. स. पूर्वी २५०० पासून १४०० पर्यंत, म्हणजे कृत्तिकांत वसंतसंपात होता तेव्हांपासून वेदांगज्योतिषकालापर्यंत. तैत्तिरीयसंहिता व कित्येक ब्राह्मणें यांचा हा काळ आहे. या वेळीं ऋग्वेदसंहिता पुरातन झाली होती, व तिचा अर्थही बरोबर समजत नाहींसा झाला होता. ऋक्सूक्तें व त्यांतील गोष्टी यांच्या खऱ्या अर्थासंबंधानें या काळच्या ब्रह्मवाद्यांत मनमुराद तर्क चालत. नमुचीच्या मरणासंबंधानें इन्द्र व नमुची यांच्यांत ठरलेली अट हें एक अशाच तर्कांचें उदाहरण होय. याच

कालांमध्यें संहितांनां व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें आणि अति प्राचीन सूक्तें व यज्ञवाक्यें याचा अर्थ ठरविण्याचा प्रयत्न झाला. याच कालांत भारतीय लोक व चिनी लोक यांचें दळणवळण सुरू होऊन चिनी लोकांनीं भारतीयांपासून त्यांची नक्षत्रपद्धति उचलली.

प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा चवथा काळ ह्मणजे इ. स. पूर्वीं १४०० पासून ५०० पर्यंत. यालाच बुद्धपूर्वकाळ ह्मणतात. सूत्रें व षड्दर्शनें याच काळांत निर्माण झालीं.

आतां हे जे काळ दिले आहेत ते अगदीं नक्की तसेच आहेत असें समजतां कामा नये. जसें जसें मागें जावें तसें तसें शें दोनशें वर्षें ह्मणजे कांहींच नाहीं असें होतें. तरी स्थूल मानानें ते बरोबरच आहेत. या सर्वांत जुना जो अदितिकाळ त्या वेळीं पंचांगाची आवश्यकता उत्पन्न झाली होती; यावरून हा काळ म्हणजे आर्यसुधारणेचा आरंभ नसून ती यापूर्वी किती तरी काळ सुरू झाली असली पाहिजे, हें उघड होतें. दुसरा जो मृगशीर्षकाळ तो इ. स. पूर्वी ४००० पासून २५०० पर्यन्त येतो. या वेळीं पारशी, ग्रीक आणि भारतीय आर्य, हे एकत्र रहात असत, व ह्मणून हे तीन लोक वेगळे होण्यापूर्वींहीं वेदाचा कांहीं भाग तयार झाला होता असें साहजिक अनुमान होतें. या अनुमानाला तुलनात्मक व्युत्पत्तिशास्त्रावरून चांगला आधारहि मिळतो. पुराणकथांतील सुमारें साठ नांवें ग्रीक व संस्कृत भाषांत सारखींच आहेत, असें मॅक्समुल्लरनें दाखविलें आहे. इतकीं नांवें जर दोघांना समान आहेत, तर त्या नांवाच्या देवांचीं कृत्यें वर्णन करणारीं सूक्तें त्या काळीं नसावीं असें संभवत नाहीं. हे तीन लोक विभक्त होण्यापूर्वीं कविताहि उत्पन्न होऊं लागली होती, हें श्लोकचरणवाचक संस्कृत पद, अवेस्तिक पध व ग्रीक पौस् या शब्दांवरून उघड होईल.

अयनचलनामुळें वर्षारंभ दोनदां बदलला गेला असें जर आहे, तर त्या वर्षारंभांच्या मधल्या स्थितीविषयीं, तसेंच ऋतुकालामध्यें झालेल्या बदलाविषयीं कोठें कांहीं उल्लेख आढळत नाहींत हें कसें? व वैदिक लोकांना अयनगति त्या वेळीं समजली नाहीं कशी? असे प्रश्न कोणी विचारील. पण त्यांचें समाधान करणें फारसें कठीण नाहीं. संपातगति समजण्यास गणितादि शास्त्रांचीहि थोडीशी प्रगति झाली पाहिजे व शेंकडों वर्षे वेध घेत असलें पाहिजे. या अडचणी

लक्षांत आणल्यास भारतीयांना अयनगति इतर सर्व राष्ट्रांच्या अगोदर व बरीच सूक्ष्मपणें समजली होती असें आढळेल. हिपार्कस या ग्रीक ज्योतिषानें ती दर वर्षास कमीतकमी ३६ विकला मानिली आहे. पण सध्यां खरोखर ती ५०$\frac{1}{4}$ विकला आहे. भारतीय ज्योतिष्यांच्या मतें ती ५४ विकला आहे. अर्थात् ती ग्रीक लोकांपासून घेतलेली नव्हे हें उघड आहे. ती त्यांनीं स्वतःच आपल्या पद्धतीनें काढली असली पाहिजे.

आतां मृगापासून कृत्तिकांपर्यंत व तेथपासून पुनः अश्विनीपर्यंत वसंतसंपात येईपर्यन्तच्या मधल्या स्थितीविषयीं कांहीं पत्ता लागतो का पाहूं. संवत्सरदेवता जो प्रजापति त्याची जागा मृगपुंजांत; पण तो आपल्या कन्येचाच म्हणजे रोहिणीचा अभिलाष करून मागें मागें येऊं लागला. हें त्याचें कृत्य अकृत झालें ह्मणून रुद्रानें त्याला मारून टाकिलें. यावरून वसंतसंपाताच्या वेळीं सूर्य मृगांत नसून हळू हळू रोहिणीकडे येऊं लागला हें उघड आहे. याच्या पुढील स्थिति म्हणजे वसंतसंपात कृत्तिकांत आला ती. या वेळीं ऋतु बरोबर एक महिना मागें आल्यामुळें त्या लोकांनीं वर्षारंभ फाल्गुनांतून माघांत आणला व नक्षत्रांचा क्रम मृगाच्या ऐवजीं कृत्तिकांपासून सुरू केला.

यानंतरची स्थिति वेदांगज्योतिषांत वर्णिली आहे. त्या वेळीं ऋतु आणखी एक पंधरवडा मागें हटले होते; व वसंतसंपात भरणीशीं होऊन उत्तरायण धनिष्ठांच्या आरंभीं आलें होतें. याच्या पुढची स्थिति ह्मणजे अश्विनींत वसंतसंपात आला तेव्हांची. या वेळीं ऋतु वेदांगज्योतिषापेक्षांहि एक पंधरवडा मागें आले होते. म्हणून अशा प्रकारचा योग्य तो फेरफार पंचांगासंबंधानें घडवून आणण्याचा प्रयत्न विश्वामित्रानें केला. महाभारतांत × आदिपर्वामध्यें विश्वामित्रानें प्रतिसृष्टि निर्माण करण्याचा व नक्षत्रमाला धनिष्ठांच्या ऐवजीं श्रवणापासून सुरु करण्याचा प्रयत्न केला असें वर्णन आहे. इतर पुराणांतहि ही गोष्ट दिली आहे व त्यांत विश्वामित्रानें एक नवीन आकाश उत्पन्न करण्याचा विचार केला असें वर्णिलें आहे. त्याचा अर्थ इतकाच कीं, विश्वामित्रानें नवीन परिस्थितीप्रमाणें पंचांगाची सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. पण तो सिद्धीस न जातां पूर्वीची ह्मणजे कृत्तिकांपासून नक्षत्रांस आरंभ

× चकारान्यं च वै लोकं क्रुद्धो नक्षत्रसंपदा । प्रतिश्रवणपूर्वाणि नक्षत्राणि चकार सः ॥ आदिपर्व, ७१–३४.

करण्याचीच पद्धत कायम राहिली. तथापि पुढें कांहीं दिवसांनीं आणखी फेरफार होऊन नक्षत्रांस अश्विनीपासून आरंभ करण्याची पद्धत सुरू झाली.

याप्रमाणें संपातचलनाविषयीं क्रमानें एकसारखे उल्लेख आपल्या वाङ्मयामध्यें सांपडत असल्यामुळें वेदांच्या प्राचीनत्वाविषयीं कांहीं तरी तर्क करीत बसणें आतां रास्त होणार नाहीं. फल्गुनीपूर्णमासीं ज्या काळांत वर्षारंभ होत असे त्या काळाची स्मृति भाद्रपदांतील पितृपक्षावरून आपल्याला होते, याविषयीं मागें विवेचन आलेंच आहे. पूर्वीं आपला श्रावणीचा विधि भाद्रपदांत होत असे असें मनुस्मृतीवरून* दिसतें. तेव्हां पावसाळाहि याच महिन्यापासून सुरु होत असे. कारण श्रावणीचा विधि वर्षाकालाच्या आरंभीं झाला पाहिजे असें आश्वलायन गृह्यसूत्रांवरून दिसतें (आ. गृ. सू. ३–५–२). पण पुढें तो श्रावणांत होऊं लागला. कारण संपातचलनामुळें पावसाळा एक महिना मागें हटला. तो तसाच आणखी हटत हटत आतां तर ज्येष्ठापर्यंत आला आहे. या गोष्टीवरू पहातां ऋतूंच्या कालांत झालेल्या फेरफारांच्याहि खुणा आपल्या वाङ्मयात कांहीं अंशीं सांपडतात, असें ह्मणावयास हरकत नाहीं. तरी पण या पुराव्याला वर्षारंभांत झालेल्या फेरबदलांच्या पुराव्या इतकें महत्त्व देतां येत नाहीं. कारण ऋतु हे स्थानपरत्वें भिन्न भिन्न काळींहि होत असतात. असो.

आतां इतकेंच पहावयाचें उरलें कीं, इतक्या प्रमाणावरून ठरविलेला वेदकाल प्राचीन व अर्वाचीन विद्वानांच्या मतांशीं अविरुद्ध आहे कीं नाहीं? जर्मन पंडित वेबर यानें भूगोलविषयक व ऐतिहासिक पुराव्यावरून असें अनुमान काढलें आहे कीं, भारतीय वाङ्मयाचा आरंभ पारशी व भारतीय लोक ज्या काळीं एकत्र होते त्या काळापर्यंत पोचवितां येईल. झेन्द् अवेस्ता

* (अ० ४; ९५) श्रावणीच्या विधीचे दोन भाग जे उपाकर्म व उत्सर्जन त्यांचे दोन काल विकल्पेंकरून मनुस्मृतींत दिले आहेत. ते असे—"श्रावण्यां प्रौष्ठपद्यां वाप्युपाकृत्य यथाविधि। युक्तश्छंदांस्यधीयीत मासान्विप्रोऽर्धपंचमान्॥ पुष्ये तु छंदसां कुर्याद्बहिरुत्सर्जनं द्विजः। माघशुक्लस्य वा प्राप्ते पूर्वाह्णे प्रथमेऽहनि॥" प्रौष्ठपदी ह्मणजे भाद्रपदी पौर्णिमा. हा कालाचा विकल्प शाखानुरोधानें आहे असें टीकाकार लिहितात.

या पारशी लोकांच्या धर्मग्रंथामध्यें असे कांहीं भाग आहेत कीं त्यांना वैदिक सूक्तांचीं रूपांतरें मानतां येईल. यावरून वेबरच्या वरील म्हणण्याला चांगली पुष्टी येते. डॉ० हौ याच्या मताप्रमाणें वेबरचें ह्मणणें खरें ठरावयास वेदग्रंथांचा काल इ. स. पूर्वी २४०० वर्षें मानला ह्मणजे पुरे आहे. परंतु पारशी लोक व ब्राह्मण लोक जेव्हां एकत्र रहात होते त्या काळीं वसंतसंपात मृगशीर्षांत होता असें दाखवितां येतें, ही गोष्ट हौला माहीत नव्हती. पण आतां ती माहीत झाल्यावर वेदकाल इ. स. पूर्वी ४००० वर्षांइतका मागें नेल्यास कोणतीहि सयुक्तिक अडचण येत नाहीं. आतां पारशीधर्मसंस्थापक जो **झोरोआस्तर** तो यूरोपांतील **ट्रोजन** युद्धाच्या ( इ. स. पूर्वी १८०० वर्षें ) पूर्वी सुमारें ६०० वर्षांच्या सुमारास होऊन गेला असें **लिडिया** देशच्या **झँथस** नांवाच्या ग्रंथकाराचें मत आहे. हा ग्रंथकार इ. स. पूर्वी ४७० वर्षांच्या सुमाराचा आहे. आपल्या हिशोबाप्रमाणें पहातां पारशी व हिंदी लोक हे मृगशीर्षकालाच्या द्वितीयार्धांत (इ. स. पूर्वी ३००० ते २५०० वर्षें) एकमेकांपासून दूर झाले. आतां ही गोष्ट डॉ. हौ आदि मंडळीच्या मताप्रमाणें याहून बऱ्याच अर्वाचीन कालीं घडली असें जर मानिलें तर इ. स. पूर्वी ५ व्या शतकांतील ग्रंथकारानें तिला अगदीं नुकतीच झालेली असें ह्मटलें असतें. परंतु वर लिहिल्याप्रमाणें झँथस हा तसें ह्मणत नाहीं. ह्मणजे यावरून पारशी व हिंदी लोक हे जेव्हां एकमेकांपासून विलग्न झाले तो काल इ. स. पूर्वी २५०० वर्षांच्या पलीकडचा असला पाहिजे. आतां ग्रीक तत्त्ववेत्ता आरिस्तातल ( इ. स. पूर्वी ३२० वर्षें ) हा तर याच्याहि पलीकडे जाऊन म्हणतो कीं झोरोआस्तर हा प्लेटोच्या पूर्वी ५००० किंवा ६००० वर्षें होऊन गेला. आतां हा आंकडा जरी अगदीं निश्चित असा मानिला नाहीं, तरी त्यावरून आरिस्तातलच्या वेळीं, झोरोआस्तर हा फार प्राचीन काळीं होऊन गेला अशी समजूत होती, एवढें उघड दिसतें. आतां झोरोआस्तर जर इतका प्राचीन असेल तर उघडच वेद त्याच्याहूनहि प्राचीन असले पाहिजेत. दुसरी एक विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, ग्रीस देशामध्यें होमर कवीनें इलियड हें काव्य इ. स. पूर्वी १००० वर्षांच्या सुमारास रचिलें. आतां इलियड व वैदिक ग्रंथ यांच्या भाषा तर इतक्या भिन्न आहेत कीं, या दोन्ही (ग्रीक व हिंदु) लोकांची फाटाफूट झाल्यावर दोघांच्या भाषांमध्यें इतकें

भिन्नत्व यावयास हजारों वर्षे लोटलीं असलीं पाहिजेत. ह्मणून ओरायन अथवा मृगशीर्ष यांच्या गोष्टी रचल्या गेल्यानंतर व वसंतसंपात कृत्तिकांत येण्यापूर्वी, ह्मणजे इ. स. पूर्वी ३५०० ते २००० वर्षांच्या सुमारास, ग्रीक व हिंदु यांची फाटाफूट झाली असें म्हणणें अगदीं रास्त होईल.

सरते शेवटीं, आपल्या अति कुशाग्र बुद्धीच्या व महाविद्वान् ब्रह्मविदांचें व पंडितांचें, वेद हे अगदीं अनादि अतएव ईश्वरदत्त आहेत असें जें मत आहे याचा थोडासा विचार करूं. श्रुतीसारखे प्रकट झालेले ग्रंथ ह्मणजे अनादिच असले पाहिजेत असा नियम नाहीं. एखाद्या विवक्षित वेळीं ग्रंथ प्रकट झाला असें मानणारे लोक आहेत व असें मानतां येतें असें बायबल व कुराण यांच्या इतिहासावरून आपल्याला दिसेल. बायबल [ नवा करार ] खिस्ताच्या वेळीं म्हणजे सुमारें १९०० वर्षांपूर्वी, व कुराण महंमद पैगंबराच्या वेळीं, ह्मणजे सुमारें १३०० वर्षांपूर्वी झालें हें सर्वांस माहीतच आहे. हे दोन्हीं ग्रंथ प्रकट झालेले आहेत असें तत्तद्धर्मीय लोक मानतात, व ते वर लिहिलेल्या काळीं प्रकट झाले असेंहि ते मानतात. ह्मणजे प्रकट झालेले ग्रंथ अनादिच असले पाहिजेत असें नाहीं. असें जर आहे तर श्रुतिग्रंथ प्रकट झालेले आहेत एवढ्यावरूनच ते अनादि आहेत असें ह्मणणें बरोबर होणार नाहीं. ह्मणून ब्रह्मवादि लोकांचें तसें मत होण्यास दुसरें कांहीं कारण असलें पाहिजे. या ब्रह्मवाद्यांपैकीं कित्येक जण इसवी सनापूर्वी कित्येक शतकें होऊन गेले आहेत आणि तेव्हांहि वेद अनादि आहेत अशा पूर्वपरंपरागत कल्पनेवरच त्यांनीं आपलें मत ठरविलें होतें, असें वरील विवेचनांत ठरविलेल्या वेदकालांवरून दिसतें. खिस्ती धर्मशास्त्राप्रमाणें पहातां जगाची उत्पत्ति इ. स. पूर्वी ४००० वर्षांच्या सुमारास झाली असें आहे; ह्मणजे खिस्ती ग्रंथकारांची प्राचीनत्वाच्या कल्पनेची मजल बहुतकरून याहून पलीकडे जाऊं शकली नाहीं; व ४००० वर्षांपूर्वीच्या काळचें कांहीं न समजल्यामुळें मुळीं जगाची उत्पत्तीच तेव्हां झाली असें त्यांनीं ठरविलें. आपल्या ब्रह्मवाद्यांनींहि जवळ जवळ असाच प्रकार केलासें दिसतें. वर दाखविलेंच आहे कीं वेदकालांतील विशेष चळवळीचा भाग ह्मणजे इ० स० पूर्वी ४०० वर्षांच्या सुमाराचा होता, व कदाचित् त्याच्याहि पूर्वींचा तो असेल असें म्हणावयासहि थोडा बहुत आधार आहे. आतां वेदांचें स्वरुप अक्षरशः तसेंच न रहातां कालानें त्यांत कांहीं फरक झाला

असेल, पण त्यांतील मतलब कांहीं बदलला नाहीं. ह्मणून इतक्या प्राचीन काळापासून ते आल्यामुळें जैमिनि, पाणिनि व प्राचीन ब्रह्मवादी यांनीं ते जगाच्या आरंभापासून ह्मणजे सर्व ज्ञात गोष्टींच्या आरंभापासून अस्तित्वांत आहेत, किंबहुना अनादि आहेत असें ठरविलें.

अशा रीतीनें आपल्या प्राचीन वाङ्मयांत आढळणाऱ्या गोष्टी व ज्योतिषविषयक उल्लेख यांच्या पूर्ण अनुरोधानें वेदकाल इ० स० पूर्वी ४००० वर्षांच्या सुमारास जर निश्चित केला, तर वेदकालासंबंधानें भारतीय व यूरोपीय आणि प्राचीन व अर्वाचीन पंडितांमध्यें प्रचलित असलेल्या गोष्टी व मतें यांचा अगदीं समाधानकारकरीतीनें उलगडा करितां येतो. याप्रमाणें सर्व गोष्टींचा यथास्थित उलगडा होत असल्यामुळें वर नमूद केलेल्या कालांच्या योगानें आर्य सुधारणेच्या अतिप्राचीन काळाची मर्यादा हल्लींच्या ज्ञानाच्या स्थितींत शक्य तितक्या बरोबररीतीनें ठरवितां येते कीं नाहीं, हें निश्चित करण्याचें काम विद्वानांकडे * सोपविलें पाहिजे.

हा काल ठरविण्यास ज्या साधनांचा उपयोग केला आहे तें साधन आकाशांतील कधींहि न चुकणारें व कधींहि बंद न पडणारें असें जें सृष्टीचें घड्याळ तें होय. याहून अधिक खात्रीलायक साधन मिळणें शक्य नाहीं, असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं. वरील विवेचनांत ज्या गोष्टी पुराव्यासाठीं म्हणून घेतल्या आहेत, त्या या जगांतून अजिबात नाहींशा होण्याचा अनिष्ट प्रसंग एक दोन वेळ आला होता. ग्रीक लोकांनीं ईजिप्शियन् लोकांपासून ज्योतिःशास्त्राची परिभाषा जेव्हां उचलली, त्या वेळीं या सर्वच गोष्टी नाहींशा व्हावयाच्या; पण सुदैवानें **ओरायन** वगैरे नांवें व तत्संबंधाच्या गोष्टी, एवढ्या त्या तडाख्यांतून बचाऊन निघाल्या. यानंतर त्यांच्यावर दुसराहि तसाच प्रसंग आला होता. नेल्सन व नेपोलियन यांनीं मोठमोठे पराक्रम केल्यामुळें यांच्या सन्मानार्थ व त्यांचें नांव चिरस्थायी व्हावें म्हणून इंग्लंड व जर्मनीमध्यें असा बूट निघाला होता कीं, मृगशीर्षपुंजाला त्याचें पूर्वीचें ओरायन हें नांव बदलून नेल्सन किंवा नेपोलियन असें नांव द्यावें. परंतु ओरायनच्या सुदैवानें हाहि प्रसंग टळला; व आजमितीस साहसप्रिय व देदीप्यमान असा तो **ओरायन** आपला परिचारक जो **कॅनिस [श्वान]** त्यासह, नेल्सन अथवा

* मूळ पुस्तक रा. टिळक यांनीं स० १८९३ च्या सुमारास लिहिलें. आज मितीला त्यांतील बहुतेक मतें सर्वमान्य झालीं आहेत.

नेपोलियन यांच्या कालापेक्षां किती तरी पटीनें अधिक महत्वाच्या व पवित्र अशा, आर्य लोकांच्या इतिहासांतील एका पूर्वकालाचें स्मरण देत आहे.

॥ समाप्तः ॥

## परिशिष्ट.

### तैत्तिरीय संहितेंतील तीन निरनिराळ्या वर्षारंभाचे उल्लेख करणारा अनुवाक.

संवत्सरायं दीक्षिष्यमाणा एकाष्टकायां दीक्षेरन्नेषा वै संवत्सरस्य पत्नी यदेकाष्टकैतस्यां वा एष एताꣳ रात्रिं वसति साक्षादेव संवत्सरमारभ्य दीक्षन्त आर्तं वा एते संवत्सरस्याभिदीक्षन्ते य एकाष्टकायां दीक्षन्तेन्तनामानावृतू भवतो व्यस्तं वा एते संवत्सरस्याभिदीक्षन्ते य एकाष्टकायां दीक्षन्तेंतनामानावृतू भवतः फाल्गुनीपूर्णमासे दीक्षेरन्मुखं वा एतत् संवत्सरस्य यत्फल्गुनीपूर्णमासो मुखत एव संवत्सरमारभ्य दीक्षन्ते तस्यैकैव निर्या यत्साम्मेध्ये विषूवान्त्संपद्यते चित्रापूर्णमासे दीक्षेरन्मुखं वा एतत्संवत्सरस्य यच्चित्रापूर्णमासो मुखत एव संवत्सरमारभ्य दीक्षन्ते तस्य न काचन निर्या भवति चतुरहे पुरस्तात्पौर्णमास्यै दीक्षेरन्तेषामेकाष्टकायां क्रयः संपद्यते तेनैकाष्टकां न छबट्कुर्वन्ति तेषां पूर्वपक्षे सुत्या संपद्यते पूर्वपक्षं मासा अभिसंपद्यन्ते ते पूर्वपक्ष उत्तिष्ठन्ति तानुत्तिष्ठतओषधयो वनस्पतयोनूत्तिष्ठन्ति तान्कल्याणी कीर्तिरनूत्तिष्ठत्यरात्सुरिमे यजमाना इति तदनुसर्वे राध्नुवन्ति ।

तै० स० ७–४–८.

याच अर्थाचा सामवेदाच्या तांड्य ब्राह्मणांतील अनुवाक.

एकाष्टकायां दीक्षेरन् ॥ १ ॥

एषा वै संवत्सरस्य पत्नी यदेकाष्टकैतस्यां वा एतां रात्रिं वसति साक्षादेव तत्संवत्सरमारभ्य दीक्षन्ते ॥ २ ॥

तस्य सा निर्या यदपोऽनभिनन्दन्तोऽभ्यववयन्ति ॥ ३ ॥

विच्छिन्नं वा एते संवत्सरस्याभिदीक्षन्ते य एकाष्टकायां दीक्षन्तेऽन्तनामानावृतू भवतः ॥ ४ ॥

आर्तं वा एते संवत्सरस्याभिदीक्षन्ते येऽन्तनामानावृतू अभिदीक्षन्ते ५

तस्मादेकाष्टकायां न दीक्ष्यम् ॥ ६ ॥

फाल्गुने दीक्षेरन् ॥ ७ ॥

मुखं वा एतत्संवत्सरस्य यत्फाल्गुनी मुखत एव तत्संवत्सरमारभ्य दीक्षन्ते ॥ ८ ॥

तस्य सा निर्या यत्सम्मेधे विषुवान्संपद्यते ॥ ९ ॥

चित्रापूर्णमासे दीक्षेरन् ॥ १० ॥

चक्षुर्वा एतत् संवत्सरस्य यच्चित्रापूर्णमासो मुखतो वै चक्षुर्मुखत एव तत्संवत्सरमारभ्य दीक्षन्ते तस्य न निर्याऽस्ति॥११

चतुरहे पुरस्तात् पौर्णमास्या दीक्षेरन् ॥ १२ ॥

तेषामेकाष्टकायां क्रयः संपद्यते तेनैकाष्टकां न संब्रट् कुर्वन्ति॥१३॥

तेषां पूवपक्षे सुत्या संपद्यते पूर्वपक्षे मासाः संतिष्ठमाना यन्ति पूर्वपक्ष उत्तिष्ठन्ति तानुत्तिष्ठतः पशवः ओषधयोऽनूत्तिष्ठन्ति तान्कल्याणी वागभिवदत्यरात्सुरिमे सत्रिण इति ते राध्नुवन्ति ॥१४॥

तां० ब्रा० ५-९.

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांतील वृषाकपीचें सूक्त.

**वि हि सोतोरसृक्षत नेंद्रं देवममंसत ।**

**यत्रा मंदद्वृषाकपिरर्यः पुष्टेषु मत्सखा विश्वस्मादिंद्र उत्तरः ॥ १ ॥**

( ह्या सूक्तांत इन्द्र, इन्द्राणी व वृषाकपि यांचा संवाद वर्णिला आहे. परंतु यांतील निरनिराळ्या ऋचा कोणाकोणाच्या तोंडीं घालावयाच्या या संबंधानें टीकाकारामध्यें मतभेद आहे. सायणाचार्य पहिली ऋचा इन्द्राच्या तोंडीं घालितात, परंतु माधवभट्ट हे ती इन्द्राणीची आहे असें म्हणतात असें सायणाचार्यांनींच सांगितलें आहे. ) इन्द्राणी इन्द्रास ह्मणते.

अर्थः--स्वामी वृषाकपि ज्या ठिकाणीं ( सोमाची ) समृद्धि असलेल्या यज्ञांत हृष्ट होतो, ( त्या ठिकाणीं यजमान ) सोमाभिषवापासून परावृत्त होऊन इन्द्र देवाला मानीत नाहींसे होतात. ( तथापि ) माझा सखा इन्द्र विश्वाच्या उत्तरभागींच आहे ॥ १ ॥

**परा हीन्द्र धावसि वृषाकपेरति व्यथिः ।**

**नो अह प्रविन्दस्यन्यत्र सोमपीतये विश्वं० ॥ २ ॥**

( माधवभट्टांनीं, इंद्रायणीसाठीं तयार केलेलें हविर्द्रव्य वृषाकपि [इन्द्रपुत्र] रूपी कोणी मृगानें दूषित केलें म्हणून ती इन्द्रास ह्मणते असा या सूक्ताचा संदर्भ घेतला आहे. प्रथम ऋचेंत सांगितल्याप्रमाणें इन्द्राणीनें इन्द्राला सांगितल्यावरहि इन्द्र वृषाकपीमागून जाऊं लागला, तेव्हां इन्द्राणी पुनः त्यास म्हणते)

अर्थः--हे इन्द्रा, वृषाकपीच्या मागून तूं त्वरेनें धांवतोस व सोमपानासाठीं इतर कोठें जात नाहींस ( हें कसें ? ) इन्द्र विश्वाच्या इ० [ यांत परा ह्मणजे वृषाकपि जिकडे गेला तो प्रदेश होय. ] ॥ २ ॥

**किमयं त्वां वृषाकपिश्चकार हरितो मृगः ।**

**यस्मा इरस्यसीदु न्वर्यो वा पुष्टिमद्वसु विश्वं० ॥ ३ ॥**

( अनुक्रमणीकेला अनुसरून सायणाचार्य ही ऋचा इन्द्रायणीचीच समजात. त्यांचा अर्थः--" [ हे इन्द्रा, ] या [ वृषाकपिरूपी ] हरितवर्ण मृगानें तुझें असें काय [ प्रिय ] केलें आहे कीं त्याला तूं एखाद्या उदार मनुष्याप्रमाणें

पोषयुक्त धन द्यावें ? इंद्र० " परंतु कांहीं जर्मन पंडित ही ऋचा इन्द्राच्या तोंडीं घालितात. )

अर्थः—( हे इन्द्राणि, ) या हरिद्वर्ण मृगानें तुझें असें काय (नुकसान) केलें कीं तूं त्यावर इतकें रागवावें ? तें कांहीं पोषयुक्त धन होतें कीं काय ? इन्द्र विश्वाच्या उत्तरभागांतच आहे ॥ ३ ॥

**यमिमं त्वं वृषाकपिं प्रियमिन्द्राभि रक्षसि ।**
**श्वान्वस्य जंभिषदपि कर्णे वराहयुर्विश्वं० ॥ ४ ॥**
**प्रिया तष्टानि मे कपिर्व्यक्ता व्यदूदुषत् ।**
**शिरो न्वस्य राविषं न सुगं दुष्कृते भुवं विश्वं० ॥५॥**

(दुसऱ्या ऋचेंत, इन्द्राच्या वृषाकपीविषयींच्या आवडीबद्दल इन्द्राणी त्याजवर रागावली. परंतु एवढ्यानें तिची तृप्ति न होऊन ती त्यास आणखी ह्मणते )

अर्थः—हे इन्द्रा, ज्या अर्थी तूं आपल्या प्रिय अशा वृषाकपीचें रक्षण करतो आहेस त्या अर्थी वराहाची इच्छा करणारा कुत्रा त्याच्या कर्णाचा चावा घेवो. ( कारण, ) या कपीनें माझे आवडते आज्ययुक्त पदार्थ नासून टाकिले. ( म्हणून ) खरोखर मीं त्याचें डोकें नुकतेंच कापून टाकलें आहे; कारण दुष्कृति करणाराला सुख होऊं नये. इंद्र विश्वाच्या इ० ॥ ४ ॥

[ आकृतींत दाखविल्याप्रमाणें मृगशीर्षाचा आकार कल्पिल्यास मृगाच्या कानाचा चावा घेणारा कुत्रा म्हणजे कॅनिस मेजर (श्वान) ऊर्फ व्याधच होय.]

**न मत्स्त्री सुभसत्तरा न सुयाशुतरा भुवत् ।**
**न मत्प्रतिच्यवीयसी न सक्थ्युद्यमीयसी विश्वं० ॥ ६ ॥**

( यांत इन्द्राणी आपली धन्यता मानून घेते आहे. ती म्हणते )

अर्थः—माझ्याहून दुसरी कोणतीहि स्त्री भाग्यवती नाहीं किंवा सुखी नाहीं. तसेंच माझ्याहून दुसरी कोणीहि पतीला सर्व प्रकारें आनंद देणारी नाहीं. इन्द्र विश्वाच्या इ. ॥ ६ ॥

**उवे अंब सुलाभिके यथेवांग भविष्यति ।**
**भस्मन्मे अंब सक्थि मे शिरो मे वीव हृष्यति विश्वं० ॥ ७ ॥**

**किं सुबाहो स्वंगुरे पृथुष्टो पृथुजाघने ।**
**किं शूरपत्नि नस्त्वमभ्यमीषि वृषाकपिं विश्व० ॥ ८ ॥**

( अनुक्रमणीला अनुसरून सायणाचार्य या ऋचा अनुक्रमें वृषाकपि व इन्द्र यांजकडे लावितात; परंतु त्याप्रमाणें पहिलीचा अर्थ नीट जमत नाहीं. करितां दोन्हीही इन्द्राच्याच आहेत असें समजल्यास बरें. सायणाचार्यांचा अर्थः—हे भाग्यशालि माते तूं म्हणतेस तसेंच होवो. माझ्या पित्याला [ इन्द्राला ] तुझें सर्व शरीर आनंद देवो इ. यांत मे याचा अर्थ मला असा साधा न घेतां मे पितरं असा घ्यावा लागतो. म्हणून इन्द्राच्या तोंडीं हे शब्द चांगले शोभतात.)

अर्थः—हे भाग्यशालि स्त्रिये, तूं म्हणतेस तसेंच सत्य आहे. तुझे सर्व अवयव ( भस्मन्, सक्थि, व शिर ) मला सुखदायीच आहेत. ( पण ) हे शोभन स्त्रिये ( सुंदर बाहु, सुंदर अंगुली, सुंदर केश, व सुंदर जघन असलेली) हे शूरपत्नि, तूं आपल्या वृषाकपीवर एवढी कां रागावलीस ? इन्द्र विश्वाच्या उत्तर भागांतच आहे. ॥ ७, ८ ॥

**अवीरामिव मामयं शरारुरभि मन्यते ।**
**उताहमस्मि वीरिणींद्रपत्नी मरुत्सखा विश्व० ॥ ९ ॥**

( इन्द्राणी त्यावर उत्तर देते. )

अर्थः—हा घातुक (मृग—वृषाकपि) मला (जणूं) अवीरा समजतो. पण मी वीरमाता, इन्द्राची पत्नी व मरुतांची मैत्रीण आहें. इन्द्र विश्वाच्या इ. ॥ ९॥

**संहोत्रं स्म पुरा नारी समनं वाव गच्छति ।**
**वेधा ऋतस्य वीरिणींद्रपत्नी महीयते विश्व० ॥ १० ॥**
**इन्द्राणीमासु नारिषु सुभगामहमश्रवम् ।**
**न ह्यस्या अपरं चन जरसा मरते पतिर्विश्व० ॥ ११ ॥**

( जर्मन पंडित १० वी ऋचा वृषाकपीची, व ११ वी वृषाकपायीची समजतात. आचार्य दोन्ही इन्द्राच्याच समजतात. कसेंही घेतलें तरी अर्थामध्यें फारसा फेर होत नाहीं. )

अर्थः—सत्याची विधात्री, वीरप्रसवा व इन्द्रपत्नी अशी ही जी स्त्री ती यज्ञाला व संग्रामाला जाते व सर्वत्र तिची स्तुति होते. इन्द्र विश्वाच्या इ० । सर्व स्त्रियांमध्यें इन्द्रायणी भाग्यवती आहे असें ऐकतों. कारण तिचा पति जो इन्द्र तो वयोहानि होऊन कधींही मरत नाहीं ॥ १०, ११ ॥

**नाहमिन्द्राणि रारण सख्युर्वृषाकपेर्ऋते ।**

**यस्येदमप्यं हविः प्रियं देवेषु गच्छति विश्व० ॥ १२॥**

( ही ऋचा इन्द्राची आहे. )

अर्थः--हे इन्द्राणि (माझा) सखा जो वृषाकपि त्याच्याशिवाय मला चैन पडत नाहीं. त्याचें हें आवडतें जलपूत हवि देवांकडे जातें. इन्द्र विश्वाच्या इ०॥१२

**वृषाकपायि रेवति सुपुत्र आदु सुस्नुषे ।**

**घसत्त इन्द्र उक्षणः प्रियं काचित्करं हविर्विश्व० ॥ १३ ॥**

( या ऋचेंत वृषाकपायि या शब्दानें घोटाळा उडविलेला आहे. वृषाकपायि म्हणजे वृषाकपीची आई असें कित्येक समजतात; व कित्येक वृषाकपीची पत्नी असें समजतात. ही ऋचा इन्द्राणीला उद्देशून असल्यामुळें दुसरा अर्थ घेतल्यास वृषाकपि म्हणजे इन्द्र असें समजलें पाहिजे. मागील ऋचेंत सांगितलेलें वृषाकपीचें आवडतें हवि खाण्यासाठीं इन्द्र इन्द्राणीजवळ परवानगी मागतो.)

अर्थः--हे धनवति सुपुत्रे व चांगली सून असलेले इन्द्राणि, या तुझ्या इन्द्राला वृषभरूपी सुखकर व आवडतें हवि भक्षण करूं दे; ( कारण ) इन्द्र विश्वाच्या इ० ॥ १३ ॥

**उक्ष्णोहि मे पञ्चदश साकं पचन्ति विंशतिम् ।**

**उताहमद्मि पीव इदुभा कुक्षी पृणन्ति मे विश्व० ॥ १४ ॥**

अर्थः--माझ्यासाठीं एकदम पंधरा व वीस बैल[यजमान]शिजवितात. मी ही ते खाऊन लठ्ठ होईन;आणि माझ्या दोन्ही कुशी(त्यांनीं)भरून जातील इंद्र इ०

[ खरोखरीचे बैल शिजविण्याची चाल ऋग्वेदकाळींहि नव्हती. ऋ. १, १६४, ४३ यांत उक्षाणं पृश्निमपचंत वीरास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्—"वीर्यशाली यजमान लठ्ठ बैल शिजवीत असत पण ते धर्म जुने होते" असें

म्हटलें आहे. २८ नक्षत्रें व सात ग्रह मिळून झालेले ३५ बैल या ठिकाणीं उद्दिष्ट असावे असें वाटतें ].

वृषभो न तिग्मशृंगोन्तर्यूथेषु रोरुवत् ।
मंथस्त इन्द्र शं हृदे यं ते सुनोति भावयुर्विश्व ॥१५॥

न सेशे यस्य रंबतेंतरा सक्थ्या ३ कपृत् ।
सेदीशे यस्य रोमशं निषेदुषो विजृंभते विश्वं० ॥ १६ ॥
न सेशे यस्य रोमशं निषेदुषो विजृंभते ।
सदीशे यस्य रंबतेंतरा सक्थ्या ३ कपृद्विश्वं० ॥ १७ ॥

अर्थः—( इन्द्राणीः— ) तीक्ष्ण शृंगांचा बैल जसा गाईच्या कळपामध्यें गर्जना करितो व क्रीडा करितो ( तसा हे इन्द्रा ! तूं मजजवळ क्रीडा कर ). मंथनदंडाचा ध्वनि, व प्रेमाची इच्छा करणारी ( इन्द्राणी ) तुझ्यासाठीं जो ( सोमरस ) काढिते तो, तुझ्या हृदयाला सुखकारक होवो ॥ १५ ॥

( १६ आणि १७ या दोन ऋचांत इंद्र व इन्द्राणी यांच्या मधला मैथुनसंबंधीं संवाद वर्णिला आहे ).

अयमिन्द्र वृषाकपिः परस्वंतं हतं विदत् ।
असिं सूनां नवं चरुमादेधस्यान आचितं विश्वं० ॥ १८ ॥
अयेमामि विचाकशद्विचिन्वन्दासमार्यं ।
पिबामि पाकसुत्वनोमि धीरमचाकशं विश्वं० ॥ १९ ॥

अर्थः—(याप्रमाणें खुष झाल्यावर इन्द्राणी म्हणते) हे इन्द्रा ! दुसरा जो मारिलेला प्राणी ( वृषाकपि नव्हे ) तो या वृषाकपीलाच घेऊं दे, आणि ( तो प्राणी कापून शिजावेण्यासाठीं ) एक शस्त्र, चूल, एक नवे भांडें आणि इन्धनानें भरलेला एक गाडा हींहि त्याला घेऊं दे.

( याप्रमाणें इन्द्र मध्यें पडल्यामुळें वृषाकपि बचावला. इन्द्राणी ज्याचें डोकें कापावयास तयार झाली तो मृग वृषाकपि नव्हे दुसराच कोणी द्वाड होता,

असें इन्द्राणीनें सांगितल्यावर, आर्य जो वृषाकपि त्याच्या संरक्षणाबद्दल आनंदित होऊन इन्द्र म्हणतो. )

अर्थः--याप्रमाणें मीं दास व आर्य यांतील भेद पहात जात असतों. आणि सोमरस काढणाऱ्यांपासून मीं तो पितों व धीमान् अशा [ यजमाना ] कडे लक्ष ठेवितों. ॥ १८, १९ ॥

**धन्वं च यत्कृंतत्रंच कतिस्वित्ता वि योजना ।**

**नेदीयसो वृषाकपेस्तमेहि गृहाँ उप विश्व ० ॥ २० ॥**

( या ऋचेंत इन्द्र वृषाकपीला आपल्या स्वतःच्या घरीं जाऊन मग आमच्या घरीं ये, असें सांगतों आहे. आतां प्रश्न असा की, वृषाकपि व इन्द्र यांचीं हीं घरें आहेत कोठें ? **धन्व, कृतत्रं,** आणि **नेदीयस्** यांचे सायणाचार्यांनीं निरुदक व अरण्यरहित देश, कर्तनीय अरण्य [ ज्यांतील वृक्ष तोडावयाचे आहेत असें ] व अतिशयेन समीपस्थ [ शत्रुगृह ] असे अर्थ दिले आहेत. पण हे संदर्भाला जुळत नाहींत. वृषाकपि हें सूर्याचें कोणतें तरी स्वरूप आहे. त्याला अरण्यांत जाऊन काय करावयाचें ? व हें अरण्य तरी कोणतें ? ऋ. १-३५-८ यांत **धन्व** याचा अर्थ **आकाश** असा सायणाचार्यांनींच दिला आहे. तोच अर्थ येथें घेण्यासही कांहीं हरकत नाहीं. त्याला पुढें **कृंतत्रं** म्हणजे तोडलेलें असें म्हटलें आहे. यावरून हा आकाशाचा भाग म्हणजे दक्षिण गोलार्ध ऊर्फ पितृयान होय. " यत्रावरोधनं दिवः " [ऋ. ९, ११३-८ ] यांत आलेलें अवरुद्ध आकाश व हें धन्व, कृंतत्रं हीं एकच होत. दक्षिण गोलार्धाची पूर्ण माहिती नसल्यामुळें त धन्व कतिस्वित् [ कांहीं ] योजनें आहे असें मोघम म्हटलें आहे. असो. तर यावरून इन्द्रानें वृषाकपीला आपल्या घरीं म्हणज दक्षिण गोलार्धांत जावयास सांगितलें असें झालें.

आतां, दुसऱ्या चरणाचा सरळ अर्थ " नेदीयसाहून आमच्या घरीं ये " असा आहे. यांत नेदीयस् शब्दासंबंधानेंहि घोटाळा झालेला आहे. ' अन्तिकबाढयोर्नेदसाधौ ' या पाणिनीच्या सूत्रांत [ ५-३-६३ ] अन्तिक शब्दाला ईयस् इष्ठ प्रत्ययांपूर्वी **नेद** असा आदेश होत असतो, असें सांगितलें आहे. परंतु अन्तिकपासून नेद शब्द कोणत्याहि रीतीनें मिळूं शकत नाहीं. म्हणून, नेदीयस् ह्या शब्दाचें मूळ रूप जें **नेद** तें पाणिनीच्या वेळीं नाहींसें झालें होतें, परंतु व्याकरणकार नात्यानें पाणिनीला सर्व शब्दांची व्यवस्था लावणें

भाग असल्यामुळें तो नेदीयस् याचा अन्तिक शब्दाशीं संबंध लावून देवून मोकळा झाला, असें म्हणावें लागतें. पण असें म्हटल्यानें नेदीयस् याचा पाणिनीच्या वेळीं जवळचा याखेरीज दुसरा कांहीं एक अर्थ नव्हता असें मानण्याचें कारण नाहीं. पाणिनीनें त्याच्या वेळीं विशेष प्रचलित असलेला त्याचा अर्थ घेतला असेल व त्याचें मूळरूप कांहीं नाहीं असें पाहून त्यानें तसाच अर्थ असलेल्या अन्तिक शब्दाला त्याचें मूळरूप मानिलें असेल. कारण त्याचा उद्देश अर्थ सिद्ध करण्याचा नसून रूप सिद्ध करण्याचा आहे. इंग्रजींत (nether) नेदर असा शब्द आहे, व त्याचा खालचें असा अर्थ आहे. हा शब्द नेड् या शब्दाला अर हा तारतम्यदर्शक प्रत्यय लावून झालेला आहे व लो–अर (low-er) या शब्दाशीं समानार्थक आहे. याच मूळ शब्दावरून beneath[ बिनेथ–खालीं] under-neath ( अंडर–नीथ ) वगैरे शब्द झाले आहेत. हा नेदर शब्द व संस्कृत नेदीयस् हे दोन्ही नेड् या एकाच मूळरूपापासून झाले आहेत; व म्हणून नेदीयस् याचा अर्थ खालचा असाच केला पाहिजे, असा अर्थ करावयास दुसराहि आधार आहे. ऋग्वेदांत इतर ठिकाणीं आलेल्या नेदीयस् व नेदिष्ठ शब्दांवरून त्यांचा असा अर्थ जरी निश्चित करतां येत नाहीं, तरी ब्राह्मणांतील. कांहीं स्थळांवरून तो तसा निश्चित करतां येतो. ऐतरेय ब्राह्मणांत ( ६–२७ ) "उपरिष्टान्नेदीयसि" यांत उपरिष्टात् व नेदीयस् यांत विरोध दाखविला आहे. तसेंच काठक संहितेंत "नेदिष्ठादेव स्वर्गलोकमारोहति।" म्हणजे 'नेदिष्ठ लोकाहून स्वर्गलोकांत आरोहण करितो' असें वाक्य आहे. या आरोहण शब्दावरून नेदिष्ठ म्हणजे खालचा लोक असा अर्थ उघड दिसतो. तांड्य ब्राह्मणांतही "यथा महावृक्षस्याग्रं सृप्त्वा नेदीयः संक्रमात् संक्रामत्येवमेतन्नेदीयः संक्रमया नेदीयः संक्रमात्संक्रामति।" म्हणजे "ज्याप्रमाणें वृक्षाच्या अग्रभागीं हळूहळू गेल्यावर ( मनुष्य ) हळूहळू खालीं येतो, त्याप्रमाणें स्वर हळूहळू उंच करून मग क्रमानें खालीं आणितो" असें वाक्य आलें आहे. या सर्व ठिकाणीं नेदीयस् याचा 'जवळचा' असा अर्थ सायणाचार्यांनीं पाणिनीला अनुसरून केला आहे. पण वर सांगितल्याप्रमाणें पाणिनीचा उद्देश अर्थ सांगण्याचा नसून रूप सिद्ध करण्याचा आहे. नेदीयस् या ईयस्प्रत्ययान्त शब्दाचें मूळरूप कांहीं आढळलें नाहीं, एवढ्यावरून त्यानें अन्तिक ह्या त्याच्या एका अर्थानें समान असलेल्या शब्दाला त्याचें मूळरूप असें मानिलें. यावरून नेदीयस् याचा

अन्तिक म्हणजे जवळचा एवढाच अर्थ पाणिनीचे वेळीं होता असें कांहीं म्हणतां येत नाहीं. म्हणून त्याचा " खालचा " असा व्युत्पत्तीवरून निघणारा अर्थ घेणेंच योग्य आहे. शिवाय या सूक्ताच्या आंकडकडव्यांत उत्तर हा जो शब्द आला आहे त्याचा, व नेदीयस् याचा विरोध अशारीतीनें चांगला जमेल. ' इन्द्राचें घर उत्तरेकडे आहे व वृषाकपि नेदीयस् म्हणजे खालीं चालला आहे; आणि इन्द्र त्याला आपल्या घरीं पुनः बोलावितो आहे; ' हा या सूक्ताचा मथितार्थ होय. शरत्संपाताजवळून सूर्य खालीं पडण्याचा संभव असतो अशी कल्पना फार पुरातन आहे. ऐतरेय ब्राह्मण ( ४-१८ ) आणि तैत्तिरीय ब्राह्मण ( १-५-१२-१ ) यांत संवत्सरसत्रांतील विषुव दिवशीं करावयाचे विधि सांगितले आहेत. त्यांत " तस्य वै देवा आदित्यस्य स्वर्गाल्लोकादवपातादबिभयुस्तं त्रिभिः स्वर्गैर्लोकैरधस्तात्प्रत्युत्तभ्रुवन् । ...... तेषु ( स्तोमेषु ) हि वा एष एतदध्याहितस्तपति । स वा एष उत्तरोऽस्मात्सर्वस्माद्भूतात्० । " असें म्हटलें आहे. " सूर्य स्वर्गांतून खालीं पडेल म्हणून देव भ्याले व त्यांनीं त्याला खालून स्तोमांनीं आधार दिला .... याप्रमाणें आधार मिळाल्यामुळें तो सर्वांहून उत्तर ( वरचा ) झाला. " हे स्तोम शरत्संपातदिवशीं म्हणजे विषुवादिवशीं दिले आहेत. या सर्व गोष्टींवरून प्रस्तुत ऋचेंतही सूर्याच्या दक्षिण गोलार्धांत उतरण्याचेंच वर्णन आहे व इन्द्र वृषाकपीला म्हणजे सूर्याला पुनः आपलेकडे म्हणजे उत्तरेकडे बोलावितो आहे असें दिसतें. )

अर्थः––वृषाकपे, तूं आकाशाच्या कृंतत्र ( तोडलेल्या ) भागातील कांहीं योजनें असलेल्या घरीं जा; आणि त्या खालच्या घराहून आमच्या घरीं ये. इन्द्र विश्वाच्या उत्तर भागांत आहे ॥ २० ॥

**पुनरेहि वृषाकपे सुविता कल्पयावहै ।**
**य एषः स्वप्नंनशनोस्तमेषि पथा पुनर्विश्व० ॥ २१ ॥**

( वृषाकपि खालच्या लोकांत जाऊन पुनः परत आल्यावर इन्द्र काय करील हें या ऋचेंत सांगितलें आहे. )

अर्थः––हे वृषाकपे, निद्रेचा नाश करणारा असा जो तूं आता घरीं जात आहेस तो, ( त्याच ) मार्गानें पुनः ये. आम्हीं ( मग तुझ्यासाठीं ) सवनकर्में करूं. इंद्र इत्यादि. ॥ २१ ॥

( शरत्संपातापासून दक्षिणायन सुरू झाल्यामुळें यज्ञकर्मे बंद पडलीं, पण पुनः सूर्य जेव्हां उत्तरगोलार्धांत येईल म्हणजे वसंतसंपात होईल तेव्हां यज्ञ सुरू होतील असा या ऋचेचा तात्पर्यार्थ आहे. )

**यदुदंचो वृषाकपे गृहमिन्द्राजगंतन ।**
**क्व१स्य पुल्वघो मृगः कमगञ्जनयोपनो विश्वं० ॥ २२ ॥**

( ही ऋचा फार महत्वाची आहे. वृषाकपि परत आल्यावर काय स्थिति होईल ती यांत वर्णिली आहे. इन्द्राणी हें म्हणते आहे असें समजावयास हरकत नाहीं असें सायणाचार्यांनीं म्हटलें आहे. )

अर्थः--(इन्द्राणीः--) हे इन्द्र व वृषाकपे, तुम्हीं उत्तरेकडे घरीं आल्यावर तो अतिपापी व लोकांना ठकविणारा मृग कोठें जाईल ? इन्द्र वि० ॥२२॥

( यांत मृग याचा [ मृगः मार्ष्टेः गतिकर्मणः ] मृज्—जाणें यापासून मृग म्हणजे गमनशील अथवा सूर्य असा अर्थ यास्कानें केला आहे; परंतु असा अर्थ घेतल्यानें ऋचेचा एकंदर अर्थ मुळींच जुळत नाहीं. कारण वृषाकपि उत्तरेकडे गेल्यावर तो मृग दिसेनासा होतो असें या ऋचेंत स्पष्टच होतें; पण मृग म्हणजे सूर्य समजल्यास तो उत्तरगोलार्धांत आल्यावर अदृश्य कसा होणार. शिवाय या सूक्तामध्यें वृषाकपि व मृग हे निरनिराळे आहेत हेंहि उघड झालें आहे. म्हणून मृग म्हणजे मृगशीर्ष नक्षत्र असा अर्थ घेतला पाहिजे व असा अर्थ घेतल्यानें सर्व गोष्टी यथास्थित जुळतात. शरत्संपातीं सूर्यास्ताबरोबर तो मृग उगवत असल्याकारणानें दिसत होता; पण वसंतसंपातीं सूर्य आल्यावर दोघेहि बरोबर उगवूं लागल्यामुळें मृग सूर्याच्या तेजामुळें दिसत नाहींसा झाला. तात्पर्य, मृगशीर्षांत वसंतसंपात होता असें मानिल्याशिवाय या ऋचेचा समाधानकारक अर्थ लागत नाहीं. शिवाय असा अर्थ घेतल्यानें "श्व.न ऋभूंना संवत्सराच्या शेवटीं जागे करीत असे" या ऋग्वचनालाहि आधार मिळतो. वैदिक ऋषि सूर्याचें नक्षत्रांतील स्थान जाणण्यासाठीं तो उगवण्यापूर्वी थोडा वेळ कोणतें नक्षत्र उगवतें हें पहात × असत. प्रस्तुत ऋचेंत वृषाकपि

× यत्पुण्यं नक्षत्रं तद्वट् कुर्वीतोपव्युषम् । यदा वै सूर्य उदेति । अथ नक्षत्रं नैति । यावति तत्र सूर्यो गच्छेत् । यत्र जघन्यं पश्येत् । तावत कुर्वीत तत्कारी स्यात् । पुण्याह एव कुरुते ।

इन्द्राच्या घरीं गेला म्हणजे त्याचा मृग कोठें दिसत नाहींसा होतो, असें सांगितलें. यावरून उघडच ते दोघेहि त्या दिवशीं बरोबर उगवत असें होतें. यांत उदंच हाहि शब्द फार महत्त्वाचा आहे. इंद्राच्या घरीं वृषाकपि गेला म्हणजे तो उदंच असतो व इन्द्राचें घर आकाशाच्या उत्तर भागांत आहे असें या सूक्तांतील प्रत्येक ऋचेंत सांगितलेलें आहे. म्हणजे या ऋचेंत वसंतसंपातांत ऊर्फ देवयानाच्या किंवा इन्द्राच्या घराच्या द्वारांत शिरणाऱ्या सूर्याची स्थिति वर्णिली आहे, हें स्पष्ट होतें. )

**पर्शुर्ह नाम मानवी साकं ससूव विंशतिम् ।**
**भद्रं भल त्यस्या अभूद्यस्या उदरमामयद्विश्वस्मादिंद्र उत्तरः॥२३॥**

अर्थः—हे भल, मनूची कन्या पर्शु ही एकदांच वीस पुत्र प्रसवली. जिचें उदर एवढें पुष्ट होतें तिचें कल्याण असो. इन्द्र विश्वाच्या उत्तर भागांत आहे. ॥ २३ ॥

( यांत वीस म्हणजे कदाचित् चवदाव्या ऋचेंत सांगितलेले वीस आणि पंधरा असा अर्थ संदर्भानें घ्यावयाचा असेल. हा हरित मृग व इतर नक्षत्रें प्रसवणारीचें इन्द्रानें शेवटीं कल्याण चिंतिलें आहे. )

# धार्मिक ग्रंथ गोष्टीच्या रूपानें.

**कथाकल्पतरू**—( पूर्वार्ध-स्तवक १ ते ७ ) अध्याय १२६ गोष्टीरूप भाषांतर. पुस्तकाचा आकार. ग्लेज कागद व कापडी पुठ्याची बांधणी. यांत भागवत, रामायण व १८ पुराणांतील पांचशांवर सुंदर कथा आल्या आहेत. सवलतीची किंमत रु. ४-०-०

**कथाकल्पतरू**—( उत्तरार्ध स्तबक ८ ते १४ ) अध्याय १२६ गोष्टीरूप भाषांतर, पुस्तकाचा आकार, ग्लेज कागद व कापडी पुठ्याची बांधणी. या भागांत संपूर्ण महाभारत, भगवद्गीता, विदूरनीति, भीष्मनीति, गीतामाहात्म्य व पांडवांविषयीं इतर पुराणांतरींच्या कथा आणि विस्तृत उपसंहार आहे. किंमत रु. ४-०-०

**बृहद्योगवासिष्ठ—अर्थात्—वसिष्ठ महारामायण.**

( श्री वाल्मिकीमुनिप्रणीत ३२ हजार श्लोकात्मक ग्रंथांचें मराठी गोष्टीरूप रूपांतर ) या ग्रंथांत श्रीवसिष्ठमुनि वक्ते व श्रीराम श्रोता, असा योग आणून अध्यात्म ज्ञानाचें विवेचन केलें आहे. हा ग्रंथ चार भागांत पूर्ण केला असून तो दोन व्हाल्यूममध्यें बांधला आहे, व शेवटीं दोन परिशिष्टें जोडलीं आहेत. दोनही व्हाल्यूम मिळून ... ... सवलतीची किंमत रु. ८-०-०

**गणेशपुराण**—या पुराणांत उपासनाखंड व क्रीडाखंड अशीं दोन मुख्य खंडें असून अध्याय २४८ आहेत. त्याचें गोष्टीरूप हें सुलभ रूपांतर आहे. ... ... ... किंमत १-०-०

**पद्मपुराण**—हा ग्रंथ ५५ हजार श्लोकात्मक असून त्यांत सृष्टीची उत्पत्ति, रचना, घटना, इत्यादि माहिती व अनेक उपयुक्त अशा कथा आहेत. हा संपूर्ण ग्रंथ सरळ गोष्टीच्यारूपानें दोन भागांत पूर्ण केला आहे. शेवटीं विस्तृत सुची आहे. दोन भाग. किंमत ३-०-०

**स्कंदपुराण**—या पुराणांत ७ खंडे असून १८३० अध्याय आहेत आणि त्यांत सर्व तीर्थांची उत्पत्ति, महती व देवस्थानांचें महत्त्व सांगितलें आहे. हा ग्रंथ गोष्टीरूपांत रूपांतर करून तो चार भागांत पूर्ण केला आहे. चार भाग मिळून ... ... किं. ४-०-०

**रंगनाथी योगवासिष्ठ***—ओवीबद्ध प्राकृत ग्रंथ पुस्तकाचे आकारांत रफ कागदावर सन१९०८मध्यें छापलेला जुना आहे. १–०–०

**भक्तलीलामृत**—हा महीपतीकृत ओवीबद्ध ग्रंथ जाड टाईपांत पुस्तकाचे आकारांत रफ कागदावर छापलेला आहे. किं. रु. २–८–०

**संतविजयः**—हा महिपती कृत ओविबद्ध ग्रंथ जाड टाईपांत रफ कागदावर छापला असून आरंभीं छत्रपति शिवाजी महाराजांसह श्रीसमर्थांचें सुंदर चित्र दिलें आहे. ... किंमत १–८–०

## वेदांत विषयाचे ग्रंथ.

**तत्वानुसंधान**—माधवानंद स्वामीकृत संस्कृत ग्रंथाचें मराठी रूपांतर. प्रमेयसिद्धि, प्रमाणसिद्धि, अप्रमेयाचें निरूपण व मुक्ति इत्यादि विषयांचें विवेचन यांत आहे. ... किं. रु. १–८–०

**सांख्यतत्वकौमुदी**– कपिलमुनिप्रणीत सांख्यशास्त्राचें हें मराठी रूपांतर गोड सुलभ भाषेंत दिलें आहे. ... किं. ०–१२–०

**जीवन्मुक्तिविवेक**—श्री विद्यारण्य स्वामीप्रणीत निवृत्ति धर्मपर ग्रंथाचें हें मराठी रूपांतर आहे. ... ... किं. ०–१२–०

**पंचदशी**-(उत्तरार्ध) भारततीर्थ कृत (अन्वय अर्थ विवरण यांसह) १ तृप्तिदीपः, २ कूटस्थदीपः, ३ ध्यानदीपः, ४ नाटकदीपः, ५ योगानंदः, ६ आत्मानंदः ७ अद्वैतानंदः, ८ विद्यानंदः ९ विषयानंद, अशा नऊ प्रकरणांचें अन्वय अर्थासह विवरण. १–८–०

**हरिमिडे स्तोत्र**—आचार्य कृत वेदांताचें विवेचन.... किं. ०–४–०

**आत्मविचार**—श्री परमहंस परिव्राजक स्वामी सच्चिदानंद सरस्वती कृत–ब्रह्म, माया, आत्मा या संबंधानें सोपपत्तिक विवेचन किं. १–८–०

**मार्किस ओरेलियस बादशहांचीं बोधवचनें** – (ले. कृ अ. केळुसकर) ... ... किं. रु. १–०–०

**मनोविलास**—(ले. व. ज.) यांत वेदान्तपर विवेचन आहे. ,, १–०–०

# शास्त्रीय विषय.

**अर्थशास्त्र**–अर्थशास्त्रासंबंधानें सोपपात्तिक विवेचन .... ०–८–०

**आरोग्यशास्त्र**–[ले. डा. धुरंधर ] आरोग्यरक्षणाची माहिती १–४–०

**वनस्पतिविचार**–[ले. प्रोफेसर र. वि. दामले] वनस्पतींच्या गुणधर्मासंबंधानें सोपपत्तिक माहिती व विवेचन. बॉटनीचा अभ्यास करणारांस फारच उपयोगी असा हा ग्रंथ आहे. ... १–०–०

**तर्कशास्त्र**-[ले. गो. रा. ओक] 'धी लॉज ऑफ डिस्कर्सिव्ह थॉट' चें हें मराठी रूपांतर सुलभ मराठी भाषेंत केलें आहे.... १–०–०

**भारतीयज्योतिर्गणित**-[ ले.–श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ] पौर्वात्य आणि पाश्चिमात्य ज्योतिषशास्त्रवेत्ते यांच्या ज्योतिष ग्रंथांच्या आधारें सोपपत्तिक विवेचन. ६ परिशिष्टांसह. ... २–०–०

**मानसोपचार शास्त्र व पद्धति**–(डॉ. गणपुले) ह्यांत मानसोपचारशास्त्र व पद्धती यासंबंधानें सचित्र माहिती. ४–०–०

**विचाररत्नाकर**–(लेखक वा. न. उपाध्ये) लॉर्ड बकनें साहेबांचें निबंध व संस्कृत सुभाषितें ह्यांचा संग्रह. २–८–०

**दुधदुभतें**-[दुधदुभतें यासंबंधानें उपयुक्तमाहिती] .... ०–४–०

**वनस्पतिवर्णन**–[वनस्पतीच्या गुणदोषासंबंधानें माहिती ]०–४–०

**विषनिदान व चिकित्सा**– ले. म. भि. विंझे ]आर्यवैद्यक व इंग्रजी वैद्यक सर्व प्रकारच्या विषांची माहिती व उपचार. ... ०–८–०

**होमिओपाथिक गाइड**–मटेरियामेडिकाप्रमाणें होमोपाथी-संबंधानें सर्व औषधांची सोपपत्तिक माहिती. ... ... ०–८–०

**युरोपमध्यें कार्यकारण वादाचा उदय व प्रभाव**—[ले. परचुरे ] डेक्कनव्हर्नाक्यूलर सोसायटीनें पसंत केलेला ग्रंथ. १–०–०

# मनोरंजक कादंबऱ्या व नाटकें.

**कालिकामूर्ति**—अथवा कर्नाटकांतील शाक्तांचें बंड, भूतादि कल्पना व देवीस मनुष्यांचे बळी देण्याचे प्रकार, इत्यादि प्रसंगाचें चित्र अत्यंत मनोरंजक रीतीनें यांत दाखविलें आहे. ... ... किं. रु. ३-०-०

**प्रवालद्वीप**—[ पूर्वार्ध व उत्तरार्ध मिळून संपूर्ण कादंबरी ] यांत राजकीय उलाढाली व कारस्थानी पुरुषांचीं अमानुष कारस्थानें व सत्याचा जय इ. मुद्यांचें बोधपर चित्र वठविलें आहे, दोन भाग. एकत्र बांधले आहेत. ... किं. रु. २-८-०

**इंद्रभुवन गुहा**—अथवा विलासपूरची राणी लीला—सचित्र नवी मनोरंजक कादंबरी ( दोन भाग एकत्र नवी आवृत्ति ) १-८-०

**अधःपात**—(चांगल्याचा चांगला व वाईटाचा वाईट परिणाम) परोपकार व औदार्याचीं कृत्यें यशस्वी कशीं होतात याचें अत्यंत बोधपर व मनोहर चित्र (आवृत्ति संपली) किं. रु.२-८-०

**विलासमंदिर**—(अथवा दुराग्रही राज्यकर्ते बोधपर कादंबरी) हट्टी राज्यकर्त्यांकडून राजनिष्ठ माणसाचा छळ केल्यानें कसा अनिष्ठ परिणाम होतो, याचें मनोहर चित्र. किं. रु. २-८-०

**बंधुद्वेष**—(अथवा व अपकाराची फेड उपकारानें.) उदात्त विचाराचें उपदेशपर चित्र ह्यांत आहे. किं. रु. २-८-०

**विश्वनाथ***—अथवा एका लक्ष्मीपुत्राचा अज्ञातवास अज्ञात अवस्थेंत जगांतील अनेक प्रसंगाशीं कसें झगडावें लागलें, त्याचें फारच मनोरंजक व बोधपर कथानक यांत आहे. या कादंबरीचे ६ भाग असून ते एकत्र बांधले आहेत. मोठ्या आकाराची पृष्ठ संख्या १००० वर आहे. आवृत्ति संपली. प्रति थोड्याच आहेत. किंमत रु.... ६-०-०

**शापविमोचन**—अथवा अतिमानुष्य सामर्थ्याचा अनिष्ट परिणाम, समाज व व्यवहार याचें बोधपर चित्र किं. रु. १-०-०

**रहस्यभेद**—[अथवा निस्सीम पतिप्रेम आणि अढळ राजनिष्ठा] ही कादंबरी अत्यंत रहस्यमय व बोधपर आहे. किं. रु. २-०-०

शालीवहान शक—( ले. गो. ना. दातार. )
ऐतिहासिक, बोधप्रद व मनोरंजक कादंबरी ....२—८—०
नूरजहान आणि जहांगीर-ऐतिहासिक कथानक चित्रांसह १—०—०
सौंदर्य उपासक मालती—एक मनोरंजक व गोड कथानक ०—८—०
कथामकरंद—[उपदेशपर ४ गोष्टी] .... ....०—८—०
देवी सत्यभामा—(अथवा गुजरातेंत पेशवाईची अखेर) १—०—०
तरुण रजपूत सरदार—ऐतिहासिक कादंबरी .... ०-१२-०
हिरकवलय—बंगाली कादंबरीचें रमणीय कथानक. ....०—८—०
अनङ्गमोहिनी—(ले.कृष्णानुज) वंग कादंबरीचें रुपांतर ०—१२—०
वेणीपुरचा हिंमतबहाद्दर—(ऐतिहासिक कादंबरी )....०—८—०
प्रेमनिधान-( ले.वा.ब. दाते ) सुंदर मनोरंजक कादंबरी १—०—०
विश्वासराव सगुणा नाटक—[ प्रोज नाटक ] .... ०—८—०
स्वामी चिदानंद—[प्रोज नाटक.लेखक देशभक्त]सद्यःस्थि-
तीला अनुसरून स्वदेशोत्कर्षाचें विवेचन - ... ... ०—६—०
शूरस्त्रीप्रभाव-ऐतिहासिक प्रसंगास धरून एका शूर स्त्रीचें चित्र ०-८-०
गोपगडमणि—आथवा ग्वाल्हेर किल्ला व मराठे, पेशवे,
शिंदे यांचा संक्षिप्त इतिहास, ... ... ... ०—६—०
थोरले माधवराव पेशवे—[प्रोज, नाटक ले. कै. कीर्तनें]०—६—०
रत्नावली—[ संगीत, ले. वासुदेव ना. डोंगरेकृत ] ....०—८—०
महाशिवाजी-(ले.टिपणीस) चार अंकीं सचित्र संगीत नाटक१—४—०
आशानिराशा—[ टिपणीसकृत संगीत नाटक ] .... १—४—०
राजरंजन—[टिपणीसकृत सं. चार अंकी नाटक] .... १—४—०
महाराष्ट्राचा अरुणोदय—(ले.हडकर ) शिवरायाच्या
ऐतिहासिक कालास अनुसरून लिहिलेलें कथानक ०-१२-०
सुशील मनोरमा—[ संगीत नाटक ] .... .... ०—४—०
जयद्रथविडंबन—[संगीत नाटक ले. हिराबाई पेडणेकर]०—८—०

३५६२

# इतिहास व चरित्रें

( श्री. गो. स. सरदेसाइकृत. )

**मुसलमानी रियासत**-(भाग १ ला-आवृति दुसरी -यांत मुसलमानी कारकीर्दींतील अवल पासून सन १५२६ पर्यंतची सविस्तर हकीकत आली आहे ... ... किं. ३-०-०

**मराठी रियासत**—( पूर्वार्ध )—यांत प्राक्कालीन राज्याच्या आरंभापासून सन १७०७ पर्यंतची मराठी अमदानीची साम्र व सोपपत्तिक ऐतिहासीक माहिती आहे. (आवृत्ति संपली.) ४-०-०

**मराठी रियासत, मध्यविभाग-भाग- १ ला**-यांत सन १७०७ पासुन १७४० पर्यंतची म्हणजे छत्रपति शाहू, पेशवे बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांची संपूर्ण हकीकत आहे. किं. ३-०-०

**सदर — भाग २ रा**-सन १७४० पासून १७६२ पर्यंत छत्रपति शाहू, पेशवा बाळाजी बाजीराव यांची संपूर्ण हकीकत. किं. रु. ३-०-०

**सदर -- भाग ३ रा-पानिपत प्रकरण**-सन १७५० ते १७६२ पर्यंतची संपूर्ण हकीकत. ... ... किं. रु. २-८-०

**सदर — भाग ४ था**— सन १७६१ ते १७७४ पर्यंत माधवराव पेशवे यांची संपूर्ण हकीकत. ... ... किं. रु. ३-०-०

**ब्रिटिश रियासत**—( पूर्वार्ध ) यांत ब्रिटीश साम्राटाचा आरंभापासुन सन १७६०पर्यंतचा संपूर्ण इतिहास आहे. किं. रु. ३-८-०

**लार्ड मेकाले**-( ले. ना. ल. फडके. ) भरपूर माहिती व सोपपत्तिक विवेचनयांसह. ... ... किं. रु. १-८-०

**मौन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांचें चरित्र**-( पूर्वार्ध ) मुंबई इलाख्याचे इतिहासप्रसिद्ध गव्हर्नर यांची कारकीर्द किं. रु. १-०-०

**क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व**—( कै. वा. ल. बिजेंकृत ) यांत क्षत्रियांची उत्पत्ति व अस्तित्व यासंबंधानें साधार व सप्रमाण विवेचन व सोपात्तिक माहिती आहे. ( कागदी पुठा ) किं. रु. २-०-०

**श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड** यांचें चरित्र ,, ०-८-०

**श्री. संपतराव गायकवाड** यांचें ( चरित्र ) ... ,, ०-८-०

**मराठा कुळांचा इतिहास**,—भाग १ ला (जाधव घराणें) ,, १-०-०

REFBK-0003562